ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक ४ पाने ५६ नोव्हेंबर २०१७ मूल्य २२रु.


## सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग


सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांच्या उत्पादनाची उपलब्धता
शिशिर सिन्हा

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या अर्थपुरवठ्यातील आव्हाने
अनिल भारद्वाज

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे सशक्तीकरण
अरुण पांडा

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी दर्जा प्रमाणीकरण
डॉ. जतिंदर सिंग



विशेष लेख
लघु व मध्यम उद्योगांतील तंत्रज्ञान प्रगती
बालसुब्रमनिया एम. एच.

फोकस
खादी आयोगाने उचललेली नवी पावले
व्हि. के. सक्सेना

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, "बी" विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ४ ❖ ❖ नोव्हेंबर २०१७ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## अनुक्रमणिका


- लघु व्यवसाय : गरज आणि उपयुक्तता - डॉ. अश्वनी महाजन ५
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या उत्पादनाची उपलब्धता - शिशिर सिन्हा १०
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या अर्थपुरवठ्यातील आव्हाने - अनिल भारद्वाज २०
- खादी आयोगाने उचललेली नवी पावले - (फोकस) - व्हि. के. सक्सेना २७

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे सशक्तीकरण - अरूण पांडा ३२

- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी दर्जा प्रमाणीकरण - डॉ. जतिंदर सिंग ३८
- लघु व मध्यम उद्योगांतील तंत्रज्ञान प्रगती - बालसुब्रमनिया एम. एच. -(विषेश लेख) ४३
- एमएसएमइ प्रोत्साहन योजना - एम. चंद्रशेखर रेड्डी ५०


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲंड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲंड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक
योजना

# क्षेत्र लहान क्षमता महान

एक सशक्त औद्योगिक क्षेत्र उभारण्यास या देशातील राज्यकर्ते आणि धारेणकर्त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. उद्योगांमुळे केवळ स्थानिक गरजा आणि निर्यातीची मागणीच भागवली जात नाही तर या क्षेत्रामुळे देशातील तरूणांना मोठया प्रमाणात रोजगार मिळतो. सखल देशाअंतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी ची चर्चा होते त्यावेळी प्रामुख्याने लोह आणि पोलाद, मोटार निर्मिती आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू यासारख्या मोठ्या उद्योगांवरच भर दिला जातो. परंतू आपल्या देशात आणखी एक क्षेत्र आहे. जे उत्पादन तसेच रोजगार निर्मिती या दोन्हीही बाबतीत महत्वाचे आहे तरी सुध्दा अर्थ तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांकडून काहीसे दुर्लक्षिले जाते. आणि ते क्षेत्र म्हणजे सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योग अर्थात एमएसएमई हे होय.

भारतात एमएसएमई क्षेत्र सुमारे ११ कोटी लोकांना रोजगार पुरविते तसेच जीडीपी मध्ये या क्षेत्राचे योगदान जवळपास १७ टक्के एवढे आहे. खादीचे कापड, मध या सारख्या असंख्य वस्तू ज्या औद्योगिक उत्पादनासाठी वापरल्या जातात या सर्वांची निर्मिती एमएसएमई या क्षेत्राकडून केली जाते. असे असताना या महत्वाच्या क्षेत्रास अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. पायाभूत सुविधांचा अभाव वेळेवर पत पूरवठा न होणे आधूनिक तंत्रज्ञानाचा अभाव कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसणे विपणनाच्या सुविधाचा अभाव या सारख्या अनेक समस्या या क्षेत्राला भेडसावत आहेत. या शिवाय चीनसारख्या शेजारील देशांकडून मोठया प्रमाणावर भारतात उपलब्ध करून देण्यात येणारा स्वस्त माल यामुळेही एमएसएमई क्षेत्रातील अनेक उद्योग अडचणीत आले आहेत.

पुरेसा पत पुरवठा न होणे ही समस्या प्रामुख्याने लघु आणि मध्यम उद्योगांना भेडसावते. कारण या उद्योगांच्या व्यवहार्यतेबद्दल पत पुरवठा करणाऱ्या संस्था साशंक असतात ही समस्या दूर करण्यासाठी भारत सरकारने क्रेडीट गॅरेन्टी फन्ड योजना सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत पूर्वी मिळणाऱ्या १ कोटी कर्जाची कमाल रक्कम आता २ कोटीपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांसाठी तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण महत्वाचे ठरले आहे. तंत्रज्ञानाच्या आधुनिकीकरणासाठी कमकुवत आर्थिक स्थिती आणि मर्यादित मनुष्यबळ याचा या क्षेत्रातील उद्योगांना सामना करावा लागत आहे. यासाठी तंत्रज्ञान हस्तांतरण हा एक पर्याय आहे. याशिवाय सरकार टुल रूम्स् आणि तंत्रज्ञान विकास केंद्राच्या माध्यमातून या उद्योगांना कौशल्य आणि तांत्रिक मदत पुरवत आहे.

कोणत्याही उद्योगाच्या यशस्वीतेसाठी चांगल्या पायाभूत सुविधा आवश्यक असतात. परंतू भारतातील एमएसएमई क्षेत्रातील बहूतांश उद्योग हे अत्यंत तोकड्या पायाभूत सुविधांच्या बळावर कार्य करीत आहेत. यावर मात करण्यासाठी सरकारने समूह विकास कार्यक्रम (क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) सुरू केला आहे. याद्वारे सामाईक सुविधा केंद्रे उभारली जात आहेत. या केंद्रामध्ये आधुनिक उपकरणे, तंत्रज्ञान आणि डिझाइन उपलब्ध करून दिले जात आहे. कारण एमएसएमई क्षेत्रात यश मिळवण्यासाठी कुशल मनुष्यबळ सर्वात मूलभूत घटक ठरतो. उपलब्ध मनुष्यबळ आकृष्ट करणे आणि ते कायम ठेवणे हे तर महत्वाचे आहेच परंतू नवीन कुशल मनुष्यबळ विकसीत करणे हे त्याहून जास्त महत्वाचे ठरते. ही बाब ओळखून सरकारने अनेक क्षमता विकास कार्यक्रम सुरू केले आहेत. उद्योजकता विकास कार्यक्रम आणि व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम याद्वारे सरकार देशातील युवकांचा क्षमता विकास करू इच्छित आहे.

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग यांची देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये खूप महत्वाची भूमिका असते. या क्षेत्राद्वारे अकूशल, अर्धकूशल आणि कुशल मनुष्यबळासाठी रोजगार निर्मिती केली जाते, ती ही अत्यंत कमी गुंतवणुकीद्वारे. या उद्योगांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लागतो कारण या उद्योगांची उत्पादने ग्रामीण भागामध्ये तयार केली जातात. ही उत्पादने प्रामुख्याने अनोखी आणि वेगळी असल्यामुळे निर्यातीद्वारे विदेशी चलन मिळविण्यासाठी महत्वाची ठरतात. उत्पादन खर्च कमी असल्यामुळे आर्थिक अस्थिर वातावरणातही सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग टिकाव धरू शकतात.

या सर्व वैशिष्टयांमुळे सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेला भरारी देण्याचे सामर्थ्य बाळगून आहेत. त्यांना सरकार आणि वित्तीय संस्थाकडून थोडीशी मदत मिळाल्यास हे उद्योग देशाच्या आर्थिक भरभराटीस चांगला हातभार लावू शकतात.

■■■

विवेचन

# लघु व्यवसाय : गरज आणि उपयुक्तता

- डॉ. अश्वनी महाजन



**आर्थिक धोरणात लघु व्यवसायांचे संरक्षण आणि प्रोत्साहन यावर लक्ष्य केंद्रित केले जावे हेच औचित्यपूर्ण आहे. तरीसुद्धा, गेल्या दोन दशकांपासून हे क्षेत्र गंभीर पेचप्रसंगात सापडले आहे. लघु व्यवसाय मोठ्या प्रमाणावर बंद पडल्याने रोजगार निर्मितीत मोठा अडथळा आला आहे. एवढेच नव्हे तर अर्थव्यवस्थेची वाढ आणि विकासाला खीळ बसत आहे.**

लहान व्यवसायांना भारतीय अर्थव्यवस्थेत नेहमीच महत्वाचे स्थान राहिले आहे, मग ते उत्पादन असो, रोजगार निर्मिती असो की निर्यात. याशिवाय हे व्यवसाय भांडवल आणि विकेंद्रीकरण यासह वाढीचे साधन राहिले आहेत. त्यामुळे आर्थिक धोरणात लघु व्यवसायांचे संरक्षण आणि प्रोत्साहन यावर लक्ष्य केंद्रित केले जावे हेच औचित्यपूर्ण आहे. तरीसुद्धा, गेल्या दोन दशकांपासून हे क्षेत्र गंभीर पेचप्रसंगात सापडले आहे. लघु व्यवसाय मोठ्या प्रमाणावर बंद पडल्याने रोजगार निर्मितीत मोठा अडथळा आला आहे. एवढेच नव्हे तर अर्थव्यवस्थेची वाढ आणि विकासाला खीळ बसत आहे.

### उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा परिणाम

स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारण्यात आलेल्या औद्योगिक धोरणात मोठ्या प्रमाणावर असलेल्या खासगी उद्योगांवर विविध निर्बंध लादण्यात आले आणि त्या वेळेसचे औद्योगिक धोरण परवाना आणि कोटा राजच्या समानार्थी होऊन बसले होते. विद्यमान उद्योगांनी अशा धोरणात कसे तगून राहायचे याची कला शिकून घेतली तरी याच धोरणाने नवीन व्यावसायिकांसाठी मात्र अडसर निर्माण केले गेले होते.

लघु उद्योगापुरते बोलायचे तर त्या धोरणात लघु उद्योगांना ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्रांत व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली होती आणि अनेक वस्तू लघु उद्योगांसाठी राखूनही ठेवण्यात आल्या होत्या. १९९१ मध्ये नव्या आर्थिक धोरणाचे आगमन होईपर्यंत ८१२ वस्तू लघु उद्योगांना उत्पादनासाठी राखून ठेवल्या होत्या. नवीन आर्थिक धोरणाने आरक्षणाचे हे धोरण निर्दयीपणे मारून टाकले. तसेच पूर्वी सरकारकडून केली जाणारी खरेदी आणि किमतीबाबत लघु उद्योगांना प्राधान्य दिले जायचे. स्पर्धेला प्रोत्साहन देण्याच्या नावाखाली लघु उद्योगांना दिल्या जाणाऱ्या सवलती हळूहळू नष्ट झाल्या. लघु उद्योगांसाठी आरक्षण ठेवण्याचे धोरण तंत्रज्ञान विकासाच्या मार्गात येत असून स्पर्धा मारून टाकणारे आहे असे सांगण्यात आले

होते. संरक्षणामुळे अकार्यक्षमता निर्माण होते आणि देश आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकू शकणार नाही, असे सांगण्यात आले होते. लघु उद्योगांसह देशांतर्गत उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण सुरूच ठेवले तर परदेशी गुंतवणूकदार निराश होतील आणि ग्राहकांच्या निवडीलाही खीळ बसेल, असाही युक्तिवाद करण्यात आला होता. नवीन आर्थिक धोरणातील (एनईपी) युक्तिवादामुळे लघु उद्योगांना सवलती देण्यास अनुकूल असलेला रोजगार निर्मिती, विकेंद्रीकरण आणि औचित्याचा युक्तिवाद बाजूस सारला.

जागतिकीकरणाच्या युगातील खुल्या आयातीच्या धोरणामुळे अनेक प्रकारच्या वस्तू आणि तंत्रज्ञानसुद्धा मिळण्यास आम्हाला मदत झाली, परंतु लक्षावधी लघु उद्योग बंद पडून त्यांचा बळी देण्याची किंमत मोजावी लागली, कारण हे उद्योग उर्वरित जगाकडून होणाऱ्या तीव्र स्पर्धेला तोंड देऊ शकले नाहीत. वाहन क्षेत्रात पूरक लहान व्यवसायांत काहीशी वाढ झालेली पाहायला मिळत असली तरीही सर्वसाधारणपणे चीनमधून आयातीचा महापूर आल्याने बहुतेक लघु उद्योग नष्ट झाले. चीनकडून आयातीची जी लाट उसळली त्यामुळे देशावर परकीय चलनाचा मोठा बोजा पडलाच इतकेच नव्हे तर खेळणी, विजेची उपकरणे, मोबाईल, संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक सुटे भाग, प्रकल्पासाठी लागणारा माल, उर्जा प्रकल्प यात जोरदार आयात करण्यात आल्याने आमचे उद्योग आणि व्यवसाय संपूर्ण नष्ट झाले आणि त्यामुळे व्यापक बेरोजगारी वाढली.

### मेक इन् इंडियाला कसे प्रोत्साहन देता येईल?

चीनमधून भारतात ओतल्या जाणाऱ्या मालामुळे भारताच्या लघु उद्योग क्षेत्रावर होणाऱ्या विपरीत परिणामाबाबत जराही शंका नसली तरीही चीनी सरकार आपल्या देशातील उद्योग आणि व्यावसायिकतेच्या विकासाकरता सर्वाधिक सुयोग्य वातावरण पुरवते, आणि चीनने देशाला उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवले आहे, हे समजून घेणे महत्वाचे आहे.

**जागतिकीकरणाच्या युगातील खुल्या आयातीच्या धोरणामुळे अनेक प्रकारच्या वस्तू आणि तंत्रज्ञानसुद्धा मिळण्यास आम्हाला मदत झाली, परंतु लक्षावधी लघु उद्योग बंद पडून त्यांचा बळी देण्याची किंमत मोजावी लागली, कारण हे उद्योग उर्वरित जगाकडून होणाऱ्या तीव्र स्पर्धेला तोंड देऊ शकले नाहीत. वाहन क्षेत्रात पूरक लहान व्यवसायांत काहीशी वाढ झालेली पाहायला मिळत असली तरीही सर्वसाधारणपणे चीनमधून आयातीचा महापूर आल्याने बहुतेक लघु उद्योग नष्ट झाले.**

भारतात लघु उद्योग क्षेत्राच्या सुदृढ विकासाच्या मार्गात महाग वीज, कालबाह्य झालेले कामगार कायदे, गुंतागुंतीची करप्रणाली, करांचे उच्च दर, वित्त सहाय्य मिळवण्यात अडचणी, पायाभूत सुविधेचा अभाव, व्यवसाय सुरु करण्यास प्रतिबंध करणारे कायदे, इन्स्पेक्टर राज आणि पर्यावरणविषयक विकृत कायदे असे काही प्रश्न आहेत. यावरून आपण असे म्हणू शकतो की, लघु उद्योगांसमोर केवळ आयातीमुळे होणाऱ्या असमान स्पर्धेतून निर्माण होणारे प्रश्न एवढेच नाहीत तर व्यवसाय सुरु करण्यापासून ते उत्पादन बाजारपेठेत नेण्यापर्यंत बेसुमार समस्या आहेत.

### स्वतंत्र कामगार कायद्याची गरज

कामगारांचे संरक्षण आणि कल्याण हे कुणीच नाकारणार नाही. 'हायर अँड फायर' चे अन्याय्य धोरण चांगले नाहीच आणि आपल्याला कामगारांचे हितरक्षण करावे लागेलच, परंतु मोठ्या आणि लघु उद्योगांना सारखेच कायदे याचे कुणी समर्थन करू शकणार नाही. आता चित्र बदलले असून किचकट कामगार कायद्यांमुळे, लघु उद्योग नियमित कामगारांना घेण्याऐवजी कंत्राटी कामगारांकडे वळले आहेत. कंत्राटी कामगारांचे दलाल शोषण करतात आणि त्यामुळे व्यावसायिक व कामगार यांच्यातील पुरक नातेसंबंध उरत नाहीत, ज्याचा परिणाम व्यावसायिक आणि कामगार या दोघांच्याही कल्याणावर

होतो. ही समस्या लक्षात घेऊनच दुसऱ्या कामगार आयोगाने लघु उद्योगांसाठी स्वतंत्र कायदे अमलात आणण्याची महत्वपूर्ण शिफारस केली होती. कामगार संघटनांनीही या उपायास अनुकुलता दर्शवली होती. काही काळापूर्वी सूक्ष्म लघु आणि मध्यम व्यवसाय विधेयक तयार करण्यात आले होते. तरीसुद्धा, लघु उद्योगांसाठी स्वतंत्र कायदे करण्याची गरज तशीच उरली आहे.

**सध्याच्या सरकारने सत्तासूत्रे हाती घेताच, लहान आणि सूक्ष्म व्यावसायिकांना मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रीफिनांस एजन्सी (मुद्रा), स्टार्ट अप योजना आदि द्वारा सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. एकट्या मुद्रा योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ३.९ लाख कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे; आणि मुद्रा योजनेच्या ९.३ कोटी लाभार्थ्यांनी केवळ स्वयं रोजगार मिळवला एवढेच नव्हे तर अनेक रोजगार निर्माणही केले आहेत.**

### वित्तसहाय्य

बँका आणि इतर वित्तीय संस्थांना लघु उद्योगांना कर्ज देणे जोखमीचे आणि त्रासदायक वाटत असते. बँकांना बुडीत कर्जाच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे ते मोठ्या रकमेच्या कर्जांमुळे हे लक्षात घेतले तर त्यांच्या या विचारात जराही सत्य नाही. बँका अशा पूर्वकल्पित समजुतीमुळे लघु उद्योगांना कर्ज पुरवठा करणे टाळतात आणि इतकेच नव्हे तर लघु उद्योगांना प्राधान्याने कर्ज देण्याच्या कायदेशीर बंधनाला बासनात गुंडाळून ठेवतात. याही पुढे, लघु उद्योगांना कर्ज उच्च व्याज दराने मिळते तर बड्या कर्जदारांना ते अत्यंत स्वस्त दरात, कोणताही अडसर न येता आणि अतिशय सुलभ अटीवर मिळते.

सध्याच्या सरकारने सत्तासूत्रे हाती घेताच, लहान आणि सूक्ष्म व्यावसायिकांना मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रीफिनांस एजन्सी (मुद्रा), स्टार्ट अप योजना आदि द्वारा सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. एकट्या मुद्रा योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ३.९ लाख कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे; आणि मुद्रा योजनेच्या ९.३ कोटी लाभार्थ्यांनी केवळ स्वयं रोजगार मिळवला एवढेच नव्हे तर अनेक रोजगार निर्माणही केले आहेत.

आजच्या आधुनिक युगात परदेशी व्यापार ही सामान्यत: घडणारी घटना असली तरी लघु उद्योगांसाठी मात्र ती संकटाचे मुख्य कारण बनली आहे. त्याचे कारण आहे काही देशांकडून विशेषत: चीनमधून मोठ्या प्रमाणावर होणारी डम्पिंग. केंद्र सरकारने आता डम्पिंग विरोधी कर मोठ्या प्रमाणावर लावण्यास सुरुवात केली आहे. तत्कालीन वाणिज्य आणि उद्योग मंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले होते की, चीनमधून होणाऱ्या आयातीसंदर्भात ९३ वस्तूंवर डम्पिंगविरोधी कर अमलात आहे. त्याशिवाय, डम्पिंग विरोधी आणि संबद्ध कर संचालनालयाकडून चीनमधून केल्या जाणाऱ्या आणखी ४० वस्तूंशी संबंधित प्रकरणी उपाययोजना सुरु केली आहे.

२०१६-१७ मध्ये डम्पिंग विरोधी कर काही वस्तूंवर लागू केल्याने इच्छित परिणाम पहायला आपल्याला मिळतात. आता चीनमधून अनेक वस्तूंच्या आयातीवर डम्पिंग

*मुद्रा अंतर्गत वितरित करण्यात आलेले कर्ज*

| वर्ष | मंजूर कर्जप्रकरणाची संख्या | कर्जाची वितरित झालेली रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| २०१५-१६ | ३४८८०९२४ | १३२९५४.७३ |
| २०१६-१७ | ३९७०१०४७ | १७५३१२.१३ |
| २०१७-१८ | १८३४००५३ | ८४४१३.२८ |
| **एकूण** | ९२९२२०२४ | ३९२६८०.१ |

विरोधी कर लागू केल्याने चालू वर्षात चीनमधून होणाऱ्या आयातीत आणखी घट होईल अशी अपेक्षा आहे. यामुळे देशांतर्गत उद्योगाला दिलासा मिळणार आहेच, पण भारत चीन व्यापारी तुटही खाली येण्याची अपेक्षा आहे.

**सरकारी अधिग्रहणात प्राधान्य**

लघु उद्योगांना संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी, लघु उद्योगांनी उत्पादित केलेल्या वस्तू खरेदी करण्याचे स्पष्ट आणि सर्वसमावेशक धोरण होते, ज्याचे स्वरूप किमतीला किंवा खरेदीला प्राधान्य या प्रकारचे असे. मात्र कालांतराने, हे प्राधान्य देण्याचे धोरण सोडून देण्यात आले.

सरकारने नुकतेच नवीन प्राधान्यीकृत अधिग्रहण धोरण तयार केले असून त्याची अंमलबजावणी साधारण आर्थिक नियम (General Financial Rules) द्वारे केली जात आहे. जीएफआरचा क्र. १५३ नियम असे सांगतो "५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी किमतीचा माल अधिग्रहित करायचा असेल आणि जिथे संबंधित मंत्रालयाने स्थानिक पातळीवर उत्पादन पुरवण्याची पुरेशी क्षमता आणि स्थानिक स्पर्धा आहे, तिथे केवळ स्थानिक पुरवठादार पात्र असतील.''

५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक किमतीच्या (किंवा जिथे स्थानिक क्षमता/स्पर्धा अपुरी आहे) जर सर्वाधिक कमी किमतीची बोली बाहेरच्या पुरवठादाराकडून आली असेल तर सर्वात कमी किमतीच्या बोलीच्या २० टक्के फरकातील सर्वात कमी किमतीच्या स्थानिक पुरवठादाराला सर्वात कमी किमतीच्या बोलीसाठी संधी देण्यात येईल.

देशांतर्गत माल घेताना झुकते माप देण्याच्या या पद्धतीमुळे देशांतर्गत उद्योगांना साधारणपणे आणि लघु उद्योगांना विशेषत: मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**अनेक कायदे असे आहेत की, जे अर्थव्यवस्थेच्या सुदृढ कार्यपद्धतीला साधारणपणे आणि विशेषत: उद्योगांच्या सुरळीत चालण्याला अडसर निर्माण करतात. ही शोकांतिका संपवण्याची निकडीची गरज आहे. यासंदर्भात, अर्थव्यवस्था सुरळीत चालावी म्हणून सध्याच्या सरकारने काही अनावश्यक कायदे रद्द करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. आतापर्यंत १२०० कायदे रद्द करण्यात आले असून १८२४ आणखी कायदे रद्द करण्यासाठी निश्चित केले आहेत.**

**इन्स्पेक्टर राजची समाप्ती**

लघु उद्योगांना ४० कायदे लागू असून ५० हून अधिक निरीक्षक त्यांच्या कारखान्यांना भेट देतात, आणि त्यांच्यापैकी अनेक जणांना लघु उद्योगांना दंड करण्याचे व्यापक अधिकार आहेत. या धोक्यांच्या सावटात सतत राहणाऱ्या लघु उद्योगांना उत्पादन, मार्केटिंग आणि तंत्रज्ञानाचा दर्जा सुधारणे या महत्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करणे अवघड जाते. अनेक कायदे आधुनिक काळात आपली उपयोगिता हरवून बसले आहेत आणि आणखी अनेक कायदे असे आहेत की, जे अर्थव्यवस्थेच्या सुदृढ कार्यपद्धतीला साधारणपणे आणि विशेषत: उद्योगांच्या सुरळीत चालण्याला अडसर निर्माण करतात. ही शोकांतिका संपवण्याची निकडीची गरज आहे. यासंदर्भात, अर्थव्यवस्था सुरळीत चालावी म्हणून सध्याच्या सरकारने काही अनावश्यक कायदे रद्द करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. आतापर्यंत १२०० कायदे रद्द करण्यात आले असून १८२४ आणखी कायदे रद्द करण्यासाठी निश्चित केले आहेत.

नवीन व्यावसायिकांना सर्व प्रकारच्या मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. काही राज्यांनी ही प्रक्रिया सुरूही केली आहे. अधिकाधिक राज्य सरकारे ऑनलाईन होत असल्याने, ही प्रक्रिया आणखी गतिमान होईल. स्टार्ट अप्सच्या नव्या पुढाकार अंतर्गत, ऑनलाईन मंजुरी अगोदरच देण्यात आली आहे.

### पायाभूत सुविधांची उभारणी

दुर्गम भागांत लघु उद्योग सुरु करून चालवणे जवळपास अशक्य आहे. ते रेल्वे मार्ग अथवा रस्त्याने जोडले गेले नसतात आणि त्यांच्याकडे विजेचा आश्वस्त स्त्रोतही नसतो. अगदी मोठ्या आणि विकसित ठिकाणीही

**भारतीय लोक स्वभावत:च व्यावसायिक, कठोर मेहनत करणारे आणि उत्साही आहेत, हे आपण विसरता कामा नये. व्यावसायिकतेच्या विकासाकरता त्यांना पोषक वातावरणाची गरज आहे. प्रामुख्याने हे सरकारचे काम आहे. सरकारने चांगले कायदे केले पाहिजेत आणि पोषक वातावरण तयार केले पाहिजे. भौतिक पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रश्न सोडला तर यासाठी फार मोठ्या वित्तसहाय्याची गरज नसते.**

विजेचा हमखास स्त्रोत हा एक मोठा वादाचा मुद्दा आहे. अनेक ठिकाणी जनित्रे अत्यंत बेफामपणे वापरात असतात. यामुळे खर्च तर वाढतोच परंतु प्रदूषणाचा मोठा स्त्रोत म्हणजे ही जनित्रे असतात आणि अशी जन्नित्रे असलेले कारखाने संबंधित विभागाच्या निरीक्षकांकडून शोषणास बळी पडतात. विविध प्रकारचे रेल्वे मार्ग, रस्ते, ऊर्जा, कौशल्य विकास, बाजारपेठ(ई – पोर्टलसह) या पायाभूत सुविधा विकसित करण्याची गरज आहे. गावांचे सार्वत्रिक विद्युतीकरण, सौर उर्जेला चालना देणे, गतिमान पद्धतीने तयार करत असलेले रस्ते या सध्याचे सरकार करत असलेल्या उपाययोजना विशेषत: ग्रामीण भागांत लघु आणि छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आहेत, हे लोकांना पटत आहे. सरकारने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अधिग्रहण देखील सुरु केले आहे.

भारतीय लोक स्वभावत:च व्यावसायिक, कठोर मेहनत करणारे आणि उत्साही आहेत, हे आपण विसरता कामा नये. व्यावसायिकतेच्या विकासाकरता त्यांना पोषक वातावरणाची गरज आहे. प्रामुख्याने हे सरकारचे काम आहे. सरकारने चांगले कायदे केले पाहिजेत आणि पोषक वातावरण तयार केले पाहिजे. भौतिक पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रश्न सोडला तर यासाठी फार मोठ्या वित्तसहाय्याची गरज नसते आणि पायाभूत सुविधाही सार्वजनिक-खासगी भागीदारीतून विकसित करता येतात. गेल्या काही वर्षातील सुधारणेनंतरही व्यवसाय स्नेही वातावरणाबाबत बोलायचे तर आपण अजूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर १३० व्या स्थानावर आहोत. सरकारने बरेच काही केले आहे आणि बऱ्याच गोष्टी करण्याची त्याच्याकडून अपेक्षा आहे.

■■■

*लेखक नवी दिल्ली येथील पीजीडीएव्ही महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक असून स्वदेशी जागरण मंचाचे सहसंयोजक आहेत.*

*email: ashwanimahajan@rediffmail.com*




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

आढावा

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या उत्पादनाची उपलब्धता

- शिशिर सिन्हा



**कोणत्याही प्रथितयश कंपनीच्या व्यवस्थापनाला विचारा ते सांगतील की, बाजारात प्रवेश मिळवून तिथे पाय रोवण्यासाठी त्यांना लाखो रुपये खर्च करावे लागले आहेत. उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीचे विशिष्ट धोरण आखण्यासाठी त्यांना वितरण तज्ज्ञांना कामाला लावावे लागले आहे. ज्या कंपन्यांच्या मालकांकडे भरपूर पैसा आहे, त्यांच्यासाठी ही किरकोळ बाब आहे, असे आपल्या मनात येईल, मात्र सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग चालवणाऱ्यांचे काय?**

उद्योगांमधून ज्याप्रमाणे वस्तू निर्माण करणे महत्त्वाचे आहे, त्याचप्रमाणे त्या वस्तू त्यांच्या वापरकर्त्यांपर्यंत पोहोचतात की नाही, हे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर प्रत्येक वस्तु वा उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे, पण बाजारपेठेतला प्रवेश इतका सहज सुलभ असतो का? या प्रश्नाचे उत्तर ‘नाही’ असेच आहे. कोणत्याही प्रथितयश कंपनीच्या व्यवस्थापनाला विचारा ते सांगतील की, बाजारात प्रवेश मिळवून तिथे पाय रोवण्यासाठी त्यांना लाखो रुपये खर्च करावे लागले आहेत. उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीचे विशिष्ट धोरण आखण्यासाठी त्यांना वितरण तज्ज्ञांना कामाला लावावे लागले आहे. ज्या कंपन्यांच्या मालकांकडे भरपूर पैसा आहे, त्यांच्यासाठी ही किरकोळ बाब आहे, असे आपल्या मनात येईल, मात्र सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग चालवणाऱ्यांचे काय? त्यांच्याकडे तर अतिशय मर्यादित साधनसंपत्ती असते. अशा उद्योजकांसाठी त्यांचे उत्पादन बाजारात उतरवणे आणि त्याची सतत विक्री होईल, असे प्रयत्न करणे हे खरोखच अत्यंत कठीण काम आहे. या उद्योजकांना स्थानिक तसेच परदेशी उत्पादकांच्या उत्पादनाबरोबरच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. तर, या समस्येवर काही उपाय आहे का? याची चर्चा करण्याआधी आपल्याला काही प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील.

अ) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग म्हणजे नेमके कोणते उद्योग?

उत्तर : स्पष्टीकरणासाठी बॉक्स क्रमांक १ पहा.

ब) एकूण नोंदणीकृत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा सध्याचा आकडा काय आहे?

उत्तर : देशभरात असे एकूण ६५ लाख ९१ हजार ८७० उद्योग आहेत. यामध्ये १५ लाख ६३ हजार ९७४ उद्योग लघुउद्योगांतर्गत नोंदणी झालेले उद्योग, स्वयंउद्योग करारांतर्गत नोंदवलेले २१ लाख ९६ हजार ९०२ उद्योग अणि उद्योग आधार करारांतर्गत नोंदवलेले २८ लाख ३० हजार ९९४ उद्योग या सगळ्यांचा समावेश आहे.

क) या उद्योगांचे आपल्या अर्थव्यवस्थेतले योगदान काय आहे?

उत्तर : भारत सरकारचे संख्याशास्त्रीय माहितीचे भंडार असलेले जे केंद्रीय सांख्यिकी कार्यालय आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांमधे देशाच्या मूल्यवर्धनामधले योगदान अनुक्रमे ३२ पूर्णांक २६ शतांश टक्के, ३१ पूर्णांक ८६ शतांश टक्के आणि ३१ पूर्णांक ६ दशांश टक्के इतके आहे आणि त्यांचे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातले २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांमधे योगदान अनुक्रमे २९ पूर्णांक ७६ शतांश टक्के, २९ पूर्णांक ३९ शतांश टक्के आणि २८ पूर्णांक ७७ शतांश टक्के राहिले आहे.

ड) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे रोजगार निर्मितीत काय योगदान आहे?

उत्तर : वर्ष २००६-०७ च्या संदर्भावर आधारीत २००९ सालापर्यंतची माहिती गोळा करुन २०११-१२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या चौथ्या अखिल भारतीय जनगणनेनुसार तसेच केंद्रीय सांख्यिकी संघटनेने केलेल्या आर्थिक मुद्यांवर आधारीत जनगणना २००५ मधल्या आकडेवारीनुसार या उद्योगांनी सुमारे ८ कोटी ५ लाख इतकी रोजगार निर्मिती केली. देशातली उद्योगांची संघटना, भारतीय उद्योग संघाने काढलेल्या आकडेवारी नुसार या उद्योगांमुळे सुमारे १२ कोटी व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला.

इ) या उद्योगांचा एकूण निर्यातीतला वाटा किती?

उत्तर : अंदाजे ४५ टक्के.

वरती मांडण्यात आलेल्या उत्तरांमधल्या सत्यानुसार, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग देशाच्या अर्थव्यस्थेत खूप महत्त्वाची भूमिका निभावतात हे स्पष्ट झाले आहे. उद्योगांच्या आवाक्याकडे दुर्लक्ष केले, तर हे उद्योग इतर कोणत्याही प्रस्थापित उद्योगांप्रमाणेच आहेत आणि त्यांनाही त्यांचा माल खपविण्यासाठी स्थानिक आणि परदेशी बाजारांमधे प्रयत्न करावे लागतात. मात्र त्यांच्याकडे, वितरण व्यवस्थेवर खर्च करण्याचे पर्याय आणि साधनसंपत्ती खूप मर्यादित असल्यामुळे सर्व प्रकारच्या पाठिंब्यासाठी त्यांना सरकारवर अवलंबून रहावे लागते. स्थानिक तसेच परदेशी बाजारपेठांमधे उत्पादन उतरवून ते यशस्वीपणे विकण्याच्या दृष्टीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मदत करण्यासाठी प्रामुख्याने सूक्ष्म आणि लघु उद्योगांना मदत करण्यासाठी सरकारने काही योजना सुरु केल्या आहेत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचा उल्लेख यापुढे आपण एमएसएमई असा करु.

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग देशाच्या अर्थव्यस्थेत खूप महत्त्वाची भूमिका निभावतात हे स्पष्ट झाले आहे.उद्योगांच्या आवाक्याकडे दुर्लक्ष केले, तर हे उद्योग इतर कोणत्याही प्रस्थापित उद्योगांप्रमाणेच आहेत आणि त्यांनाही त्यांचा माल खपविण्यासाठी स्थानिक आणि परदेशी बाजारांमधे प्रयत्न करावे लागतात. मात्र त्यांच्याकडे, वितरण व्यवस्थेवर खर्च करण्याचे पर्याय आणि साधनसंपत्ती खूप मर्यादित असल्यामुळे सर्व प्रकारच्या पाठिंब्यासाठी त्यांना सरकारवर अवलंबून रहावे लागते.**

**"विक्रीसाठी वितरण मदत योजना''** [MAS]

देशविदेशातली विविध प्रदर्शने, व्यापार, मेळावे, विक्रेता-खरेदीदार संमेलने, जाहीराती, चर्चासत्रे आणि संयुक्त सहभागासाठीचे प्रयत्न यांमधे सहभागी होण्यासाठी MSME ना मदत करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली. MSME मंत्रालयाच्या सार्वजनिक उद्योग विभागाने राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाच्या (NSIC) माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी केली आहे. सध्याच्या परिस्थितीत, संपूर्ण MSME क्षेत्राला (नोकरी विभागासह) शाश्वतता आणि पाठिंबा देण्याची निकड भासते आहे,

हे करताना ग्रामीण आणि सूक्ष्म उद्योगांना विशेष महत्त्व देणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्यासमोर सध्या असलेल्या आव्हानांचे संधींमध्ये रुपांतर करुन नवी उंची गाठण्यासाठी त्यांना सशक्त करण्याच्या दृष्टीने उपयुक्त उपाय शोधण्यासाठी त्यांना मदत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच मध्यम स्वरुपाचे उद्योग या योजनेचे लाभार्थी नसले तरीही ग्रामीण तसेच शहरी भागातल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या उत्पादनांचे आणि सेवांचे विक्री आणि वितरण करण्यासाठी ही योजना विशेषत्वाने कार्यान्वित करण्यात आली आहे.

**या योजनेची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे :-**

* या उद्योगांच्या विक्रीविषयक क्षमता आणि स्पर्धात्मकतेमधे वाढ करणे.

* MSMEs च्या कौशल्यांचे प्रदर्शन करणे.

* बाजारांच्या सध्याच्या प्रचलित पद्धतींविषयी आणि त्यांच्या उद्योगांवर होणाऱ्या परिणामांविषयी माहिती देऊन MSMEs च्या उद्योजकांचे ज्ञान अद्ययावत ठेवणे.

* MSMEs ची उत्पादने आणि सेवांच्या विक्री वितरणासाठी MSMEs ची एकत्रित संघटना बनवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे.

* मोठ्या मोठ्या खरेदीदार संस्थांशी विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी MSMEs ना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

* सरकारच्या विविध योजना आणि कार्यक्रमांची माहिती प्रसारित करण्यासाठी एक मुख्य स्रोत निर्माण करणे.

* सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची विक्रीविषयक कौशल्ये समृद्ध करणे.

**सध्याच्या परिस्थितीत, संपूर्ण MSME क्षेत्राला (नोकरी विभागासह) शाश्वतता आणि पाठिंबा देण्याची निकड भासते आहे, हे करताना ग्रामीण आणि सूक्ष्म उद्योगांना विशेष महत्त्व देणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्यासमोर सध्या असलेल्या आव्हानांचे संधींमध्ये रुपांतर करुन नवी उंची गाठण्यासाठी त्यांना सशक्त करण्याच्या दृष्टीने उपयुक्त उपाय शोधण्यासाठी त्यांना मदत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

या योजनेअंतर्गत होणाऱ्या विविध कार्यक्रमांमधे NSICs द्वारे परदेशात आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान प्रदर्शनांचे आयोजन करणे, तसेच आंतरराष्ट्रीय प्रदर्शने आणि व्यापार मेळाव्यांमधे भाग घेणे असे विविध उपक्रम राबवले जातात. यामुळे MSMEs ना विविध नव्या गोष्टींची ओळख होते. तसेच नव्याने उदयाला येऊन विकसित होणाऱ्या बाजारपेठांमधल्या व्यापाराच्या नवीन संधी शोधण्यासाठी देखिल याची मदत होते.

या योजनेमुळे भारतीय MSMEs ने उत्पादन केलेल्या वस्तू आणि देऊ केलेल्या सेवांचे तसेच विविध तंत्रज्ञानाचे योग्य प्रदर्शन होते आणि त्यामुळे या उद्योगांना व्यापाराच्या विविध संधींसोबतच व्यापाराला प्रोत्साहन, एकत्रित व्यापार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, विक्रीसाठीच्या विविध व्यवस्था आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परदेशात भारतीय MSMEs ची उजळ प्रतिमा उभी करण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट यामुळे साध्य करता येईल. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांचे आयोजन करण्याबरोबरच भारतीय MSMEs ठराविक आंतरराष्ट्रीय प्रदर्शने आणि व्यापार मेळाव्यात भाग घेतीलच हे NSIC सुनिश्चित करते. अशा प्रकारच्या सहभागामुळे भारतीय MSMEs ना आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या व्यापाराची ओळख होते तसेच त्या पातळीवर आपला व्यापार न्यायचे धैर्य त्यांच्यात येते. हे मेळावे तसेच प्रदर्शनांमधे भाग घेतल्यामुळे MSMEs ना असे व्यासपीठ उपलब्ध होते, जिथे अनेक उद्योजक भेटतात, चर्चा करतात, त्यांच्यात तंत्रज्ञान देवाणघेवाणीसाठी तसेच व्यापारविषयक सहकार्याचे करार मदार होतात.

"विक्रीसाठी मदत आणि तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण करण्यासाठीची सुधारीत योजना''

स्थानिक किंवा देशांतर्गत बाजार

याअंतर्गत राज्य किंवा जिल्हा पातळीवर स्थानिक व्यापाऱ्यांची प्रदर्शने किंवा व्यापारी मेळावे यांच्यात सहभाग घेण्यासाठी आर्थिक मदत पुरवली जाते. या योजनेत खालील कामे हाती घेतली जातात

* देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठांमधे चाचपणी करुन तिथे विक्रीसाठी यंत्रणा उभी करण्याच्या उत्पादनक्षम MSMEs च्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

* राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधे उत्पादनाची विक्री विषयक योग्यता वाढवण्यासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योग करणाऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे बार कोडींग करुन घेण्यासाठी प्रोत्साहन देणे.

* सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठीच्या सार्वजनिक खरेदी धोरणाच्या अनुषंगाने विक्रीसाठीचे दुवे शोधायला मदत करणे.

* विक्री व्यवस्थेमध्ये उत्पादनाच्या व्यवस्थित पॅकेजिंगचे महत्त्व, अत्याधुनिक पॅकेजिंग तंत्रज्ञान, आयात-निर्यात विषयक धोरण आणि ते अंगिकारण्यासाठीची कार्यपद्धती, आंतरराष्ट्रीय व्यापारातली सध्याची परिस्थिती इत्यादींबाबत MSMEs मधे जागृती निर्माण करणे आणि MSMEs ना याबद्दल शिक्षित करणे. यासाठी MSMEs क्षेत्राशी संबंधित विषय, पॅकेजिंग, विक्री व्यवस्था यावर आधारीत आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय पातळीवर कार्यशाळा आणि चर्चासत्राचे आयोजन करणे.

या योजनेतून आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योगांनी आधी सरकारकडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. MSME विकास संस्था अर्थात MSME-DI ही योजना लागू करण्यासाठी

कोष्टक क्रमांक १

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची व्याख्या

| सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ नुसार MSMEs चे दोन गटात वर्गीकरण होते | |
|---|---|
| **उत्पादन करणारे उद्योग** | **सेवा देणारे उद्योग** |
| कारखान्यातून किंवा एखाद्या छोट्या प्लँटमधे कामगार किंवा यंत्रांचा उपयोग करुन विशिष्ट नाव किंवा गुणवत्ता आणि वापर असलेल्या गोष्टीचे उत्पादन करणारे उद्योग कारखान्याची आणि यंत्रांमधली गुंतवणूक बघून कारखाना किंवा उद्योगाची व्याप्ती निश्चित करतात. | या गटात विविध प्रकारच्या सेवा देणारे किंवा पुरवणारे उद्योग येतात त्यांना लागणाऱ्या साधनांच्या किंमतीच्या गुंतवणुकीवरुन त्यांची वर्गवारी करतात. |

| उद्योग | कारखाना आणि यंत्रांतील गुंतवणूक | उद्योग | त्यासाठी लागणाऱ्या साधनांमधली गुंतवणूक |
|---|---|---|---|
| सूक्ष्म | २५ लाख रुपयांपर्यंत | सूक्ष्म | १० लाख रुपयांपर्यंत |
| लघु | २५ लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत | लघु | १० लाख ते २ कोटी रुपयांपर्यंत |
| मध्यम | ५ कोटी ते १० कोटी रुपयांपर्यंत | मध्यम | २ कोटी ते ५ कोटी रुपयांपर्यंत |

नेमलेली संस्था आहे. सूक्ष्म किंवा लघु उद्योग भाग घेऊ शकतील, अशा देशांतल्या व्यापार मेळाव्यांची तसेच प्रदर्शनाची निवड एक समिती करते. MSME विकास संस्थेचे अध्यक्ष या समितीचे संचालक असतात आणि संस्थेचे ज्येष्ठ अधिकारी आणि औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी हे समितीचे इतर सदस्य असतात. एकदा या समितीने पात्र व्यापार मेळावे आणि प्रदर्शनांची यादी तयार केली की, ती अंतिम मंजुरीसाठी MSME च्या विकास आयुक्तांच्या कार्यालयाकडे पाठवली जाते. अंतिम मंजुरी मिळालेल्या मेळावे किंवा प्रदर्शनांमधे सहभागी होण्यासाठी MSME विकास संस्था जास्तीत जास्त दहा सूक्ष्म किंवा लघु उद्योगांची शिफारस करु शकते. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्वानुसार उद्योजकांना एकापेक्षा जास्त MSME विकास संस्थांद्वारे सूक्ष्म आणि लघु उद्योगांचे उद्योजक एखाद्या मेळाव्यात किंवा प्रदर्शनात भाग घेऊ शकतात ही शक्यता लक्षात घेता, या उद्योजकांच्या सहभागाला अंतिम मंजुरी देण्याचे काम MSME चे विकास आयुक्त करतील. ज्या मेळाव्यात किंवा प्रदर्शनात सहभागी व्हायचे आहे त्याचा आकार आणि सूक्ष्म नि लघु उद्योगांना त्यापासून होणारा फायदा लक्षात घेऊन एखाद्या प्रदर्शनात जास्तीत जास्त किती उद्योग किंवा उद्योजक सहभागी होतील हे ठरविले जाईल.

**सूक्ष्म आणि लघुद्योगांना देण्यात येणारे आर्थिक पाठबळ**

* प्रदर्शनातल्या जागेचे भाडे: सर्वसामान्य वर्गात मोडणाऱ्या उद्योजकांना जागेच्या भाड्याच्या ८० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमाती, महिला, ईशान्येकडच्या राज्यातले उद्योजक तसेच शारिरीक दृष्ट्या दिव्यांग व्यक्तींनी चालवलेल्या उद्योगांसाठी १०० टक्के भाडे अथवा २०,०००/- रुपये यापैकी जे कमी असेल ते या योजनेतून उद्योजकांना दिले जाईल.

**आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावे किंवा प्रदर्शनांमध्ये भाग घेण्यासाठी सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना एका आर्थिक वर्षात फक्त एकदाच आर्थिक मदत घेता येते. उद्योजकांनी कितीही एककांसह भाग घेतला तरीही त्याने या नियमात फरक होत नाही. तसेच, एका आर्थिक वर्षात केवळ एकच व्यक्ती एका उद्योगाचे प्रतिनिधीत्व करु शकते.**

* आकस्मिक निधी : सर्व प्रकारच्या खर्चांच्या प्रकारासाठी सगळ्या सहभागी उद्योजकांना आकस्मिक निधी दिला जाईल. प्रत्यक्ष आलेला खर्च किंवा १०,०००/- रुपये यापैकी जी कमी असेल ती रक्कम अदा केली जाईल.

या योजनेतून एका वर्षात जास्तीत जास्त दोन वेळा एका उद्योजकाला आर्थिक मदत देऊ केली जाते आणि एका प्रदर्शन अथवा मेळाव्यासाठी या योजनेतून एकूण १० लाखांची आर्थिक मदत द्यायची परवानगी आहे.

**'आंतरराष्ट्रीय बाजार'**

सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या उत्पादनांना परदेशी बाजारपेठांमधे शिरकाव करुन तिथे जम बसविण्यासाठी देखिल ही योजना प्रोत्साहन देते. इथे सुद्धा MSME विकास संस्थाच या योजनेच्या अंमलबजावणीचे काम करते. आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावे आणि प्रदर्शनांची नावे निश्चित करायचे काम MSME विकास आयुक्तांचे कार्यालयच करते. सूक्ष्म आणि लघु उद्योगांना भाग घेण्यासाठी ऑनलाईन किंवा ठराविक नमुन्यातले अर्ज वेळेच्या आत म्हणजे प्रदर्शनाच्या तारखेच्या दोन महिने आधी भरुन द्यावे लागतात. इथे देखिल 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या धर्तीवरच सहभागी उद्योजकांना प्रवेश दिला जातो. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या प्रदर्शनांमधे किंवा व्यापार मेळाव्यांमधे भाग घेताना सहभागी उद्योजकांच्या उत्पादनाच्या दर्जाला प्रचंड महत्त्व असते. हे लक्षात घेता, अशा प्रदर्शनांमधे सहभागी होणाऱ्या उद्योगांना ISO ९०००/१४००० प्रमाणपत्र मिळाले असेल, तर त्यांना प्राधान्यक्रम किंवा जास्त पसंती दिली

जाते. एका समितीद्वारे उद्योगांची नावे निश्चित केली जातात आणि MSME विकास आयुक्तांच्या कार्यालयाकडून त्यांना अंतिम मंजुरी दिली जाते.

निवड झालेल्या सूक्ष्म आणि लघुद्योगांना आर्थिक मदत पुरवली जाते.

* प्रदर्शनातल्या जागेचे भाडे : सर्वसाधारण वर्गातल्या उद्योजकांना भाड्याच्या ८० टक्के रक्कम तर अनुसूचित जाती, जमाती, महिला तसेच ईशान्येकडच्या राज्यातल्या उद्योजकांना १०० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १ लाख यापैकी जी कमी असेल ती रक्कम उद्योजकांना दिली जाते.

* विमान प्रवासाचा खर्च: प्रदर्शनात भाग घेणाऱ्या प्रत्येक उद्योगाच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीचा सामान्य वर्गाचा १०० टक्के विमान प्रवासाचा खर्च किंवा सव्वा लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती दिली जाते.

आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावे किंवा प्रदर्शनांमध्ये भाग घेण्यासाठी सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना एका आर्थिक वर्षात फक्त एकदाच आर्थिक मदत घेता येते. उद्योजकांनी कितीही एककांसह भाग घेतला तरीही त्याने या नियमात फरक होत नाही. तसेच, एका आर्थिक वर्षात केवळ एकच व्यक्ती एका उद्योगाचे प्रतिनिधीत्व करु शकते. या योजनेखाली एका प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व उद्योगांसाठी जास्तीत जास्त २५ लाखांचा निधी खर्चण्याची परवानगी असते.

'विक्री, सार्वजनिक खरेदी व्यवस्था, पॅकेजिंग यांच्याशी संबंधित कार्यशाळा, चर्चासत्रे'

या प्रकारच्या कार्यशाळा तसेच चर्चासत्रांचे आयोजन करुन नवीन विक्री कौशल्याची तंत्रे, जागतिक पातळीवर उदयाला येत असलेल्या विक्रीच्या कल्पना, विविध उत्पादनांच्या आणि सेवांच्या विक्रीतले नाविन्यपूर्ण कौशल्य तसेच पॅकेजिंगमधल्या नवनवीन तंत्रज्ञानाविषयी त्यातल्या विकासाविषयी उद्योजकांचे ज्ञान अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला जातो. त्या सोबतच MSME क्षेत्रांशी संबंधित विषय आणि केंद्रीय मंत्रालय, त्यांचे विभाग, केंद्र सरकारशी संबंधित सार्वजनिक उपक्रम यांच्या खरेदी प्रक्रियेविषयी सुद्धा अशा कार्यशाळा, तसेच चर्चासत्रांमधून उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीविषयी उपयुक्त माहिती मिळते. या गोष्टींच्या आयोजनाची जबाबदारी MSME विकास संस्थांना दिलेली आहे.

**बारकोडींग पद्धत अवलंबण्याचे फायदे लक्षात घेऊन सरकारने MSME विकास संस्थांच्या माध्यमातून बारकोडींग सुरु करणाऱ्या सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना त्यांची विक्री व्यवस्थेतली स्पर्धात्मकता वाढावी म्हणून आर्थिक पाठबळ देऊ केले आहे. या योजनेअंतर्गत बारकोड वापरण्यासाठी नोंदणी करणाऱ्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना एकदा भराव्या लागणाऱ्या नोंदणी शुल्काच्या ७५ टक्के शुल्क परत केले जाते.**

*बारकोड मिळवल्यानंतर होणारी शुल्काची परतफेड

बारकोड हा यंत्राला वाचता येण्याजोगा काही आकडे आणि विविध रुंदीच्या समांतर पट्ट्या उत्पादनावरही छापलेला सांकेतिक क्रमांक असतो. या बारकोडमुळे यंत्राला हे उत्पादन कोणते आहे, ते तर समजतेच, त्याबरोबरच प्रत्येक उत्पादनाचे बारकोडींग करण्यामुळे व्यवसायकर्ते आणि व्यावसायिक संघटनांना विविध उत्पादने, त्यांच्या किंमती आणि त्यांच्या साठ्याविषयी कॉम्प्युटरच्या सॉफ्टवेयर यंत्रणेद्वारे माहिती मिळवणे सोपे जाते. तसेच या पद्धती केंद्रीकृत व्यवस्थापन प्रणालीचे कार्य व्यवस्थित होते, उद्योगाच्या उत्पादकता आणि कार्यक्षमतेमधे आश्चर्यकारक सकारात्मक बदल घडून येतात. बारकोडींग पद्धत अवलंबण्याचे फायदे लक्षात घेऊन सरकारने MSME विकास संस्थांच्या माध्यमातून बारकोडींग सुरु करणाऱ्या सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना त्यांची विक्री व्यवस्थेतली स्पर्धात्मकता

वाढावी म्हणून आर्थिक पाठबळ देऊ केले आहे. या योजनेअंतर्गत बारकोड वापरण्यासाठी नोंदणी करणाऱ्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना एकदा भराव्या लागणाऱ्या नोंदणी शुल्काच्या ७५ टक्के शुल्क परत केले जाते. तसेच पहिल्या तीन वर्षांमधे जे वार्षिक शुल्क भरावे लागते, त्याचाही ७५ टक्के भाग उद्योजकांना परत केला जातो. भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या GST India (या पूर्वीची EAN India) या स्वायत्त संस्थेकडे बारकोड वापरण्यासाठीच्या नोंदणीची परवानगी देण्याचा अधिकार आहे.

**" विक्रेता विकास कार्यक्रम''**

व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी खरेदीदार आणि विक्रेता यांना एकत्र आणणारे हे एक व्यासपीठ आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या MSME विकास संस्थांकडून अशा विक्रेता विकास कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व्यापारासाठी सामायिक व्यासपीठ देण्याबरोबरच उत्पादनांबाबत खरेदीदार संघटनांच्या नवनव्या अपेक्षा समजून घेऊन विक्रेता संघटनांना एकमेकांशी चर्चा करता यावी आणि व्यापार वाढवण्याच्या दृष्टीने पावले उचलता यावी, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यावेळी छोट्या प्रमाणावर व्यापार करणारे उद्योजक आणि त्यांचे औद्योगिक प्रकल्प यांची क्षमता दाखवण्याची नामी संधी या कार्यक्रमामुळे उद्योजकांना उपलब्ध होते आहे. सार्वजनिक क्षेत्रातले उद्योजक, लष्कराच्या सर्व शाखा, रेल्वे विभाग आणि इतर तत्सम खरेदीदार संस्थांनी परदेशातून अव्वाच्या सव्वा किंमतीला आयात केली असती, अशी उत्पादने योग्य किंमतीत मिळवण्यासाठी या खरेदीदारांना असे कार्यक्रम खूप सहाय्यकारी ठरले आहेत.

**प्रत्येक केंद्रीय मंत्रालय, विविध विभाग आणि सार्वजनिक उपक्रमांनी त्यांच्या एकूण वार्षिक आवश्यकतेच्या २० टक्के वस्तू किंवा सेवा सूक्ष्म आणि लघु उद्योगांकडून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या २० टक्क्यांपैकी ४ टक्के खरेदी अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांच्या मालकीच्या उद्योगांकडून करणे अनिवार्य आहे.**

MSME विकास संस्था दोन प्रकारचे विक्रेता विकास कार्यक्रम आयोजित करते. राष्ट्रीय पातळीवर अणि राज्य पातळीवर खूप मोठमोठ्या कंपन्या, विशेषत केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांशी संपर्क करण्यासाठी तीन दिवस चालणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरच्या विक्रेता विकास कार्यक्रमामुळे नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात. या कार्यक्रमामुळे MSMEs ना मोठ्या कंपन्यांसाठी विक्रेता व्हायला मदत होते. राज्य पातळीवरच्या विक्रेता विकास कार्यक्रमात राज्यात व्यापार करणाऱ्या फक्त एक दोन मोठ्या खरेदीदार संघटना भाग घेतात आणि त्यांची खरेदीदार-विक्रेता बैठकीत विक्रेत्या MSMEs शी चर्चा होते. विक्रेता विकास कार्यक्रमात सर्व सूक्ष्म, लघु, मध्यम तसेच मोठ्या उद्योगांचे प्रतिनिधी सहभागी होऊ शकतात.

**"विक्री विस्तारासाठी मदत''**

परदेशी बाजारात उत्पादन उतरवून तिथे विक्रीसाठी जम बसविणे याकरीता सूक्ष्म आणि लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. सूक्ष्म आणि लघु उत्पादनकर्त्यांची निर्यात वाढवण्याबरोबरच सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या प्रतिनिधींचा आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावे किंवा प्रदर्शनांमधे MSME India स्टॉलच्या माध्यमातून सहभाग वाढवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. बारकोडींगची पद्धत मोठ्या प्रमाणावर वापरली जावी आणि ती लोकप्रिय व्हावी, यासाठी ही योजना प्रयत्नही करते. या योजनेतून खालील उद्दिष्टांसाठी अर्थसहाय्य मिळते.

* MSME India स्टॉलच्या माध्यमातून सूक्ष्म आणि लघु उत्पादन उद्योगांनी आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावे आणि प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी

* उद्योग संघटना, निर्यात प्रोत्साहन सल्लागार मंडळे, तसेच भारतीय निर्यात संघटना मंडळांनी केलेल्या विशिष्ट बाजार सर्वेक्षण अभ्यासासाठी

* लघु उद्योग संघटनेने सुरु केलेल्या किंवा संघटना लढत असलेली फसवणुकीची प्रकरणे सोडविण्यासाठी

* बारकोडींगसाठी खर्च केलेल्या पैशांची परतफेड करण्यासाठी

परदेशी बाजारपेठांमधे उत्पादनांच्या निर्यातीची शक्यता आजमावून तिथे निर्यात वाढवण्यासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योग निर्यातदारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे.

*खरेदीसाठी प्राधान्यक्रम देण्याद्वारे बाजारपेठांचा पुरवठा

भारत सरकारने सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठीचा सार्वजनिक खरेदी धोरणासंबंधीचा आदेश २०१२ जारी केला. हा आदेश सर्व केंद्रीय मंत्रालये विभाग, केंद्र सरकारी विभागाच्या उद्योगांसाठी १ एप्रिल २०१२ पासून लागू झाला आहे. या आदेशानुसार प्रत्येक केंद्रीय मंत्रालय, विविध विभाग आणि सार्वजनिक उपक्रमांनी त्यांच्या एकूण वार्षिक आवश्यकतेच्या २० टक्के वस्तू किंवा सेवा सूक्ष्म आणि लघु उद्योगांकडून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या २० टक्क्यांपैकी ४ टक्के खरेदी अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांच्या मालकीच्या उद्योगांकडून करणे अनिवार्य आहे. (केंद्र सरकारच्या सार्वजनिक उपक्रमांकडून होणाऱ्या खरेदीच्या तपशीलासाठी टेबल क्र-१ पहा)

*चांगला दर्जा कायम राखण्यासाठी बाजारपेठांमधे जास्त चांगल्या मार्गाने प्रवेश''

---

**"आपण वस्तुंचे उत्पादन अशा प्रकारे करायला हवे की त्यात कोणताही दोष नसेल** (Zero Deffect) **आणि आपण निर्यात केलेल्या वस्तु कोणत्याही दोषामुळे कधीही परत केल्या जाणार नाहीत, याकडेही आपण कटाक्षाने लक्ष द्यायला हवे. आपण उत्पादन केलेल्या वस्तु दुष्परिणाम करणाऱ्या नसाव्यात आणि त्यांचे वातावरणावर कोणतेही वाईट परिणाम झाले नाही पाहिजेत'' या शब्दात पंतप्रधानांनी 'झेड'ची कल्पना स्पष्ट करुन सांगितली.**

---

आता महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग पुरवत असलेल्या सेवा असो की उत्पादने; ती सर्व उत्तम दर्जासाठीची मूलभूत परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतात का? या उद्योगांकडे बड्या उद्योग समुहांशी स्पर्धा करतील अशा मूलभूत दर्जा परीक्षण यंत्रणा नसतील हे नक्कीच, असे असले तरीही त्यांना बड्या उद्योगांशी स्पर्धा करावीच लागणार. त्यासोबतच निर्यात बाजारात त्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांशी सुद्धा टक्कर द्यावी लागणार हे स्पष्ट आहे. मग, अशा परिस्थितीत या छोट्या उद्योगांनी काय करायचे? कुठली यंत्रणा अवलंबायची? इथे झेड (ZED) ही कल्पना उपयोगी होईल. स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत:च 'झेड'ची कल्पना विषद केली होती. "आपण वस्तुंचे उत्पादन अशा प्रकारे करायला हवे की त्यात कोणताही दोष नसेल (Zero Deffect) आणि आपण निर्यात केलेल्या वस्तु कोणत्याही दोषामुळे कधीही परत केल्या जाणार नाहीत, याकडेही आपण कटाक्षाने लक्ष द्यायला हवे. आपण उत्पादन केलेल्या वस्तु दुष्परिणाम करणाऱ्या नसाव्यात आणि त्यांचे वातावरणावर कोणतेही वाईट परिणाम झाले नाही पाहिजेत'' या शब्दात पंतप्रधानांनी 'झेड'ची कल्पना स्पष्ट करुन सांगितली.

उत्पादन क्षेत्रातल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी "Zero Effect आणि Zero Deffect'' असलेल्या वस्तुंचे खात्रीशीर उत्पादन करण्याची हमी म्हणून केंद्र सरकारने आर्थिक पाठिंबा देणारी योजना सुरु केली आहे. या योजनेची उद्दिष्टे

खालीलप्रमाणे आहेत.

* MSMEs मधल्या दोषरहित उत्पादन प्रक्रियेसाठी योग्य वातावरण निर्माण करणे.

* उत्पादन प्रक्रियेमधे उत्तम दर्जाची साधने तसेच यंत्रणा आणि कार्यक्षम ऊर्जा यांच्या वापरासाठी अधिकाधिक प्रोत्साहन देणे.

* उत्तम दर्जाच्या वस्तुंचे उत्पादन करण्यासाठी MSMEs ना सक्षम करणे.

* उत्पादने तसेच प्रक्रियांच्या दर्जाचे मानदंड सतत उंचावत ठेवण्यासाठी MSMEs ना प्रोत्साहित करत राहणे.

* उत्पादन प्रक्रिया दोषरहित करण्यासाठी आणि पर्यावरणावर या प्रक्रियेमुळे वाईट परिणाम होणार नाहीत याची काळजी घेण्यासाठी उत्पादन प्रक्रियेत योग्य ते बदल स्विकारायला लावणे.

* 'मेक इन इंडिया' मोहिमेला संपूर्ण सक्रीय पाठिंबा देणे.

* दोषरहित उत्पादन प्रक्रिया आणि प्रमाणिकरणाच्या क्षेत्रातले तज्ञ व्यावसायिक तयार होतील याकडे लक्ष पुरवणे.

**सूक्ष्म उद्योगांमधल्या गुंतवणुकीची मर्यादा २५ लाखांवरुन ५० लाख, लघु उद्योगामधल्या गुंतवणुकीची मर्यादा ५० लाख ते १० कोटीच्या सध्याच्या मर्यादेपासून २५ लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत, तर मध्यम उद्योगांमधल्या गुंतवणुकीची मर्यादा सध्याच्या रुपये ५ कोटी ते १० कोटींच्या पासून १० कोटी ते ३० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.**

ZED Maturity Accessirient Model म्हणजेच प्रक्रिया आणि उत्पादने संपूर्ण दोषरहित झाली असल्याची खात्री पटवून घेण्यासाठीच्या परिक्षण नमुन्यात ZED Rating साठी ५० मापदंड आणि ZED Defence Rating साठी अतिरिक्त २५ मापदंड ठरविण्यात आलेले आहेत. ZED प्रमाणपत्र मिळवण्यासाठी ज्या विविध गोष्टी कराव्या लागतात त्यासाठी MSMEs ना केंद्र सरकार आर्थिक मदत पुरविते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आकलन, परिक्षण, श्रेणी ठरविणे, संरक्षणाच्या दृष्टीकोनातून अधिक कडक परिक्षण, प्रक्रियेतल्या त्रुटींचे विश्लेषण, परस्पर सहकार्य, तज्ञांकडून MSMEs ची श्रेणी

कोष्टक क्रमांक २

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांकडून विविध वर्षी झालेली खरेदी

(केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रीय उद्योग मंडळाच्या अहवालानुसार / आकडेवारी कोटी रुपयांमधे)

| वर्ष | एकूण खरेदी | अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांच्या मालकीच्या उद्योगांमधून झालेली खरेदी |
|---|---|---|
| २०१४-१५ (१३३ केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातले उद्योग | १३१७६६.८६ | १५३००.५७ |
| २०१५-१६ (११६ उद्योग) | १३४८४८.१४ | १८२४६.१५ |
| २०१६-१७ (६० उद्योग) | ५५२९१.६४ | १३२८८.९६ |

सुधारण्यासाठी दिला जाणारा सल्ला आणि पुर्नपरिक्षण व पुर्नश्रेणीकरण या सगळ्या प्रक्रिया ZED प्रमाणपत्र मिळविण्यासाठी MSMEs ना पूर्ण कराव्या लागतात. त्यासाठीच्या खर्चाचा भार हलका करण्यासाठी सरकार मदत निधी देते.

या योजनेमधे २२,२२२ MSMEs ची श्रेणी निश्चित केली जाईल नि दोषरहित प्रक्रियेच्या संपूर्णतेसाठी त्यांचे परीक्षण होईल. ५००० MSMEs ना विशेष संरक्षण चाचण्या देऊन मग त्यांचे परीक्षण नि प्रमाणिकरण होईल. सहयोग, सल्लागार, त्रुटींचे परिक्षण करुन त्या टाळण्यासाठी ७,३६८ MSMEs ना पाठबळ दिले जाईल. या प्रकल्पासाठी एकूण ४९१ कोटी रुपयांचा खर्च येणार असून, त्यापैकी ३६५ कोटी रुपये केंद्र सरकार देणार असून, लाभार्थी MSMEs नी १२६ कोटी रुपयांचा भार उचलायचा आहे. ZED च्या अंमलबजावणीचे राष्ट्रीय पातळीवरचे निरिक्षण आणि अंमलबजावणीचे अधिकार भारतीय दर्जा मंडळाला दिलेले आहेत. आतापर्यंत ZED प्रमाणिकरणासाठी ३२०० MSMEs नी नोंदणी केली आहे.

या सगळ्या योजनांचा उत्तम फायदा असा आहे की सर्व विशिष्ट विभागांना डोळ्यासमोर ठेवून या सर्व योजना तयार केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या मदतीने MSMEs ची उत्पादने आणि सेवांची विक्री तर वाढतेच पण त्यासोबतच त्यातून लक्षणीय प्रमाणात रोजगार निर्मितीदेखिल होते. उदाहरणार्थ खादी ग्राम आणि उद्योग महामंडळातल्या विक्री विकास योजनेसाठी ३४१ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी देण्यात आला. यातून २०१६-१७ या वर्षात तेराशे कोटी रुपयांच्या खादीचे उत्पादन होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आणि या सगळ्यातून साडे-एकोणीस लाख व्यक्तींना रोजगार मिळेल, असा अंदाज आहे. बाजारपेठेत शिरकाव महत्त्वाचा आहे, यात शंकाच नाही मात्र MSMEs ना पुन्हा नव्या परिभाषेत बसवायला हवे, जेणेकरुन वेगाने बदलत्या व्यावसायिक वातावरणाप्रमाणे बदलण्यासाठी MSMEs ना पुरेसा निधी उपलब्ध होईल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ मध्ये सुधारणा करण्यासाठी मोदी सरकारने २०१५ मधे संसदेत विधेयक सादर केले होते. या कायद्यामुळे सुमारे ११ वर्षांपूर्वी MSMEs चे निकष निश्चित झाले होते. तेव्हापासून आतापर्यंत किंमत निर्देशांक आणि कच्च्या मालाच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. व्यवसायांच्या वातावरणातही खूप बदल घडला आहे. अनेक MSMEs आता देशातल्या आणि जागतिक पातळीवरच्या व्यवसायांच्या साखळीचा भाग बनल्या आहेत. हे लक्षात घेता सूक्ष्म उद्योगांमधल्या गुंतवणुकीची मर्यादा २५ लाखांवरुन ५० लाख, लघु उद्योगामधल्या गुंतवणुकीची मर्यादा ५० लाख ते १० कोटीच्या सध्याच्या मर्यादेपासून २५ लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत, तर मध्यम उद्योगांमधल्या गुंतवणुकीची मर्यादा सध्याच्या रुपये ५ कोटी ते १० कोटींच्या पासून १० कोटी ते ३० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. अर्थात ही वाढ उत्पादन करणाऱ्या MSMEs साठीच लागू करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे जर, MSMEs सेवा क्षेत्रात कार्यरत असतील, तर सूक्ष्म उद्योगांमधली गुंतवणूक १० लाखांवरुन २० लाख रुपये, लघु उद्योगांमधली गुंतवणूक १० लाख ते २ कोटी रुपयांच्या मर्यादेपासून २५ लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. मध्यम उद्योगांमधली गुंतवणूक मर्यादा सध्याच्या २ कोटी ते ५ कोटी रुपयांवरुन १० कोटी ते १५ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

मर्यादा वाढवण्याची शिफारस करणारे विधेयक संसदेत प्रलंबित आहे. MSMEs ना अधिक सशक्त करण्यासाठी हे विधेयक मंजूर होणे आवश्यक आहे. इतर अनेक विक्री योजनांसोबत ही सुधारणा झाली तर MSMEs ना नवी उंची प्राप्त होईल.

■■■

*लेखक आर्थिक आणि व्यापारविषयक ज्येष्ठ पत्रकार असून सध्या एबीपी न्यूजमध्ये व्यापार संपादक आहेत.*

*email: hblshishir@email.com*

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या अर्थपुरवठ्यातील आव्हाने

**-अनिल भारद्वाज**



**सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि तांत्रिक परिमाणांपलिकडे समाजास होणारे थोर योगदान प्रत्येकजण जाणतोच. त्याच वेळी, या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना अर्थसहाय्य मिळवण्यात अतिशय अडचणींना सामोरे जावे लागते याबद्दल समाजात मत्यैवक आहे. विकसित देश ते विकसनशील देश असा थोडाफार फरक असला तरी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी मात्र अर्थसहाय्यात होणारा तुटवडा सर्वदूर सारखाच आहे.**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे सर्वत्र अर्थव्यवस्थेचा कणा मानले जातात. त्याचे सामाजिक आर्थिक, राजकीय आणि तांत्रिक परिमाणांपलिकडे समाजास होणारे थोर योगदान प्रत्येकजण जाणतोच. त्याच वेळी, या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना अर्थसहाय्य मिळवण्यात अतिशय अडचणींना सामोरे जावे लागते याबद्दल समाजात मत्यैवक आहे. विकसित देश ते विकसनशील देश असा थोडाफार फरक असला तरी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी मात्र अर्थसहाय्यात होणारा तुटवडा सर्वदूर सारखाच आहे. आयएफसी/मॅकिंग्से च्या अंदाजानुसार जगभरातील औपचारिक आणि अनौपचारिक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना मिळणा-या अर्थामधील अंतर हे ३.९ ट्रिलियन डॉलर असून त्यांपैकी २.१ ते २.६ ट्रिलियन डॉलर उभरत्या बाजारपेठेमध्ये आहे.

### सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांवर एक धावती नजर

भारताकडे पाहताना, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची गुंतवणूक यंत्रसामुग्री आणि संयंत्रांच्या परिमाणात मोजली जाते. अन्यथा जगभरात सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग हे वार्षिक उलाढाल आणि रोजगार यातच गणले जातात.

*तक्ता : सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची व्याख्या*

| प्रकार | उत्पादन | सेवा |
|---|---|---|
| | यंत्रसामुग्रीमधील गुंतवणूक (रु.) | उपकरणांमधील गुंतवणूक (रु.) |
| सूक्ष्म | २५ लाखांपर्यंत | १० लाखांपर्यंत |
| लघु | २५ लाखांपासून ते ५ कोटींपर्यंत | १० लाखांपासून ते २ कोटींपर्यंत |
| मध्यम | ५ कोटींपर्यंत ते १० कोटींपर्यंत | २ कोटींपर्यंत ते ५ कोटींपर्यंत |

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या मंत्रालयाने घेतलेल्या चौथ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या मोजणीच्या (२००६-०७) आणि सहाव्या अर्थविषयक गणनेच्या (२०१३) अंदाजानुसार ५.१३ कोटी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग भारतात कार्यरत आहेत आणि ११.१ कोटी लोकांना रोजगार देत आहेत.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांचे भारताच्या औद्योगिक उत्पादनात होणारे योगदान आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांचे सकल मूल्यवर्धन खालीलप्रमाणे:

| सद्य किमतींमध्ये उत्पादनांची मोजणी | | | स्थिर किमतीत २०११-१२ आर्थिक वर्षांत सकल घरगुती उत्पादना मध्ये एमएसएमईचे योगदान (%) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | एमएसएमईची उत्पादने (रु. १ कोटी) | एकूण उत्पादनातील एमएसएमईचा हिस्सा (%) | एमएसएमईचे उत्पादन क्षेत्र | | एमएसएमईचे सेवा क्षेत्र | | एकूण | |
| | | | सकल मूल्यवर्धनामध्ये | सकल घरगुती उत्पादनामध्ये | सकल मूल्यवर्धनामध्ये | सकल घरगुती उत्पादनामध्ये | सकल मूल्यवर्धनामध्ये | सकल घरगुती उत्पादनामध्ये |
| २०११-१२ | २१६७११० | ३३.१२ | ६.६४ | ६.१६ | २५.६६ | २३.८१ | ३२.२९ | २९.९७ |
| २०१२-१३ | २३८५२४८ | ३३.२२ | ६.७७ | ६.२७ | २६.०६ | २४.१३ | ३२.८९ | ३०.४० |
| २०१३-१४ | २६५३३२९ | ३३.२७ | ६.७९ | ६.२७ | २६.४० | २४.३७ | ३३.१९ | ३०.७४ |
| २०१४-१५ | २७८३४३३ | ३३.४० | ६.६३ | ६.११ | २६.७२ | २४.६३ | ३३.३४ | ३०.७४ |

एमएसएमईना होणारा एकूण कर्जाऊ अर्थप्रवाह (आऊटस्टॅडींग क्रेडीट इन रु.)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | खाजगी क्षेत्रातील बँका | परदेशी बँका | शेड्यूल्ड व्यापारी बँका |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१२ | ५,३३,२७९.२९ | १,२४,७२५.६६ | २३,३००.७१ | ६,८१,३०५.६६ |
| मार्च २०१३ | ६,४३,५२५.०२ (२०.७%) | १,८२,२४७.८२ (४६.१%) | ४३,२५१.३० (८५.६%) | ८,६९,०२४.१४ (२७.६%) |
| मार्च २०१४ | ७,५४,३११.०७ (१७.२%) | २,४६,०२५.७६ (३५.०%) | ३४,३५९.१७ (-२०.६%) | १०,३४,७७५.९९ (१९.१%) |

*स्रोत : आरबीआय*

*नोंद : कंसातील अंक एनपीए टक्केवारी दर्शवितात.*

एमएसएमईसाठी एकूण गैर निष्पादक मालमत्ता ( ग्रॉस एनपीएज )
(आऊटस्टॅडींग अमाऊंट रु मध्ये आणि एनपीए % मध्ये दर्शवले आहेत.)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | खाजगी क्षेत्रातील बँका | परदेशी बँका | शेड्यूल्ड व्यापारी बँका |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१२ | २४,२७२.४४ (६.१%) | १,८८०.७३ (१.७%) | १५९.८३ (०.७%) | २६,३१२.९९ (५.०%) |
| मार्च २०१३ | २८,५७५.२९ (५.७%) | २,५०६.४४ (१.६%) | ३९६.२३ (१.३%) | ३१,४७७.९६ (४.६%) |
| मार्च २०१४ | ३८,९४९.८० (६.३%) | ३,०२१.६३ (१.५%) | ४५७.३६ (१.५%) | ४२,४२८.७९ (५.०%) |

*स्रोत : आरबीआय* *नोंद कंसातील अंक एनपीए टक्केवारी दर्शवितात*

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांच्या चौथ्या गणनेवरुन लक्षात येते की, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांपैकी ९०% अर्थसहाय्य हे अनौपचारिक स्रोतांकरवी होते.

आपण कोणता माहिती संच घेतला आहे या विषयी लक्ष देण्याचे कारण नाही मात्र यावरुन सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना अर्थपुरवठा कमी पडतो हे उघड आहे.या क्षेत्रात एकूण ३२.५ लाख कोटी रुपयांची आत्यंतिक गरज भासते. यांपैकी २६ लाख कोटी रुपये ही कर्जाउढ मागणी आहे तर उर्वरित ६.५ लाख कोटी केवळ इक्विटी मागणी आहे.

तक्त्यानुसार, मार्च २०१६ च्या संकलित माहितीनुसार, अंदाजे १०.३४ लाख कोटी रुपये २ कोटी एमएसएमई कर्ज खात्यांमध्ये प्रलंबित असून हीच संख्या ११ लाख कोटी (अंदाजित) रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. याच अनुषंगाने सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांकरिता ५ कोटी कर्जधारकांना २६ लाख कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

यावरुन हे खात्रीदायकरित्या लक्षात येते की, सद्य आर्थिक स्थितीचा एक खूप मोठा भाग अर्थात सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग अजूनही उपेक्षित आहे.

काय बरे अडचणी असतील ज्यामुळे इतक्या प्रमाणात सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग संस्थात्मक आर्थिक प्रणालीच्या कक्षेबाहेर आहेत? माझे असे मत आहे की, या अडचणी दोन्ही मागणी तथा पुरवठयाच्या बाजूने आहेत.

### पुरवठा अनुषंगाने येणारे अडथळे

भारतीय बँकींग प्रणाली मध्ये एकूण २७ सार्वजनिक क्षेत्रातील बँका, २६ खाजगी बँका, ४६ परकीय बँका, ५६ क्षेत्रीय ग्रामीण बँका, १५७४ शहरी सहकारी बँका आणि ९३,९१३ ग्रामीण सहकारी बॅका समाविष्ट आहेत. त्याचबरोबर सहकारी पतपेढ्यांचीही सोय आहे. शासनाच्या थेट नियंत्रणाखाली सार्वजनिक क्षेत्रातील बँका ७०% हून अधिक बँकिंग प्रणालीतील मालमत्ता नियंत्रणात ठेवतात. भारत सरकारवर फार वर्षांपासून असा ठपका आहे की, वित्तीय तूट भरुन काढण्यासाठी राजकीय योजनांना पाठबळ देण्यासाठी आणि त्यांचे उद्दीष्ट्य पुरे करणारे प्रकल्पांना निधी पुरवठा करण्यासाठी या बँकांमध्ये ते निधी एकत्रित करुन ठेवतात.

प्रथमत: हे लक्षात घ्यावयास हवे की, केंद्र शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर कडक नियंत्रण असते.या बँका बँकिंग प्रणालीतील मजबूत दावेदार असतात. या

नियंत्रणामुळे स्पर्धा फिकी पडते व बँकांचे मालक आणि ग्राहक दोहोंनाही सर्वोत्तम परिणाम मिळू शकत नाहीत.

दुसरे म्हणजे बँका देशी व्यापारी बँका आणि २० पेक्षा जास्त शाखा असणाऱ्या परदेशी बँका यांना त्यांच्या ठेवीतील ४०% रक्कम ही प्राथमिक क्षेत्रावर व्यय करणे वा त्यांना कर्जाऊ देणे बंधनकारक आहे. प्राथमिक क्षेत्रात कृषीक्षेत्राचा अंतर्भाव होतो. त्यांस १८% रक्कम मिळणे आवश्यक आहे. त्याव्यतिरिक्त अंतर्भूत असणारी अन्य क्षेत्रे म्हणजे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग, शिक्षण, गृहनिर्माण उद्योग,निर्यात ऋण व इतर.

यावरुन ही बाब स्पष्ट होते की येथे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना ४०% पैकी कोणतीही ठराविक रक्कम प्राप्त होत नाही. सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग हे इतर क्षेत्रांना पर्यायी असल्याने घरबांधणी व शिक्षण अशा इतर पर्यायांकडे बँका आकृष्ट होतात.

तिसरा मुद्दा म्हणजे, औद्योगिक अर्थव्यवस्था हे स्पष्ट करते की, संस्थात्मक अर्थपुरवठ्यासाठी दोन आवश्यक बाबी आहेत. एक म्हणजे दीर्घकालासाठी पैसा कर्जाऊ देण्याची क्षमता (प्रकल्पांना उभारणीसाठी लागणारा अधिकतम काळ) आणि व्यापारी चक्र व तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी क्षेत्राचे तांत्रिक ज्ञान. १९५० ते १९६० या काळात औद्योगिक विश्वाची गरज भागवण्यासाठी आयडीबीआय वा आयसीआयसीआय सारख्या संस्था विशेष हेतूने उभारल्या गेल्या. १९९१ पर्यंतच्या काळात या विशिष्ट हेतूने उभारलेल्या औद्योगिक विकास अर्थपुरवठा करणा-या संस्था दीर्घ मुदतीचे भांडवल पुरवत असत तर बँका अल्प मुदतीचे भांडवल (वर्किंग कॅपिटल) पुरवत असत.

---

**तुलनात्मक दृष्ट्या विचार करता बँकांचा कल हा अल्पमुदतीच्या ठेवी स्वीकारण्यावर असतो व त्या ठेवी दीर्घ मुदतीने देण्यात त्यांना अडचण येत असते. कारण त्यामुळे त्यांचे आर्थिक असंतुलन होण्याचा धोका असतो.त्या त्या क्षेत्रीय जटीलतेचे निराकरण करण्याची तांत्रिक क्षमतेची उणीव असते. म्हणूनच, औद्योगिक प्रकल्पांना प्रोमोटर नसल्यास जोखीमेचे समजले जाते.**

---

याच धर्तीवर सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना अर्थपुरवठा करण्यासाठी राज्याराज्यांत, राज्य शासनाची आर्थिक महामंडळे (एसएफसी) उभारलेली असत. उदारीकरणाच्यानंतर विकासासाठी आर्थिक संस्थांनी बँकांना विस्तारीकरणासाठी वाव दिला - ज्यामध्ये एकतर त्या संस्था बँकांशी विलीन झाल्या वा एसएफसीला जोडल्या गेल्या.

**बँकांसमोरिल अडचणी :**

तुलनात्मक दृष्ट्या विचार करता बँकांचा कल हा अल्पमुदतीच्या ठेवी स्वीकारण्यावर असतो व त्या ठेवी दीर्घ मुदतीने देण्यात त्यांना अडचण येत असते. कारण त्यामुळे त्यांचे आर्थिक असंतुलन होण्याचा धोका असतो. त्या त्या क्षेत्रीय जटीलतेचे निराकरण करण्याची तांत्रिक क्षमतेची उणीव असते. म्हणूनच, औद्योगिक प्रकल्पांना प्रोमोटर नसल्यास जोखीमेचे समजले जाते. प्रकल्प मंजूरी देण्याचा निर्णय घेतानाही समित्या वा व्यापारी संघांच्या प्रस्तावांचा विचार करण्यात येतो, जेणेकरुन येणाऱ्या अपयशांसाठी स्वतंत्र बँकांना योग्य निर्णय घेता येईल. मोठे व्यापारी कुटुंबे आणि कॉर्पोरेट्स यांना याचा फारसा त्रास होत नाही. सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांमध्ये मात्र असे घडत नाही. येथे प्रोमोटर हे एकतर समाजास परिचित नसतात. ते नवोदित उद्योजक असतात. त्यामुळे अशा स्थितीत बँका एकतर त्यांना कोलॅटरल सिक्युरिटीज (सहाय्यक तारण) वर कर्ज देऊ करतात. कित्येक सूक्ष्म लघु व मध्यम उद्योजकांकडे गुणवत्ता आणि क्षमता असूनही ते मालमत्ता नसल्याने आवश्यक कर्ज मिळवण्यात अपयशी ठरतात आणि जे यशस्वी होतात त्यांपैकी खूप जण बरेचदा कर्जाच्या प्रमाणात उद्योगाचा डोलारा सांभाळू शकत नाहीत आणि प्रकल्पाला दुय्यमता प्राप्त होते.

आंतरराष्ट्रीय बँकिंग मानदंड – अर्थात बेसिल २ नियमांना स्वीकारल्यानंतर भारतामध्ये सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना अर्थपुरवठा मिळवणे अधिकच मुश्किल झाले. या नियमांना अनुसरुन आरबीआय आर्थिक संस्थांना या जोखीमेस निवारु शकेल इतपत सक्षम असा राखीव निधी ठेवण्याबद्दल सांगते. कार्पोरेट क्षेत्रातील ऋण हे मालमत्तेवर दिलेले नसते, याचा परिणाम म्हणून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांवर याचा भार येतो. यामुळेच बँकांना ५ कोटी पेक्षा अधिक रकमेसाठी क्रेडिट रेटींग एजन्सीकडून अंकन (रेटिंग) करुन घेण्यासाठी विचारले जाते. इतकेच नव्हे तर, आरबीआय ने बँकांना पूर्वसूचना देण्याची प्रणाली आत्मसात करण्याचे आवाहन केले आहे. अर्थात स्पेशल मेन्शन अकाऊंट (एस एम ए) करिता ३० दिवसाचा कालावधीत मुद्दल आणि व्याज यामध्ये फरक पडल्यास त्या खात्यासंबंधीची माहिती देण्याचे बंधन आरबीआयने घातले आहे. या आधी ही मुदत अंदाजे ९० दिवसांची होती. अशा त-हेने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या सर्व नियमांचा आघात सहन करीत आहे.

शेवटी हा मुद्दा लक्षात घ्यावयाला हवा की, एखाद्या अपयशी उद्योगाकडील वसूली ही अवघड बाब होऊन बसते. कार किंवा घर या सारख्या तारणांचा ताबा घेणे सोडले तर इतर तारण ताब्यात घेणे ही कठीण बाब आहे. कागदोपत्री यासाठी अनेक कायदेशीर उपाय दिसतात . कायदेशीर प्रक्रिया ही लांबलचक, कष्टप्रद आणि खर्चिक असल्याने बँकांच्या जोखीमेतील प्रतिकूलता वाढलेली दिसून येते.

**मागणीच्या अनुषंगाने येणारे अडथळे**

एमएसएमई म्हणजेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे भिन्न तऱ्हेच्या विभागांचे वेगवेगळ्या गरजा आणि वेगवेगळ्या आव्हानांचा मिलाफ असतो. सूक्ष्म उद्योग हे मोठ्या प्रमाणात अनौपचारिक व असंघटीत स्वरुपात जास्त आढळतात. बहुतांश सूक्ष्म उद्योग हे स्वतंत्र स्वरुपाचे मालकी असलेले वा भागिदारीतील व्यवसाय असतात. मर्यादित स्वरुपाची दायित्व (लायबिलिटी) असलेल्या कंपन्यांचा यामध्ये समावेश नसतो. यामध्ये गुंतलेले उद्योग हे जवळ जवळ अनधिकृत वा अननुमोदित जागांमधून काम करत असतात. यामागे असलेले कारण हेच की, ज्यामध्ये एकतर अधिकृत जागांची वानवा असते. वा उपलब्ध अधिकृत जागा त्या सूक्ष्म उद्योग चालकाला परवडू शकत नाहीत. एमएसएमईचा हा विभाग त्याचे अनौपचारिक स्वरुप आणि बँकांना आवश्यक असणाऱ्या माहितीची कागदोपत्रांची उणीव यामुळे आर्थिक समावेशनाची आव्हाने पेलताना दिसत आहे.

आता, लघुउद्योगांची स्थिती सूक्ष्म उद्योगांपेक्षा थोडी सुस्थितीत आढळते. एमएसएमईच्या या भागाचा तुलनेने संघटित क्षेत्रांत अंतर्भाव होतो. बी2बी परिघात काम करतो. यांना भेडसावणाऱ्या अडचणी म्हणजे – नवीन बिझनेस चालू करण्यासाठी लागणारे रिस्क कॅपिटल (जोखीम भांडवल) उभारताना येणाऱ्या अडचणी, कर्ज उत्पन्न करण्यासाठी तारण म्हणून मालमत्ता नसणे, मोठ्या ग्राहकांकरवी येणारी देणी ही कायम उशिरा प्राप्त होत असल्याने वर्किंग कॅपिटल उभारण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागणे.

**सूक्ष्म उद्योग हे मोठ्या प्रमाणात अनौपचारिक व असंघटीत स्वरुपात जास्त आढळतात. बहुतांश सूक्ष्म उद्योग हे स्वतंत्र स्वरुपाचे मालकी असलेले वा भागिदारीतील व्यवसाय असतात. मर्यादित स्वरुपाची दायित्व (लायबिलिटी) असलेल्या कंपन्यांचा यामध्ये समावेश नसतो. यामध्ये गुंतलेले उद्योग हे जवळ जवळ अनधिकृत वा अननुमोदित जागांमधून काम करत असतात.**

एमएसएमई क्षेत्रातील मध्यम उद्योग जगभरात मिटस्टँड म्हणून ओळखले जातात, जे अत्यंत मजबूत समजले जातात आणि योग्य परिमाणात हे उद्योग गतीमान असल्याने आश्वासक समजले जातात. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ते स्पर्धेत उतरु शकतात. इतके आश्वासक असूनही दुर्दैवाने हे भारताचा अत्यंत छोटा हिस्सा व्यापून आहेत. यामागील मोठे

कारण असे की लघुउद्योग त्यांच्या पातळीवर अयशस्वी होत असल्याने मध्यम उद्योगापर्यंत आकारास येऊच शकत नाहीत. वैश्विक स्तरावरील ५ कोटी एमएसएमई पैंकी २५००० कंपन्या सुध्दा मिटस्टँड क्लब मध्ये सामील होण्यास पात्र ठरल्या नाहीत. यासाठी भारतात बरेचदा 'मिसिंग मिडल' अशी संज्ञा वापरली जाते. बँकांकडून मिळणाऱ्या सहाय्याच्या दर्जामध्ये उणीव असण्याव्यतिरिक्त हा वर्ग काही अधिक अडचणींना सामोरे जातो. त्या अडचणी म्हणजे बँकांना लागणा-या सहाय्यक तारण, इक्विटी तथा मॅझेनाइन भांडवल मिळवणे, परकीय चलनातील बाह्य वाणिज्यिक उधार (ईसीबी), माफक (स्पर्धात्मक) दरात निधी रहित बँकिंग सुविधा (बँक गॅरेंटी तथा परफॉर्मन्स गॅरेंटी) इ.

**प्रतिसाद**

धोरणकारांनी यांपैकी बऱ्याच आव्हानांना लक्षात घेऊन त्यावर योग्य तो उपदेश केला आहे. गेल्या दोन वर्षांत प्रधानमंत्री जन धन योजनेसारखे बलाढ्य आर्थिक समावेशन कार्यक्रम राबवले गेले. याचा परिणाम म्हणून बँकिंग व्यवस्थेला किंचित हलकासा धक्का बसला. परिणामत संपूर्ण बँकिंग जगत हलले गेले. बँका या अगोदर कधीही बँकाशी संलग्न नसलेला अनौपचारिक क्षेत्राशी परिचित झाल्या.

बँकांना अतिरिक्त सुविधा देण्यासाठी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांसाठी क्रेडीट गॅरेंटी ट्रस्ट (CGTMSE) तयार केली गेली आहे. ज्यामुळे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना तारणाशिवाय कर्ज मिळू शकेल. ज्यामध्ये बँकांनी दिलेल्या कर्जाच्या ७५% रकमेपर्यंत विमा मिळवता येतो. २०१५-१६ करिता सीजीटीएमएसईने संकलित २३,२३,६७३ हमी कर्ज मिळवली असून त्याची रक्कम १,०८,९९१ कोटी इतकी आहे.

सिबिल, इक्विफॅक्स, एक्सिपेरिअन आणि हायमार्क भारतातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगबद्दलची माहिती देण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. ज्यामुळे त्यातील माहितीचा योग्य तो वापर करुन बुडीत हप्त्यांची काळजी घेतली जाईल.

**एमएसएमई क्षेत्रातील मध्यम उद्योग जगभरात मिटस्टँड म्हणून ओळखले जातात, जे अत्यंत मजबूत समजले जातात आणि योग्य परिमाणात हे उद्योग गतीमान असल्याने आश्वासक समजले जातात. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ते स्पर्धेत उतरु शकतात. इतके आश्वासक असूनही दुर्दैवाने हे भारताचा अत्यंत छोटा हिस्सा व्यापून आहेत.**

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना मदतीचे व्हावे यासाठी चल मालमत्तेचे नोंदीकरण सीइआरएसएआय ने सुरु केलेले आहे. या अंतर्गत कर्ज मिळवणे साठी या उद्योगांना चल मालमत्ताही तारण ठेवता येऊ शकेल.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांकरिता ग्रीन फिल्ड मध्ये प्रवेश तथा याहूनही अधिक म्हणजे बीएसई वा एनएसई ने एसएमई एक्सेंज करण्यासाठी मान्यता दिली आहे.

सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना विलंबाने प्राप्त होणाऱ्या देयकाचा प्रश्न सोडवण्यासाठी आरबीआय ने ट्रेड्स मध्ये काम करण्यासाठी तीन संस्थांना परवाना दिलेला आहे. हे मंच इलेक्ट्रॅनिक मार्गाने काम करतात.

शेवटी, अत्यंत महत्वाचा बदल म्हणजे इंडियन बँक्रप्सी अँड इन्सॉव्हन्सी कोड २०१६ ची निर्मिती. या संहितेनुसार मंडळाने काम करण्यास अगोदरपासून सुरुवात केली आहे. (सरकार प्रशासित) कॉर्पोरेट कंपन्या आणि व्यक्तिगत व्यवसाय (बहुतेकदा सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग) यांच्या साठी ची नियमावली निर्माण करण्यात आली आहे. सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग बद्दलच्या अस्वास्थ्याचे संपूर्ण आमुलाग्र परावर्तन करण्यासाठी आयबीआयसीची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामुळे अर्थपुरवठादारांकडून प्रभावित मालमत्ता त्वरित मालकीत येऊ शकतील वा कामी येऊ शकतील. ज्यायोगे अर्थव्यवस्थेत शिस्त आणि

विश्वास मूळ धरु लागेल. एनपीएचा प्रश्न सोडवण्यासाठी हा स्पृहणीय प्रयत्न आहे.

**पुढील मार्गक्रमण**

आधुनिक अर्थव्यवस्थेच्या सर्व गरजा या संस्थांच्या स्थापनेने पूर्ण झाल्या आहेत. आवश्यक असल्या तरी त्या गरजांची पूर्ती करण्यासाठी पुरेशा नव्हेत. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास कर्करोग झालेल्या रोग्याला जीवनसत्त्वे, चौरस व पथ्यकारी आहार आणि उत्तम व्यायाम हे गरजेचे असतातच मात्र जोवर कर्करोगाच्या पेशी नष्ट होत नाहीत तोवर रोगही बरा होत नाही.

इन्फॉर्मल – अनौपचारिक आणि अनऑर्गनाइझ्ड - असंघटित या दोन्ही संज्ञा आलटून पालटून वापरल्या गेल्या असल्या तरीही त्या वेगळ्या आहेत. इन्फॉर्मल – अनौपचारिक म्हणजेच व्यापारी संस्था जिची राज्याकडे अधिकृत नोंदणी झालेली नाही. (या संस्था शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट ॲक्टस किंवा एमएसएमई अंतर्गत येतात. तर संघटित क्षेत्र हे फॅक्टरीज ॲक्ट अंतर्गत काम करते आणि ज्यामध्ये किमान १० कामगार कार्यरत असतात.

सध्या आपण वर्षाकाठी १ कोटी जनतेसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे आव्हान झेलत आहोत. भारतीय अर्थव्यवस्था आणि बँकिंग प्रणालीमध्ये अधिक गंभीर आणि विस्तृत बदल करण्याची गरज कधीच नव्हती. येथे गरज आहे ती टेलिकॉम (संपर्क दळणवळण)

**सध्या आपण वर्षाकाठी १ कोटी जनतेसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे आव्हान झेलत आहोत. भारतीय अर्थव्यवस्था आणि बँकिंग प्रणालीमध्ये अधिक गंभीर आणि विस्तृत बदल करण्याची गरज कधीच नव्हती. येथे गरज आहे ती टेलिकॉम (संपर्क दळणवळण) प्रमाणे या क्षेत्रातही क्रांती आणण्याच, जेथे सेवापुरवठादार ग्राहकांचा माग काढतील. बँकिंग क्षेत्रातून शासनाने बाहेर जाणे इष्ट ठरेल.**

प्रमाणे या क्षेत्रातही क्रांती आणण्याच, जेथे सेवापुरवठादार ग्राहकांचा माग काढतील. बँकिंग क्षेत्रातून शासनाने बाहेर जाणे इष्ट ठरेल. आणि खाजगी सेवा पुरवठादारांना प्रवेश दिल्याने या क्षेत्रात पोषक स्पर्धा निर्माण होईल. दुसरे असे की, टेलिकॉम कंपन्या, डिजिटल फिनान्शिअल प्लॅटफॉर्म्स आणि फिन टेक कंपन्यांच्या येण्यामुळे बँकांच्या पारंपारिक भूमिकेला- मध्यस्थीकरणाला तडा गेला. या उगवत्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने आपल्या योजनांचा वेग आपल्याला वाढावायला हवा. (गेली पाच वर्षे आपण पीटूपी मंच आणण्यासाठी वादवितंड करतो आहोत आणि निष्कर्ष शून्य आहे). अंतत, निश्चलनीकरणानंतर आणि जीएसटी लागू केल्यानंतर डिजिटलीकरणाला बळ मिळाले. त्यामुळे बिझिनेसच्या स्वरुपात मूलभूत बदल झाला. व्यापार- व्यवहारांचा माग काढणे सोपे झाले. जीएसटीएन च्या जालाने निर्माण झालेल्या प्रचंड माहितीचा उपयोग व्यावहारिक तसेच लाभप्रद दृष्टीने करुन घेणे गरजेचे आहे

■■■

*लेखक सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग महासंघाचे महासचिव आहेत.*
*email: sg@fisme.org.in*

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, हे नम्र आवाहन.

# खादी आयोगाने उचललेली नवी पावले

**- व्हि. के. सक्सेना**



**खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने पुढाकार घेत, स्वावलंबनाचा पुरस्कार करत, राष्ट्रीय पातळीवर अनेक संस्थांची उभारणी केली. पुढे, भू-राजकीय बदलांमुळे कैक कुटुंबांना स्वाभिमानाचा रोजगार देणारे असे अनेक उपक्रम आणि संस्था विविध कारणे देत, पद्धतशीरपणे कायमच्या बंद करण्यात आल्या. या संस्था आणि उपक्रम सुरु ठेवण्याचा खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा निर्धार मात्र कायम होता.**

गौरवशाली इतिहासाचा मागोवा घेता, खादी हा राष्ट्रीय मानदंड तसेच ग्रामीण उद्योगाचा ऐतिहासिक वारसा होय. खादी, राष्ट्रवादाचं पूर्णपणे आपलं स्वत:चं, भारतीय प्रतिक म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी त्याचा पुरस्कार केल्याचा आपल्याला अभिमान आहे. स्वातंत्र्यानंतरही, खादीचा वारसा आणि त्याच्या मुल्यांची जपणूक आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी सुरुच ठेवली. देशभरात खादीच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यात आलं. जागोजागी खादी ग्रामोद्याच्या संस्था उभारण्यात आल्या. ते स्वावलंबन, ग्रामीण समाजाच्या आत्मनिर्भतेचं द्योतक ठरलं. खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने पुढाकार घेत, स्वावलंबनाचा पुरस्कार करत, राष्ट्रीय पातळीवर अनेक संस्थांची उभारणी केली. पुढे, भू-राजकीय बदलांमुळे कैक कुटुंबांना स्वाभिमानाचा रोजगार देणारे असे अनेक उपक्रम आणि संस्था विविधं कारणे देत, पद्धतशीरपणे कायमच्या बंद करण्यात आल्या. या संस्था आणि उपक्रम सुरु ठेवण्याचा खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा निर्धार मात्र कायम होता. इतिहासात देशवासीयांचं मनोबल उंचावत, राष्ट्रसेवा केलेल्या राष्ट्रीय मानदंडाची जपणूक व्हायलाच हवी. तो विस्मृतीत जाता कामा नये. ज्या उद्देशानं या उपक्रमाची सुरुवात झाली, तो अजूनही या सेवेद्वारे पूर्ण होऊ शकतो, त्यामुळे आसपासच्या सगळ्यांनी यामाध्यमातून रोजगार आणि समृद्धी साधावी असे आयोगाचे म्हणणे होते.

**सेवापुरी (वाराणसी) आश्रमाचे २६ वर्षांनंतर पुनरुज्जीवन**

खादीच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी, वाराणसीत १९४६ साली महात्मा गांधीच्या मार्गदर्शनाखाली सेवापुरी आश्रमाची उभारणी झाली. देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद यांच्या हस्ते आश्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. महात्मा गांधींजींचे या आश्रमात काही दिवस वास्तव्यही होते. ही संस्था १२ एकर परिसरात व्यापली होती. तिथे पाचशेपेक्षा जास्त लोक काम करत

होते. अल्पावधीतच ते देशातले सर्वोत्तम खादी केन्द्र म्हणून नावारुपाला आले. मात्र आर्थिक अडचण आणि सुयोग्य व्यवस्थापनाअभावी १९९० साली हे केन्द्र बंद करण्यात आले. गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारे मोडकळीला आलेले स्मारक ही त्याची वस्तुस्थिती झाली. खादी ग्रामोद्योग आयोगाने, यावर्षी १७ सप्टेंबर अर्थात सेवा दिनाचे औचित्य साधत हे केन्द्र पुन्हा सुरु केले आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाने ग्रामीण विद्युतीकरण महासंघाच्या मदतीने या केन्द्राच्या उत्कर्षाला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ग्रामीण विद्युतीकरण महासंघाने आपल्या सीआरएस म्हणजेच कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी निधीतून साडेपाच कोटी रुपयांचा निधी या प्रकल्पाला दिला आहे. खादीच्या प्रोत्साहनासाठी पहिल्यांदाच कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी निधीचा उपयोग होत असून त्या माध्यमातून पाचशे सौर चरखा आणि शंभर सौर हातमागांचं वाटप केले जाणार आहे. सोलर चरखा आणि हातमागांचं प्रशिक्षण देण्यासाठी आयोगाने, वाराणसी जिल्ह्यात जयापूर आणि काक्राहिया या दोन गावांमधे प्रशिक्षण केन्द्र सुरु केली आहेत. त्यासाठी दोन्ही गावांमधे प्रत्येकी २५ सोलर चरखा आणि पाच हातमाग दिले आहेत. आतापर्यंत इथे एकूण पाचशे स्थानिक महिला प्रशिक्षित झाल्या आहेत.

**जम्मू कश्मीरमधल्या पंपोर इथल्या ऐतिहासिक प्रशिक्षण केन्द्राचे पुनरुज्जीवन**

जम्मू कश्मीरमधले ऐतिहासिक शहर पंपोर. झेलम नदीच्या पूर्वेला वसलेले. तिथले बंद पडलेले ऐतिहासिक प्रशिक्षण केन्द्र, खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने २२ ऑगस्ट २०१७ रोजी पुन्हा सुरु केले आहे. हे ठिकाण दर्जेदार केशरासाठी प्रसिद्ध असल्याने केशर नगरी म्हणूनच जगभरात ख्यातकिर्त आहे. दहशवादी कारवायांमधे १९९० साली त्याची वाताहत झाली. महात्मा गांधीजींनी १९४७ साली इथल्या केन्द्रालाही भेट दिली होती.

पंपोरमधल्या ऐतिहासिक प्रशिक्षण केन्द्रात सूतकताई, विणकाम, इडीपी, मधुमक्षिकापालन तसेच सौर चरख्यासंबंधित प्रशिक्षणक्रम सुरु केले आहेत. दहशतवादी कारवायांमधे उद्धवस्त झालेले प्रसिद्ध खादी इंडीया दालनाचेही (आऊटलेट) उद्घाटन करण्यात आले.

वर उल्लेख केलेल्या कामांव्यतिरिक्त गुजरातमधल्या वनाज या आदिवासीबहुल गावात २५ चरखा आणि ५ हातमागांचे वाटप खादी ग्रामोद्योग आयोगाने केले आहे. त्यामुळे पन्नास स्थानिक आदिवासी महिलांना शाश्वत रोजगार मिळाला आहे.

याशिवाय, काझिरंगा राष्ट्रीय उद्यानाच्या(अभयारण्य) परिसरात, सिलिमखोवा गावातही आयोगाने नवे प्रशिक्षण तसेच उत्पादन केन्द्र सुरु केले. यामुळे एकीकडे बेकायदा शिकारीला आळा बसेल तिथेच तब्बल पन्नास स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. इथेही आयोगाने २५ चरखा आणि ५ हातमागांचे वाटप केले.

**मधुमार्गाची आखणी**

भारतात जैवविविधता विपुल आहे. इथे नानावविध गंधाची, स्वादांची वनसंपदा मोठ्या प्रमाणावर असल्याने साहजिकच शुद्ध नैसर्गिक आणि दर्जेदार मधाचे उत्पादन करण्याची मोठी संधी इथे आहे. जंगलबहुल किंवा जंगलाच्या आसपास असणाऱ्या परिसरात तसेच शेतीला जोडधंदा म्हणूनही मधुमक्षिका पालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. मधाच्या उत्पादनाचे अनेक फायदे आहेत. मध साठवण्याबरोबरच परागकणांचं वहनही मधमाशांमुळे होत असतं. त्यामुळे बीजोत्पादनाची शक्यता वाढुन त्याचा थेट फायदा शेती उत्पादन क्षमता वाढीला होतो. मेण, परागकण, मधमाशी दंशावरचे उपचार हे यापासूनचे अतिरिक्त फायदे. हे सारे लाभ लक्षात घेता, या लघुउद्योगाला आश्रय देत चालना देण्याकरिता आयोगाने मध अभियानाची देशात सुरुवात केली आहे. याअंतर्गत यावर्षात देशभरात शेतकऱ्यांना एक लाख मधुमक्षिका पालन संचांचे वाटप खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने केले आहे.

मध अभियानाचा प्रारंभ राष्ट्रपती भवनापासूनच खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने केला. राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांनी राष्ट्रपती भवनातल्या मधुमक्षिका पालन केन्द्राला भेट देऊन त्याची पाहणी केली. आयोगाने इथे १५० मधुमक्षिका पालन संच उभारले आहेत. येत्या काही महिन्यातच ही संख्या ५०० वर नेली जाणार असून त्याद्वारे १५ हजार किलो उच्च दर्ज्याच्या मधाची निर्मिती राष्ट्रपती भवनात केली जाणार आहे.

वाराणसीतला सेवापूरी परिसर जैवविविधतेने नटलेला आहे. इथेही आयोगाने सर्व सुविधांसह मधुमक्षिका पालनाचे १०० संच शिबिरात उपलब्ध करुन दिले आहेत. अशाप्रकारचे वाराणसी जिल्ह्यातले हे पहिलेच मधुमक्षिका पालन केन्द्र आहे. याच अभियाना अंतर्गत जम्मू कश्मीरच्या पंपोर जिल्ह्यातही मधुमक्षिका पालनाचे १०० संच प्रशिक्षण केन्द्राला आयोगाने उभारुन दिले आहेत. प्रशिक्षणानंतर स्थानिक शेतकरी आणि योग्य ठिकाणी या संचांचे वाटप केले जाणार आहे. यातून अभियानाला चालना मिळून दर्जेदार मधाचे उत्पादन वाढीला लागेल.

## महिला सबलीकरण

महिलांना जोखडातून मुक्त करणं आणि त्यांचं सबलीकरण हा खादी ग्रामोद्योग आयोगाद्वारे होणाऱ्या प्रत्येक उपक्रमाचा गाभा आहे. सेवापुरी असो किंवा पंपोर इथले उपक्रम. महिला सक्षमीकरणाचा ध्यासच आयोगाने घेतला आहे. सक्षम महिला उत्तम निरोगी कुटुंब घडवू शकतात. पर्यायानं शक्तीशाली राष्ट्राच्या उभारणीचा पायाच घातला जाऊ शकतो, हे ध्यानात घेऊनच महिला सबलीकरणाला प्राथमिकता दिली जात आहे.

**नर्मदा खोऱ्यात महिला सबलीकरणाचा नवा अध्यायच आयोगाने लिहिला आहे. मध्यप्रदेशात ओमकारेश्वर इथे आदिवासी महिलांना सहयोग कार्यक्रमाअंतर्गत ८० चरख्यांचे वाटप केले आहे. प्रशिक्षणप्राप्त सगळ्या ९० कारागीर महिला इतर आदिवासी महिलांसाठी आदर्श ठरल्या आहेत. सहयोग कार्यक्रमाअंतर्गत देशभरातल्या ग्रामीण भागामधे हजारो चरख्यांचे वाटप केले आहे.**

नर्मदा खोऱ्यात महिला सबलीकरणाचा नवा अध्यायच आयोगाने लिहिला आहे. मध्यप्रदेशात ओमकारेश्वर इथे आदिवासी महिलांना सहयोग कार्यक्रमाअंतर्गत ८० चरख्यांचे वाटप केले आहे. प्रशिक्षणप्राप्त सगळ्या ९० कारागीर महिला इतर आदिवासी महिलांसाठी आदर्श ठरल्या आहेत. सहयोग कार्यक्रमाअंतर्गत देशभरातल्या ग्रामीण भागामधे हजारो चरख्यांचे वाटप केले आहे.

## बाजारावर ठसा

ग्रामीण भागातलं जीवनमान उंचावण्यासाठी आणि मागणी पुरवठ्याचा उत्तम ताळमेळ साधण्याच्या दृष्टीने बाजाराला अनन्यसाधारण महत्व आहे. पर्यायाने त्यावर लक्ष केन्द्रीत केले आहे. बाजारातल्या मागणीच्या प्रमाणात ग्रामीण भागातल्या रोजगाराला सहकार्य करण्यासाठी आयोग कटिबद्ध आहे. त्या दिशेने अव्याहत प्रामाणिक प्रयत्नही सुरु आहेत.

वस्त्रोद्योगातली मोठी कंपनी अरविंद मीलने आयोगाकडून १० लाख मीटर खादी डेनीम खरेदीचा करार केला आहे. जगभरात खादी डेनीमच्या व्यापारासाठी आयोगाने अरविंद मीलबरोबर करार केला आहे. दरवर्षी दहा लाख मीटर डेनीम खादी उत्पादनाची योजना कंपनीने आखली आहे. या करारामुळे खादीचे उत्पादन वर्षाला ४० कोटी रुपयांनी वाढण्याबरोबरच देशभरातल्या खादी कारागीरांना शाश्वत रोजगारही मिळणार आहे. अरविंद मीलबरोबर झालेल्या या करारामुळे साडेसात लाख अतिरिक्त कार्यदिवसांचीही निर्मिती होणार आहे.

आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेडनेही खादी आणि ग्रामोद्योग आयोगाबरोबर करार केला असून, खादी पीटर इंग्लंड नावाच्या उत्पादनाची निर्मिती केली जाणार आहे.

वस्त्रोद्योगातली आणखी एक दिग्गज कंपनी रेमंड लिमिटेडने

आयोगाला अडीच लाख मीटर खादीच्या कापडाची ऑर्डर दिली आहे. यातून आयोगाला तब्बल सहा कोटी रुपये मिळणार असून कुठल्याही कॉर्पोरेट कंपनीकडून मिळालेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी ऑर्डर आहे.

खादी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांबरोबर मिळून अनेक पावलं उचलली जात आहेत. खासकरुन खादी डेनीमसारख्या उत्पादनाला बाजारात मोठी संधी उपलब्ध होऊ शकते हे लक्षात घेता त्याचे खास मार्केटींग केले जात आहे. यामुळे वर्षाला ४० कोटी उत्पन्नाबरोबरच कामाचे अतिरिक्त साडेसात लाख दिवसही निर्माण होतील. खादी पीटर इंग्लड आणि खादीच्या कॉर्पोरेट मार्केटींगमुळे याला गती मिळणार आहे. केन्द्रीय आरोग्य मंत्रालयाने त्यांच्या सर्व २३ रुग्णालयांसाठी फक्त खादीचेच उत्पादन वापरण्याचे आदेश दिले आहेत.

खादी आणि ग्रामोद्योग आयोगाला सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर, ONGC ( त्यांच्या ३५ हजार कर्मचाऱ्यांसाठी तयार खादीचे कपडे. किंमत ४५ कोटी रुपये), रेल्वे ( बेडशीट, उशांचे अभ्रे, ब्लँकेट यासाठी ४२ कोटी रुपये), एअर इंडीया (पहिल्या दर्जाच्या आणि बिझनेस क्लासच्या प्रवाशांसाठी खादीची ३५ हजार विविध उत्पादने, ११.१ कोटी रुपये), NTPC ( २३ हजार सिल्क जॅकेटसाठी ५ कोटी), जे.के. व्हाईट सिमेंट( गणवेशासाठी १७ लाख रुपये) यांचा समावेश आहे.

**खादी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांबरोबर मिळून अनेक पावलं उचलली जात आहेत. खासकरुन खादी डेनीमसारख्या उत्पादनाला बाजारात मोठी संधी उपलब्ध होऊ शकते हे लक्षात घेता त्याचे खास मार्केटींग केले जात आहे. यामुळे वर्षाला ४० कोटी उत्पन्नाबरोबरच कामाचे अतिरिक्त साडेसात लाख दिवसही निर्माण होतील. खादी पीटर इंग्लड आणि खादीच्या कॉर्पोरेट मार्केटींगमुळे याला गती मिळणार आहे.**

केन्द्रीय आरोग्य मंत्रालयाने त्यांच्या रुग्णालयासाठी, तसेच कर्मचाऱ्यांसाठी खादीचीच उत्पादने वापरण्याचे ठरवल्याने तब्बल १५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. यामुळे खादीच्या उत्पादनांना मोठा हातभार लागला आहे. आरोग्य मंत्रालयाची देशभरातली २३ रुग्णालये आणि संशोधन संस्था फक्त खादीचीच उत्पादने वापरणार आहेत. बेडशीट्स, ऍबडोमेन शीट्स, ड्रेसिंग टॉवेल्स, सर्जन गाऊन, सर्जिकल पेशन्ट गाऊन, कुर्ता पायजमा, डॉक्टर्स कोट, साबण, हँड सॅनिटायझर, खादी फिनाईल आणि आयुर्वेदीक शॅम्पू अशा ४६ खादी उत्पादनांचा यात समावेश आहे.

एअर इंडियाने १२ कोटी रुपये किमतीच्या बॅग्जची ऑर्डर खादी आणि ग्रामोद्योग आयोगाला दिली आहे. आपल्या विमानसेवेसाठी नैसर्गिक आणि पर्यावरणस्नेही खादी उत्पादनेच वापरण्याचे एअर इंडियाने ठरवले आहे. त्याअंतर्गत पहिल्या दर्जाच्या तसेच बिझनेस दर्जाच्या विमानसेवेसाठी ६५ हजार सुविधा संचांची ऑर्डर त्यांनी आयोगाला दिली असून त्याची किंमत ७ कोटी ९८ लाख रुपये आहे.

निविदाप्रक्रिया आणि गुणवत्तेच्या निकषांचे पालन करुनच ऑर्डर्स घेतल्या जातात. या पारदर्शक आणि दर्जेदार सेवेमुळेच खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या उत्पादनांना बाजारात मोल आहे. २०१६मध्ये १ लाख ८५ हजार खादी युनिट्ससाठी ८ कोटी रुपयांची ऑर्डर आयोगाला मिळाली. त्याचप्रमाणे डिसेंबर २०१५ मध्ये १ कोटी २१ लाख रुपये किमतीच्या २५ हजार युनिट्सची ऑर्डर एअर इंडीयाने प्रायोगिक तत्वावर दिली होती. खादी हँड सॅनिटायझर, खादी मॉयश्चरायझर लोशन, खादी लेमनग्रास, खादी हस्तनिर्मित साबण, खादी लिपबाम, खादी रोज फेल वॉश, आणि इतर आवश्यक तेलांचा त्यात समावेश आहे.

**कक्षांचा विस्तार.**

भारतातल्या पारंपरिक, मूळ उत्पादनांची माहिती सगळ्या जगाला कळायला हवी, त्यांचा लवकरात लवकर आणि जास्तीत जास्त प्रसार व्हायला हवा याचं महत्व खादी ग्रामोद्योग आयोग पूर्णपणे जाणून आहे. अनेक राजशिष्टाचार अधिकाऱ्यांनी खादी केन्द्रांना भेटी दिल्या आहेत. इथले काम पाहून ते भारावून गेले आहेत.

**अमेरिकेच्या राजदूतांनी स्वातंत्र्यदिनी परिधान केली साडी**

स्वातंत्र्य संग्रामात महात्मा गांधींनी खादीच्या वापराचे महत्व पटवून दिले होते. ते स्वदेशीचे प्रतिकच झाल्याने अभिमानबिंदू ठरले होते. अमेरिकेच्या भारतातल्या राजदूत श्रीमती मेरी के लॉस कार्लसन यांनी दिल्लीतल्या कॅनॉट प्लेस इथल्या खादी इंडीया दालनाला भेट दिली, आणि भारताच्या स्वातंत्र्यदिनी नेसण्यासाठी साडी खरेदी केली. कोणती साडी खरेदी करावी याबद्दल सूचवा असे आवाहनही त्यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून भारतीयांना केले होते. कार्लसन यांनी इथे खरेदी केलेली साडी लालकिल्ल्यावर झालेल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यावेळी अभिमानाने परिधान केली.

दिल्लीतल्या मध्यभागी भव्य स्टेनलेस स्टिलचा चरखा आणि पारंपरिक वारसा असलेल्या चरख्यांचे संग्रहालय खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने उभारले आहे.

अतिउच्च दर्जाच्या क्रोमियम निकेल स्टेनलेस स्टिल पासून निर्मित तब्बल अडिच टनांचा भव्य चरखा कॅनॉट प्लेस इथल्या संग्रहालयात बसवण्यात आला आहे. चरख्याची उंची १२ फुट असून लांबी २५ फुट आहे. नवी दिल्ली महानगरपालिकेच्या सहकार्याने उभारण्यात आलेले हे चरखा संग्रहालय शहराच्या आकर्षणाचे केन्द्र ठरले आहे.

---

**गेल्या दोन वर्षात ५३२३ विणकर माग मंजूर झाले असून पैकी १३५० माग वितरितही झाले आहेत. त्याचप्रमाणे, २७ हजार चरखे मंजूर झाले असून १६ हजार चरखे वितरितही झाले आहेत. खादीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी खादी आणि ग्रामोद्योग आयोग पूर्ण क्षमतेने अगदी तळागाळापर्यंत काम करत आहे.**

---

**बुद्धीबळ महासंघाने गणवेष म्हणून खादीचा स्विकार करण्याचे ठरवले आहे.**

आंतरराष्ट्रीय पातळीवर खादीचा प्रचार प्रसार करण्यासाठी तसेच तरुण पिढीला या खास भारतीय वस्त्राकडे आकर्षित करण्यासाठी अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने पुढाकार घेतला आहे. यापुढे सर्व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधे देशाचे सर्व खेळाडू आणि सहकारी कर्मचारी गणवेष तसंच इतर संच खादीचेच वापरतील असा निर्णय महासंघाने घेतला आहे.

खादी सुधारणा आणि विकास प्रकल्पात खादीबाबतच्या सुधारणांचे खरे प्रतिबिंब दिसते आहे. या प्रकल्पाची सुरुवात २०१०-११ मधे झाली. त्यानंतर एडीपीकडून २०१३-१४ मधे ९६ कोटी रुपये निधी मंजूर झाला. मात्र मे २०१४ पर्यंत साधा चरखा किंवा हातमाग यंत्राचे वाटपही झाले नाही. गेल्या दोन वर्षात ५३२३ विणकर माग मंजूर झाले असून पैकी १३५० माग वितरितही झाले आहेत. त्याचप्रमाणे, २७ हजार चरखे मंजूर झाले असून १६ हजार चरखे वितरितही झाले आहेत. खादीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी खादी आणि ग्रामोद्योग आयोग पूर्ण क्षमतेने अगदी तळागाळापर्यंत काम करत आहे. ग्रामोद्योग आणि त्याचा शाश्वत विकास यातच भारताचा सर्वांगीण विकास सामावलेला आहे या महात्मा गांधीजींनी दाखवलेल्या मार्गावरच खादी ग्रामोद्योगाची यशस्वी वाटचाल सुरु असून तोच वसा जोमाने पुढे नेला जात आहे.

■■■

*लेखक खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष आहेत.*

*email: chairmankvic2015@gmail.com*

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे सशक्तीकरण

- अरूण पांडा



**सर्वसामान्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याबरोबरच उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण उद्योग कल्पनांना चालना देण्यात या क्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. देशातील मोठ्या उद्योगांच्या व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी पूरक सहयोगी क्षेत्र म्हणूनही सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राकडे पाहिले जाते. एकूणच देशातील सामाजिक-आर्थिक सर्वांगिण विकासात एमएसएमइजचा मोलाचा वाटा आहे.**

जागतिक स्तरावर सर्वच देशांत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्र अर्थात मायक्रो, स्मॉल व मिडियम एंटरप्राइझेस सेक्टर (एमएसएमइ) सकल घरगुती उत्पादनात- (Gross Domestic Product -GDP) मोठे योगदान देते. तसेच देशांच्या आर्थिक वाढीतही हे क्षेत्र महत्वाची भूमिका बजावते. सर्वसामान्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याबरोबरच उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण उद्योग कल्पनांना चालना देण्यात या क्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. देशातील मोठ्या उद्योगांच्या व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी पूरक सहयोगी क्षेत्र म्हणूनही सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राकडे पाहिले जाते. एकूणच देशातील सामाजिक-आर्थिक सर्वांगिण विकासात एमएसएमइजचा मोलाचा वाटा आहे.

### भारतीय दृष्टीकोन

भारताच्या आर्थिक विकासात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राला धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. भारतात जवळपास ९० टक्के उद्योग या क्षेत्राशी संबंधित असून देशातील एकूण कामगार वर्गापैकी ४० टक्के लोकांना हे क्षेत्र रोजगार देते. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांत पारंपारिक उत्पादनांपासून आजच्या नूतन तंत्रज्ञानाशी संबंधित सर्व प्रकारच्या ८००० पेक्षाही जास्त वस्तू व सेवांचे उत्पादन घेतले जाते. २०२५ या वर्षापर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलिअन डॉलरपर्यंत मजल मारेल, असा निष्कर्ष मांडण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळातही सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राला अनन्यसाधारण महत्व राहिल. त्यादृष्टीने या क्षेत्राच्या सर्वांगिण विकासाबरोबर हे क्षेत्र आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक बळकट होण्यासाठी योग्य धोरणे राबवणे व नवनव्या योजना व कार्यक्रम आखणे इ. वर सरकारचा अधिक भर आहे. किंबहुना या क्षेत्राच्या सशक्तीकरणासाठी सरकार प्राधान्यक्रमाने पावले उचलते आहे. उदाहरणार्थ, २०१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ३४६५ कोटी रूपयांचा निधी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला होता. यावर्षीच्या अर्थसंकल्पात सूक्ष्म, लघु व मध्यम

उद्योगांसाठी सर्वाधिक म्हणजे ६४८२ कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**एमएसएमइ क्षेत्र बळकट करण्यासाठी योजण्यात आलेले विविध धोरणात्मक उपाय**

एमएसएमइ क्षेत्राच्या वाढीसाठी खूप वाव व क्षमता असण्याबरोबरच या क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. यामध्ये प्रामुख्याने लघुउद्योजकांना वेळेवर कर्ज न मिळणे, पायाभूत सोयीसुविधांसह प्रगत तंत्राचा अभाव, बाजारपेठेपर्यंत उत्पादन पोहचण्यातील अडथळे आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता इ.चा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. याशिवाय, चीन, इंडोनेशिया, फिलीपींस आणि थायलंड यासारख्या शेजारील राष्ट्रांकडून वाढत असलेल्या स्पर्धेमुळे आपल्या देशातील एमएसएमइ क्षेत्राचा जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेत टिकाव लागण्यासाठी मजबूत धोरणे स्वीकारणे आवश्यक झाले आहे. यादृष्टीने प्रमुख आव्हानांवर उपाययोजना करताना या क्षेत्राचा सर्वांगिण विकास होईल यासाठी केंद्र शासनाने 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया', 'स्टार्ट-अप इंडिया' आणि 'स्किल इंडिया' यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाचा दर सद्यस्थितीत १६-१७ टक्के आहे. २०२२ पर्यंत एमएसएमइ क्षेत्राची उत्पादकतेत वाढ करून देशाचा जीडीपीचा दर २५ टक्क्यांपर्यंत नेण्यासह या क्षेत्रात १०० कोटी नवीन रोजगारसंधी उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**एसएमइंना वित्तपुरवठा**

एसएसएमइ क्षेत्रात एकसारखे उद्योग नाहीत. किंबहुना या क्षेत्रातील प्रत्येक उद्योग दुसऱ्या उद्योगोपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. त्यामुळे प्रत्येक उद्योगाच्या आवश्यकता, प्राधान्य, आव्हाने इ.गोष्टीही परस्परांपासून पूर्णपणे वेगळ्या आहेत. उदाहरणार्थ, सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी वेळेवर


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

Phone No. / email : ________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

कर्जाची उपलब्धता असणे ही एक प्राथमिक गरज व एक प्रमुख आव्हानदेखील आहे. परंतु, मध्यम व मोठ्या उद्योगांबाबत ही बाब लागू होत नाही. सूक्ष्म व लघु उद्योगांची कर्जाची निकड लक्षात घेउन शासनाने कर्ज हमी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत काही ठराविक शासनमान्य वित्त पुरवठा संस्थांतून सूक्ष्म व लघु उद्योग २ कोटी रूपयांपर्यंत रक्कम तारण म्हणून मिळवू शकतात. पूर्वी ही रक्कम केवळ एक कोटी रूपये एवढी होती. याशिवाय, या क्षेत्रातील वित्तीय जटिलता आणि कर्ज उपलब्धतेशी निगडीत अडथळे दूर करण्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पनाही काही वित्तीय संस्था राबवत आहेत.

एसएमईंना सुलभपणे क्रेडिट मिळवून देण्यासाठी काही स्टार्टअप्सही कार्यशील भांडवल क्षेत्रातील विविध योजना हे सोयीस्कर बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. वित्तपुरवठा आणि कर्ज देणाऱ्या नव्या भागीदारांच्या आगमनामुळे एसएमईं आर्थिकदृष्ट्या सुरक्षित होण्याची शक्यता वाढली आहे.

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (Prime Minister's Employment Generation Programme -PMEGP) ही सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची एक प्रमुख योजना आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी देशभरात विविध ठिकाणी सूक्ष्म उद्योग सुरू करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर दिला जातो. नवीन स्वयंरोजगार उद्योग निर्मिती करून देशातील ग्रामीण आणि शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. विविध पातळ्यांवर रोजगार निर्मितीला प्रचंड वाव निर्माण करणारी शासनाची ही एक महत्वाकांक्षी योजना आहे.

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

**खादी आणि ग्रामोद्योग**

खादी आणि ग्रामोद्योग ही भारतातील दोन महत्वाची पारंपारिक क्षेत्रं आहेत. कमीत कमी आर्थिक गुंतवणूकीत ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विशेषत:समाजातील दुर्बल घटकांना काम मिळवून देण्यात खादी व ग्रामोद्योग क्षेत्र अतिशय महत्वाची भूमिका बजावते. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे खादी आणि ग्रामोद्योगातून ग्रामीण बेरोजगारी कमी करण्यासाठी, विशेषत: ग्रामीण भागातील युवा आणि महिलांना घरच्या घरी करता येतील अशी कामे देऊन लाभदायक रोजगार उपलब्ध करणाऱ्या अनेक योजना चालवल्या जातात.

**नवीन तंत्रज्ञानाचा अंगिकार**

आज, जागतिक मूल्य शृंखला जागतिक स्तरावर स्पर्धा करीत आहेत. या आंतराष्ट्रीय बाजारपेठेत पुरवठादार बनण्यासाठी, भारतीय उद्योगांना सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणे आणि आंतरराष्ट्रीय मानकांचे अनुसरण करणे आवश्यक आहे. या संदर्भात तांत्रिक सुसंस्कृतता अत्यंत महत्त्वपूर्ण बनली आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना उच्च तांत्रिक कौशल्य व तंत्रज्ञानासंबंधी सहायता मिळवून देण्यावर भर देत एमएसएमइ मंत्रालयाने देशभरात विविध ठिकाणी १८ तांत्रिक विकास केंद्र सुरू केली आहेत. तसेच आधीपासून सुरू असणाऱ्या केंद्रांची अद्ययावत पुनर्रचना करण्याबरोबर १५ नवी केंद्र सुरू केली आहेत. एमएसएमइ क्षेत्रातील उत्पादकतेला गती देण्यासाठी बँकेच्या मदतीने मंत्रालयाने तंत्रज्ञान केंद्र प्रणाली प्रकल्पाअंतर्गत सुमारे २२०० कोटी रूपयांच्या निधीची तरतूद केली आहे. या केंद्राद्वारे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि व्यवसायिक सल्लागारांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. याव्यतिरिक्त, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना अद्ययावत तांत्रिक पुनरर्चना करण्यासाठी भांडवली कर्ज सवलत योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत व्यवसायासाठी लागणारी संयंत्र आणि यंत्रसामुग्री इ. च्या आधुनिकीकरणाच्या एकूण खर्चावर १५ टक्के सवलत दिली जाते. यात कमाल मर्यादा १५ लाख रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. जून २०१७ पर्यंत या योजनेद्वारे १२९३ एमएसएमइंना तांत्रिक क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने आर्थिक लाभ मिळाला आहे. एमएसएमइंना आर्थिक सहायता मिळवून देण्यासाठी माननीय पंतप्रधानांनी अलीकडेच झीरो डीफेक्ट झीरो इफेक्ट प्रमाणन मध्ये एमएसएमईंना आर्थिक सहाय्य योजना सुरू केली आहे. ही योजना म्हणजे एसएमएसइ क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी व उत्पादन निर्मिती प्रक्रियेत दोषरहितता आणण्याच्या बाबतीत एमएसएमइ क्षेत्रात जागरूकता निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेली एक व्यापक मोहीम आहे. आपल्या उद्योगांच्या उत्पादकतेचे दर्जात्मक मूल्यांकन करण्यासाठी ही योजना एमएसएमइना प्रोत्साहन देते.

---

**आंतराष्ट्रीय बाजारपेठेत पुरवठादार बनण्यासाठी, भारतीय उद्योगांना सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणे आणि आंतरराष्ट्रीय मानकांचे अनुसरण करणे आवश्यक आहे. या संदर्भात तांत्रिक सुसंस्कृतता अत्यंत महत्त्वपूर्ण बनली आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना उच्च तांत्रिक कौशल्य व तंत्रज्ञानासंबंधी सहायता मिळवून देण्यावर भर देत एमएसएमइ मंत्रालयाने देशभरात विविध ठिकाणी १८ तांत्रिक विकास केंद्र सुरू केली आहेत.**

---

**उद्योगांसाठीच्या पायाभूत सुविधांचे सुदृढीकरण**

उद्योगांच्या दैनंदिन आवश्यक गरजांची पूर्तता, बाजारपेठांत उत्पादनांची वितरण व्यवस्था, कुशल मनुष्यबळ व आधुनिक तंत्रज्ञान इ.सारख्या पायाभूत सोयीसुविधांची उपलब्धता कोणत्याही उद्योगांना बाजारपेठेत यशस्वीरित्या कार्यान्वित राहण्यासाठी आवश्यक आहेत. या संदर्भात, एमएसएमईच्या विकासासाठी शासनाने एमएसएमईचा

एक समूह अशा दृष्टीकोनातून सहकारतत्वाचा अंगिकार केला आहे. भांडवलाचा अभाव असल्याने, सूक्ष्म आणि लघु उद्योग उत्पादन प्रक्रियेत नवीनतम साधने आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करू शकत नाहीत, त्यामुळे अंतिम उत्पादनाच्या गुणवत्तेशी तडजोड केली जाते. यासाठी एमएसएमइंच्या समूह विकास योजनेद्वारे उद्योगांच्या एका समान समूहासाठी एक याप्रमाणे सोयी सुविधा केंद्र सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांतर्फे उद्योगांसाठी लागणारी नवीन उपकरणे, यंत्रसामुग्री, रचना व परिक्षण सुविधा इ. उपलब्ध करून दिले जाते. देशभरातील अनेक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना या योजनेचा लाभ मिळाला असून एमएसएमइ मंत्रालयद्वारे याबाबत काही व्यापक मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. तसेच या योजनेला देशातील सर्व स्तरावरील एमएसएमइ समूहापर्यंत नेत अधिकाधिक व्यापक करण्याबरोबरच नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे अद्ययावत करण्यावर भर दिला जातो आहे.

### नवनवीन बाजारपेठांत एमएसएमइ क्षेत्राचा प्रवेश व व्यापार उत्तेजना

एमएसएमईच्या सध्याच्या बाजारपेठांचा विस्तार करण्याबरोबरच एमएसएमइ क्षेत्रांतील उत्पादनांना नवनव्या बाजारपेठा मिळवून देणे व बाजारपेठांतील सबंधित घटकांशी कायमस्वरूपी परस्पर संबंध कायम ठेवण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणनिर्मितीसाठी सरकारने एक उद्दिष्ट आखले आहे. सार्वजनिक प्रोक्युरमेंट पॉलिसी, एमएसई ऑर्डर २०१२ चा एक भाग म्हणून केंद्र सरकार आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे मंत्रालय आणि संबंधित विभाग सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांमधून २० टक्के वस्तू आणि सेवांची खरेदी करतील असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

**नवनव्या बाजारपेठा मिळवून देणे व बाजारपेठांतील सबंधित घटकांशी कायमस्वरूपी परस्पर संबंध कायम ठेवण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणनिर्मितीसाठी सरकारने एक उद्दिष्ट आखले आहे. सार्वजनिक प्रोक्युरमेंट पॉलिसी, एमएसई ऑर्डर २०१२ चा एक भाग म्हणून केंद्र सरकार आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे मंत्रालय आणि संबंधित विभाग सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांमधून २० टक्के वस्तू आणि सेवांची खरेदी करतील असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.**

या धोरणामुळे एमएसएमइ क्षेत्राला लाभ होण्याबरोबरच या क्षेत्रातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती उद्योजकांनी सार्वजनिक खरेदी बाजार मध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. याचाच एक भाग म्हणून एससी-एसटीच्या उद्योजकांच्या मालकीच्या एमएसएमईकडून खरेदीसाठी ४ टक्के उप-निधी बाजूला ठेवण्यात आला आहे. याशिवाय, एमएसएमइ मंत्रालयाने या क्षेत्राच्या भारतातील सामाजिक जाती-जमातीनुसार केलेल्या एका विश्लेषणानुसार अनुसूचित जाती- जमातींच्या लघु, मध्यम उद्योजकांना व्यवसाय करताना अनेक प्रकारच्या मर्यादा येतात. त्यामुळे या वर्गातील लोक व्यवसाय करण्यासाठी स्वत:हून पुढे येत नाहीत. अनुसूचित जाती-जमातींत उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १८ ऑक्टोबर, २०१६ मध्ये राष्ट्रीय अनुसूचित जाती- जमातींत केंद्राची- (National SC-ST Hub (NSSH) स्थापना केली. या केंद्रासाठी शासनाने सुमारे ४९० कोटी रूपयांची आर्थिक तरतूद केली आहे. अनुसूचित जाती- जमातींत उद्योजकांना व्यावसायिक सहायता देणे हा या केंद्राचा प्रमुख उद्देश आहे.

हे केंद्र सध्या सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्रालयाच्या केंद्रीय लघु उद्योग महामंडळ – (National Small Industries Corporation-NSIC) या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमद्वारे- (Central Public Sector Enterprise -CPSE) कार्यान्वित आहे. अनुसूचित जाती-जमातींत उद्योजकांना व्यावसायासाठी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी विशेष भांडवली कर्ज योजना

चालवली जाते. या योजनेद्वारे २५ टक्क्यांपर्यंत भांडवली कर्ज दिले जाते.

**मनुष्यबळाचा विकास**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या वाढीसाठी या क्षेत्रात विविध स्तरावर नव्या दमाच्या, प्रतिभावान, गतिशील युवा वर्गाला रोजगार व उद्योगाच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबर या क्षेत्राकडे वळण्यासाठी प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. एका शासकिय अहवालानुसार भारताच्या १.२५ अब्ज एवढ्या प्रचंड लोकसंख्येत कुशल मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे. एमएसएमइ क्षेत्र कौशल्य विकासात महत्वाची भूमिका बजावते. विशेषत: आज भारतात जवळजवळ ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील वयोगटात मोडते. या युवा मनुष्यबळाला प्रशिक्षित करण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्रात खूप वाव आहे. आजच्या स्पर्धात्मक काळात नव्याने नोकरीची संधी शोधणाऱ्या युवा वर्गाच्या संख्येत दरवर्षी नवी भर पडते आहे. अशा परिस्थितीत नव्या दमाच्या तरूणाईला कोणत्याही क्षेत्रातून रोजगार मिळवण्याच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण व स्वयं उद्योजकता कार्यक्रमांची आवश्यकता आहे. यादृष्टीने पुढाकार घेत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या विविध विभागांतर्फे बरेच कौशल्य विकास प्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**अनुमान**

आर्थिक वाढीला चालना देणे आणि एमएसएसइ क्षेत्राचे महत्त्व व्यापक स्तरावर नेण्याच्या

**नव्या दमाच्या तरूणाईला कोणत्याही क्षेत्रातून रोजगार मिळवण्याच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण व स्वयं उद्योजकता कार्यक्रमांची आवश्यकता आहे. यादृष्टीने पुढाकार घेत सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या विविध विभागांतर्फे बरेच कौशल्य विकास प्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.**

दृष्टीने सरकार या क्षेत्रासाठीच्या सध्याच्या धोरणांवर तसेच विविध योजनांवर नव्याने काम करित आहे. उदाहरणार्थ, व्यवसाय करणे सोपे व्हावे व व्यवसायाला विशिष्ट स्वरूप देण्यासाठी सप्टेंबर २०१५ मध्ये उद्योग आधार सामंजस्य तत्त्वे- (Udyog Aadhaar Memorandum UAM) अधिसूचित करण्यात आली. या तत्वांतर्गत उद्योगांची नोंदणी प्रक्रिया अधिक गतीशील करण्यात आली आहे. आतापर्यंत ३५ लाखांहून अधिक एमएसएमइंनी उद्योग आधार सामंजस्य तत्त्वांनुसार नोंदणी केली आहे. तसेच वस्तू व सेवा कराच्या 'एक राष्ट्र एक कर' या संकल्पनेचाही आर्थिक लाभ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राला मिळेल. भारतीय एमएसएमई क्षेत्रात झालेल्या प्रगतीशील बदलांमुळे, नवीन धोरणात्मक परिवर्तनासह उद्योजकतेत वाढ होऊन नव्या रोजगाराच्या विविध संधी निर्माण होण्याची प्रक्रिया सक्रियतेने चालू राहिल. तसेच या क्षेत्रात व्यवसायास पोषक वातावरण निर्मितीसही गतिशीलता मिळत राहून स्वयंव्यवसायासाठी अनेक लोक पुढे येतील, असे अनुमान आहे.

■■■

*लेखक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग अर्थात एमएसएमई मंत्रालयात सचिव या पदावर कार्यरत आहेत.*

*email :sec.msme@gmail.com*


**आगामी अंक**

**'ग्राहक जागृती'**

**डिसेंबर २०१७**

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी दर्जा प्रमाणीकरण

- डॉ. जतिंदर सिंग



**दर्जा व्यवस्थापन प्रणालीच्या माध्यमातून मोठ्या उद्योगांशी जाळे तयार करून आणि संबंध प्रस्थापित करून मोठ्या प्रमाणावर नावीन्यपूर्ण व्यवसायांच्या कल्पना आकाराला येतील. स्पर्धात्मक बाजारपेठेत निर्यात क्षेत्रात आपले पाय रोवण्यासाठी दर्जा प्रमाणीकरण अतिशय महत्त्वाचे आहे. दर्जा प्रमाणीकरण आता केवळ मोठ्या उद्योगांपुरते मर्यादित राहिलेले नाही, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे या प्रक्रियांची गरज ओळखून ते आत्मसात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पुढे येऊ लागले आहेत.**

जागतिक स्पर्धा हे कोणत्याही उद्योगासाठी एक प्रेरक बल आहे. बाजारपेठांची बदलणारी स्थिती आणि स्पर्धांच्या युगात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) लवचिक पद्धतीने जागतिक आव्हाने स्वीकारण्याची क्षमता आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र देशभरात उद्योजकतेच्या संस्कृतीचा प्रसार करू लागले असल्याने हे क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचे इंजिन आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राचे योगदान स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ८ टक्के, एकूण उत्पादनापैकी ४५ टक्के आणि देशाच्या निर्यातीमध्ये ४० टक्के आहे. भारत सरकारने या क्षेत्रामध्ये समावेशकतेसाठी केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा होत आहे, कारण या क्षेत्रात महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, उपेक्षित समुदाय, अपंगत्व असलेले लोक यांना सहभागी करणाऱ्या अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या समाजघटकांना मदतीचा आधार मिळाला आहे आणि उद्योगांची निर्मिती करण्याचे पाठबळ मिळाले आहे.

जग सध्या संक्रमण अवस्थेत आहे आणि या स्थितीमध्ये सूक्ष्म आणि बृहद अर्थव्यवस्थेच्या समस्या सोडवण्यासाठी जागतिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. भारतामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचे प्रमुख समूह निर्माण होत आहेत. जिथे आपल्या देशातील आर्थिक आणि सामाजिक रचना आणखी चांगली करण्यासाठी पूरक योजनांच्या पाठबळाने गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाला वाव मिळू शकतो. नव्या सेवा, उत्पादने, प्रक्रिया आणि व्यवसायाची नावीन्यपूर्ण मॉडेल यांचा प्रारंभ करण्याबरोबरच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा विकास नव्या रोजगारसंधी निर्माण करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा असल्याचा धोरणकर्त्यांचा दृष्टिकोन आहे. दर्जा व्यवस्थापन प्रणालीच्या माध्यमातून मोठ्या उद्योगांशी जाळे तयार करून आणि संबंध प्रस्थापित करून मोठ्या प्रमाणावर नावीन्यपूर्ण व्यवसायांच्या कल्पना आकाराला येतील. स्पर्धात्मक बाजारपेठेत निर्यात क्षेत्रात आपले पाय रोवण्यासाठी दर्जा प्रमाणीकरण अतिशय महत्त्वाचे आहे. दर्जा प्रमाणीकरण आता केवळ मोठ्या उद्योगांपुरते मर्यादित राहिलेले नाही, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे या प्रक्रियांची गरज ओळखून ते आत्मसात करण्यासाठी मोठ्या

प्रमाणावर पुढे येऊ लागले आहेत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी स्पर्धात्मकतेचे फायदे उच्च उत्पादन आणि उत्तम नफा यातून दिसू लागले आहेत. जर जागतिक मानकांनुसार दर्जाचे निकष निर्धारित केले असतील तरच एखादा मोठा उद्योग उच्च दर्जाची कामगिरी करू शकतो आणि सातत्यपूर्ण नफा मिळवू शकतो.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी दर्जा आणि तंत्रज्ञानाचे अत्याधुनिकीकरण हे अतिशय महत्त्वाचे घटक आहेत.विशाल उद्योगांमध्ये तंत्रज्ञान आणि दर्जा अद्ययावतीकरणात सातत्य राखण्यासाठी संसाधने आणि स्रोत असतात. दुसरीकडे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये मर्यादित संसाधने आणि निधीची उपलब्धता पुरेशी नसल्याने त्यांना स्वत:चे अद्ययावतीकरण करण्यात अडचणी येतात. त्यामुळे त्यांच्यापैकी बऱ्याच उद्योगांना जागतिक मूल्य साखळीमध्ये त्यांच्यातील स्पर्धात्मकतेच्या अभावामुळे एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे विकास करता येत नाही. आर्थिक विकासाकरिता सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे महत्त्व लक्षात घेऊन सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने विविध योजना आणि कार्यक्रम आखले आहेत. त्यांच्या माध्यमातून लहान उद्योगांमधील स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातील उत्पादनाचा दर्जा आणि तंत्रज्ञानाच्या पैलूंवर लक्ष केंद्रित केले आहे.

एखाद्या संस्थेसाठी प्रमाणीकरणाचे फायदे खालीलप्रमाणे आहेत

- मान्यता आणि ब्रँडचा लौकिक
- सातत्यपूर्ण सुधारणा
- भर कायम राखणे
- आत्मविश्वास
- कर्मचाऱ्यांचे समाधान आणि व्यग्र सहभाग

---

**आर्थिक विकासाकरिता सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे महत्त्व लक्षात घेऊन सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने विविध योजना आणि कार्यक्रम आखले आहेत. त्यांच्या माध्यमातून लहान उद्योगांमधील स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातील उत्पादनाचा दर्जा आणि तंत्रज्ञानाच्या पैलूंवर लक्ष केंद्रित केले आहे.**

---

भारत सरकारच्या दर्जा प्रमाणीकरणाच्या विविध योजना खालीलप्रमाणे आहेत

**राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मकता कार्यक्रम(एनएमसीपी)** – या कार्यक्रमांतर्गत दहा योजनांची आखणी करण्यात आली असून त्यामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी आयसीटी, मिनी टूल रूम, डिझाईन क्लिनिक्स आणि मार्केटिंगचे पाठबळ यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम उत्पादन क्षेत्राला दर्जा व्यवस्थापन निकष आणि दर्जेदार तंत्रज्ञानाने युक्त साधने यांच्या माध्यमातून स्पर्धात्मक बनवतो.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना तंत्रज्ञान व दर्जा अद्ययावतीकरणाचे पाठबळ**

उत्पादन खर्चात कपात व्हावी आणि प्रदूषणरहित स्वच्छ विकास यंत्रणेचा वापर व्हावा यासाठी या योजनेत उत्पादन करणाऱ्या उद्योगांमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना झेड (झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट) प्रमाणीकरण योजनेअंतर्गत आर्थिक पाठबळ–**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमधील उत्पादकतेमध्ये झिरो डिफेक्ट म्हणजे दोष विरहित उत्पादनप्रणाली विकसित करण्यासाठी दर्जेदार साधनसामग्री व ऊर्जा कार्यक्षम उत्पादनपद्धती आत्मसात करण्याला ही योजना प्रोत्साहन देते. या योजनेंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना कंत्राटे मिळवण्यासाठी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य दर्जा प्रमाणीकरणासाठी स्पर्धा करावी लागते. प्रदूषणरहित स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च दर्जाची उत्पादने तयार करण्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मदतीचा हात देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. झेड प्रमाणीकरणासाठी केल्या जाणाऱ्या कार्यप्रक्रियांसाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये मूल्यमापन/ मानांकन, तफावत विश्लेषण, मदत आणि

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे मानांकन सुधारण्यासाठी सल्लागारांकडून मार्गदर्शन आदींचा समावेश आहे. झेड मॅच्युरिटी मूल्यांकन मॉडेल अंतर्गत झेड मानांकनासाठी ५० निकष आणि झेड संरक्षण मानांकनासाठी २५ निकष आहेत. झेडच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय देखरेख आणि अंमलबजावणी संस्था म्हणून क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाला(क्यूसीआय) नियुक्त करण्यात आले आहे. झेड योजनेंतर्गत कांस्य पातळीवर किमान २२,००० सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रमाणित करण्याचे क्यूसीआयचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय अधिस्वीकृतीकरण संरचनेची स्थापना करण्यासाठी आणि मापदंडांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार आणि उद्योगांनी संयुक्तपणे क्यूसीआची स्थापना केली आहे.

| कार्य | एकूण खर्च | भारत सरकारकडून पाठबळ | अनुदानानंतर अर्जदाराला लागू होणारी किंमत |
|---|---|---|---|
| नोंदणी | मोफत | उपलब्ध नाही | मोफत |
| ऑनलाइन स्वयं- मूल्यांकन | मोफत | उपलब्ध नाही | मोफत |
| डेस्कटॉप मूल्यांकन | रु. १०,०००/- | सूक्ष्म: ८०% | रु. २,०००/- |
| | | लघु: ६०% | रु. ४,०००/- |
| | | मध्यम: ५०% | रु. ५,०००/- |
| कार्यस्थळ मूल्यांकन | रु.. ८०,०००/- | सूक्ष्म: ८०% | रु. १६,०००/- |
| | | लघु: ६०% | रु. ३२,०००/- |
| | | मध्यम: ५०% | रु. ४०,०००/- |
| पुनर्मूल्यांकन | रु.. ४०,०००/- | सूक्ष्म: ८०% | रु.. ८,०००/- |
| | | लघु: ६०% | रु.. १६,०००/- |
| | | मध्यम: ५०% | रु.. २०,०००/- |
| संरक्षण मूल्यांकन | रु.. ४०,०००/- | सूक्ष्म: ८०% | रु.. ८,०००/- |
| | | लघु: ६०% | रु.. १६,०००/- |
| | | मध्यम: ५०% | रु.. २०,०००/- |
| तफावत विश्लेषण व मदतीचा हात | रु.. १,९०,०००/- | सूक्ष्म: ८०% | रु.. ३८,०००/- |
| | | लघु: ६०% | रु.. ७६,०००/- |
| | | मध्यम: ५०% | रु.. ९५,०००/- |

*स्रोत: क्यूसीआय*

**दर्जा प्रमाणीकरण- आयएसओ प्रमाणीकरण साहाय्य-**

ISO 9001 ही जगातील सर्वाधिक मान्यताप्राप्त दर्जा व्यवस्थापन प्रणाली आहे. ग्राहकांच्या व सर्व संबंधितांच्या गरजा आणि अपेक्षांनुसार उत्पादने तयार करण्याला आणि त्याचबरोबर इतर फायदे मिळवायला ही प्रणाली मदत करत असते. ISO 9001 ही प्रणाली सातत्यपूर्ण कामगिरी आणि सेवांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचे आराखडे आणि कामांमध्ये दर्जा कायम राखण्यामध्ये आणि त्यावर देखरेख ठेवण्यामध्ये साहाय्य करत असते. एखाद्या विशाल उद्योगाच्या सर्व कामांमध्ये प्रावीण्याला चालना देणारे हे व्यवस्थापकीय साधन आहे. हे मानक दर्जा व्यवस्थापन प्रणालीशी संबंधित असतात आणि संबंधितांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी योग्य प्रकारचा दर्जा राखत असल्याची खातरजमा करण्यासाठी संस्थांना मदत करण्याच्या दृष्टीने त्यांची रचना करण्यात आलेली असते. आयएसओच्या आंतरराष्ट्रीय मानकांमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कार्यक्षम पद्धतीने काम करायला मदत होते. कारण, ही मानके बहुतेक उत्पादक कंपन्यासाठी कामाचा दर्जा निश्चित करत असतात. आयएसओ 9001 मानकांच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य आणि अंतर्गत व बाह्य सर्व संबंधितांनी दिलेले अभिप्राय आवश्यक असतात. दर्जा व्यवस्थापनाच्या सिद्धांतांची अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित संस्थेमध्ये सखोल मूल्यमापन केले जाते.

---

**ISO 9001 ही प्रणाली सातत्यपूर्ण कामगिरी आणि सेवांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचे आराखडे आणि कामांमध्ये दर्जा कायम राखण्यामध्ये आणि त्यावर देखरेख ठेवण्यामध्ये साहाय्य करत असते. एखाद्या विशाल उद्योगाच्या सर्व कामांमध्ये प्रावीण्याला चालना देणारे हे व्यवस्थापकीय साधन आहे. हे मानक दर्जा व्यवस्थापन प्रणालीशी संबंधित असतात**

---

विविध राज्य सरकारे दर्जा प्रमाणीकरणासाठी आर्थिक साहाय्याचे विविध प्रकार बदलत्या स्वरुपात उपलब्ध करत असतात. गुजरात सरकारने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी खालील योजना तयार केली आहे.

**पात्र खर्च**

आयएसआय/डब्लूएचओ/जीएमपी/हॉलमार्क यांसारखी दर्जा प्रमाणपत्रे आणि क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाने(क्यूसीआय) मान्यता दिलेली इतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानांकने व ईआरपी आणि आयएसओ प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी खर्च करणारा पात्र उद्योग खालील प्रत्येकासाठी(प्रमाणीकरण नूतनीकरणाचे शुल्क वगळून) पात्र आहे.

पात्र खर्चामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

प्रमाणीकरण संस्थेकडून आकारले जाणारे शुल्क

उद्योग आयुक्तालयाने मान्यता दिलेला एन्टरप्राइज रिसोर्स प्लानिंग(ईआरपी) प्रणाली सेवा पुरवठादार

प्रमाणीकरणासाठी गरज असलेल्या उपकरणांच्या चाचणीचे शुल्क

उपकरणांच्या कॅलिब्रेशनचे शुल्क

आयएसओ प्रमाणीकरण मिळवण्यासाठी( प्रवास, हॉटेल आणि देखरेख शुल्क वगळून) सल्ला-मार्गदर्शन शुल्क

उत्पादन नियोजन, सामग्री खरेदी, इन्वेन्टरी नियंत्रण, वितरण, लेखापरीक्षण, वित्तीय सेवा आणि एच आर असलेले ईआरपी मॉड्यूल स्थापित केले( सर्व सुविधा नेटवर्किंग किंवा सर्वर लिंकेजने जोडल्या जातील)

**साहाय्याची उपलब्धता**

खाली उल्लेख केलेल्या प्रत्येक योजनेंतर्गत वैयक्तिक किंवा सामुदायिक स्वरुपात साहाय्य मिळवण्यासाठी हा उद्योग पात्र असेल.

१ ईआरपी प्रणाली

उद्योग आयुक्तालयाने उपलब्ध केलेल्या मान्यताप्राप्त ईआरपी सेवाची ईआरपी प्रणाली बसवण्यासाठी येणा-या भांडवली खर्चाच्या ५० टक्के, जी रक्कम जास्तीत जास्त ५०,००० रुपये.

२ आयएसओ प्रमाणीकरण

आयएसओ प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सल्लागार शुल्काच्या ५० टक्के जी रक्कम जास्तीत जास्त रु. ५०,००० असेल.

३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण:-

डब्लूएचओ/जीएमपी/हॉलमार्क यांसारखी दर्जा प्रमाणपत्रे आणि क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाने(क्यूसीआय) मान्यता दिलेली इतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरणासाठी केलेल्या खर्चाच्या ५० टक्के, जी रक्कम जास्तीत जास्त पाच लाख रुपये असेल.

दर्जा प्रमाणीकरणाच्या आधी आवश्यक असलेली चाचणी उपकरणे व यंत्रे खरेदीच्या खर्चाच्या ५० टक्के जिचे एकूण मूल्य जास्तीत जास्त १० लाख रुपये आहे जे प्रमाणीकरणाच्या तारखेपर्यंत किंवा कार्यान्वयनाच्या कालावधीपर्यंत जे आधी असेल त्यावेळेपर्यंत प्रदान होईल.

- मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण संस्थेला देय असलेल्या शुल्काच्या ५०%

- भारत सरकारच्या अशा प्रकारच्या योजनेची ही पूरक योजना आहे, मात्र कोणत्याही परिस्थितीत सदर उद्दिष्टासाठी भारत सरकार किंवा गुजरात सरकारकडून मिळणारे अर्थसाहाय्य सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त नसेल

**विविध व अद्ययावत पातळ्यांवर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योग्य प्रकारचे प्रशिक्षण व त्यांना पाठबळ ही काळाची गरज आहे. भारतीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये जागतिक उद्योग बनण्याची क्षमता आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या उद्योगांनी दर्जा प्रमाणीकरण आणि संशोधन व विकास यामध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे.**

**पुढील विवेचन**


जर भारताला पुढील दशकात ८ ते १० टक्के दराने विकास कायम राखायचा असेल तर एका भक्कम आणि सक्रिय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राची गरज आहे, जे क्षेत्र जागतिक आव्हानांना तोंड देत टिकून राहू शकेल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राने गेल्या पाच वर्षात सरासरी १८ टक्के दराने विकास केला आहे. उद्योगांचे चालक/ उद्योजक यांनी दर्जाविषयक जागरुकतेची मानसिकता संघटनात्मक संस्कृती अंतर्गत विकसित केली पाहिजे. आपला देश लोकसंख्येच्या विविधतांनी नटलेला आहे, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रे बऱ्याच मोठ्या भागात विस्तारली आहेत, मात्र, त्यांचे समप्रमाणात वितरण झालेले नाही. विविध व अद्ययावत पातळ्यांवर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योग्य प्रकारचे प्रशिक्षण व त्यांना पाठबळ ही काळाची गरज आहे. भारतीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये जागतिक उद्योग बनण्याची क्षमता आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या उद्योगांनी दर्जा प्रमाणीकरण आणि संशोधन व विकास यामध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे. उद्योगांच्या गरजा आणि त्यांच्या समोर असलेली आव्हाने यांचे निराकरण करण्यासाठी जागतिक पातळीवरच्या स्पर्धात्मक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांकडूनच शाश्वत उपाय मिळू शकतील

■■■

*लेखक नवी दिल्ली स्थित पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीचे वरिष्ठ सचिव आहेत .*
*email: jatinder@phdcci.in*

# लघु व मध्यम उद्योगांतील तंत्रज्ञान प्रगती

- बालसुब्रमनिया एम.एच.



**सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात एमएसएमइ उद्योगांना खुल्या वातावरणातून जावे लागत आहे. त्यात सर्वसमावेशक जागतिकीकरणाचा समावेश आहे. एमएसएमइ उद्योगांचा जीव जास्त छोटा आहे.त्यांची तंत्रज्ञानात्मक वाढ करणे सोपे नसते. यातील उद्योजकांची तंत्रज्ञान व्यवस्थापन क्षमता कमी असते. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी असते. आर्थिक ताकदही कमी असते. या सर्व मर्यादा असताना एमएसएमइ उद्योगांना अंतर्गत तंत्रज्ञान विकास साधणे अवघड असते**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमइ) या उद्योगांमध्ये रोजगार निर्मिती, उत्पादन, निर्यात व इतर बाबी महत्वाच्या आहेत. त्यामुळे धोरणकर्त्यांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक विकास तसेच उत्पन्नातील तफावत किंवा असमानता, अभिनवता असे अनेक मुद्दे त्यात आहेत. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात एमएसएमइ उद्योगांना खुल्या वातावरणातून जावे लागत आहे. त्यात सर्वसमावेशक जागतिकीकरणाचा समावेश आहे. एमएसएमइ उद्योगांचा जीव जास्त छोटा आहे. त्यांची तंत्रज्ञानात्मक वाढ करणे सोपे नसते. यातील उद्योजकांची तंत्रज्ञान व्यवस्थापन क्षमता कमी असते. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी असते. आर्थिक ताकदही कमी असते. या सर्व मर्यादा असताना एमएसएमइ उद्योगांना अंतर्गत तंत्रज्ञान विकास साधणे अवघड असते (बुराटी व पेन्को २००१). त्यामुळे हे उद्योग तंत्रज्ञानासाठी बाह्य व्यवस्थांवर अवलंबून राहतात. औद्योगिक प्रगत देशात हा प्रश्न येत नाही. १९४७ पासून भारताने लघुउद्योगांबाबत एकच धोरण दीर्घ काळ कायम ठेवले. आंतरराष्ट्रीय पातळीवर या उद्योगांना ज्या अडचणी येत होत्या त्या भारतीय उद्योगांनाही लागू आहेत. लघु व मध्यम उद्योगांचा भारतीय अर्थव्यवस्थेतील वाटा मोठा आहे. २०१५-१६ मध्ये ५१ दशलक्ष उद्योगांमध्ये ११७ दशलक्ष लोक काम करीत होते व त्यांची निर्यात ८४९२ दशलक्ष अब्ज रूपये इतकी होती. त्यांनी १८१०० अब्ज रूपयांचे उत्पादन केले (२०१२-१३ च्या किंमतीआधारे) (आरबीआय २०१७). २०१४-१५ मध्ये एकूण देशांतर्गत उत्पादनात एमएसएमइचा वाटा ३०.७४ टक्के इतका होता. त्यात एकूण देशांतर्गत उत्पन्नात एसएमइच्या उत्पादन क्षेत्राचा वाटा ६.११ टक्के, सेवा क्षेत्राचा वाटा २४.६३ टक्के (एमएसएमइ मंत्रालय २०१७) होता. एमएसएमइ हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा घटक आहे. एमएसएमइ हे असंघटित क्षेत्रात आहे, त्यात तंत्रज्ञान विकसनात अडथळे येतात

व अभिनवताही कमी असते ( २००९ मध्ये नॅशनल कमिशन फॉर एन्टप्राइजेस) या आयोगामुळे तंत्रज्ञान हस्तांतराच्या संधी देण्यात आल्या. एमएसएमइ क्षेत्रात भारतामध्ये कमी तंत्रसज्जता हा प्रश्न आहे. जागतिक बाजारपेठेत हे मोठे वैगुण्य ठरते (बाला सुब्रम्हण्य २०१४). प्रगत उत्पादन तंत्रज्ञान हे कुठल्याही एमएसएमइच्या वाढीसाठी आवश्यक असते (स्कॅनेल-२०१२). त्यामुळे त्यांची कार्यपद्धती सुधारण्यासाठी संशोधन व विकास आवश्यक असतो. असे असले तरी बाजारपेठेत उपलब्ध असलेले महागडे तंत्रज्ञान त्यांना विकत घेणे शक्य नसते. त्यामुळे स्वपातळीवर ते विकसित करणे आवश्यक असते. (भारत सरकार २०१०). या सगळ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर एमएसएमइच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञान सुधारणेचे मार्ग शोधणे आवश्यक आहे. यात तंत्रज्ञान हस्तांतर हा सर्वात योग्य मार्ग आहे. भारतातील एमएसएमइबाबत कोणते धोरण अवलंबणे आवश्यक आहे, याचा विचार आवश्यक आहे. त्यात सरकारचे पाठबळ कशा प्रकारचे असावे यालाही महत्व आहे. कालबाह्य तंत्रज्ञानावर मात करणेही यात आवश्यक आहे. या मुद्द्यांवर यात उहापोह केला आहे.

**तंत्रज्ञान हस्तांतर- अर्थ व महत्व**

तंत्रज्ञानाची व्याख्या ढोबळमानाने पेटंटयोग्य ब्लूप्रिंट, योजना, यंत्रणा, सूत्रे अशी करता येईल, हे सर्व एखाद्या कंपनीच्या किंवा यजमान देशाची संपत्ती गणले जाते पण तंत्रज्ञान हस्तांतर करारानंतर हे ज्ञान संबंधित परदेशाला दिले जाते किंवा एखाद्या कंपनीला दिले जाऊ शकते. (स्मिथ १९८०) (एनॉस-१९८९). तंत्रज्ञान याचा अर्थ असे ज्ञान जे आर्थिक क्षमता वाढवते. यात

**तंत्रज्ञानाची व्याख्या ज्ञान व कल्पना तसेच भौतिक उत्पादने अशी करता येईल व हस्तांतर याचा अर्थ व्यक्ती, संस्था आस्थापना यांच्या मार्फत एमएसएमइ उद्योगांना ज्ञान व अभिनव संकल्पना यांचा पुरवठा असा आहे. एमएसएमइ उद्योगांसाठी तंत्रज्ञान हस्तांतर म्हणजे नवीन हार्डवेअर म्हणजे यंत्रसामुग्रीबाबतचे ज्ञान, प्रत्यक्ष यंत्रसामुग्री, उत्पादन प्रक्रिया यांचे प्रदान होय.**

उत्पादनाचे पेटंटयोग्य पैलूच नव्हे तर व्यवसाय प्रक्रिया, संघटन, विपणन व इतर प्रकारच्या व्यवस्थापकीय कौशल्यांचा व ज्ञानाचा समावेश होतो. (स्टेवर्ट १९७७).

तंत्रज्ञान हस्तांतर हा अंतर्गत तंत्रज्ञान विकसनाला एक पर्याय मानला जातो. त्यामुळे तंत्रज्ञान व अभिनवता विकास हे सगळे उसने घेतले जाऊ शकते. तो तंत्रज्ञान धोरणाचा एक भाग असतो. (झहरा १९९४), एमएसएमइच्या योजनांना हे लागू आहे. (झहरा १९९६), कॉक व सेयलान (२००७). विकसनशील देश अशा प्रकारे परदेशांकडून असे तंत्रज्ञान घेतात. कारण अशी अनेक तंत्रज्ञाने ही या गरीब देशांच्या स्त्रोतांच्या पलीकडे असतात. मर्यादित स्त्रोत, तज्ञता व वेळ हे घटक असे असतात, जे परदेशी किंवा बाह्य स्त्रोतांकडून तंत्रज्ञान घेण्यास भाग पाडतात. हे तंत्रज्ञान कंपनीत तयार केले जात नाही. (स्टॉक व टाटीकोंडा २००४). तंत्रज्ञान हस्तांतर हे अनेक बाबी बाह्य स्त्रोतांकडून प्राप्त करण्यासारखे आहे.विद्यापीठ, संशोधन केंद्र व संशोधन आणि विकास केंद्र यांच्याकडून हे तंत्रज्ञान दिले जाते. काहीवेळा सहविकास पद्धतीने तंत्रज्ञान तयार केले जाते. (किम १९९०). हे सगळे बघितले तर तंत्रज्ञानाची व्याख्या ज्ञान व कल्पना तसेच भौतिक उत्पादने अशी करता येईल व हस्तांतर याचा अर्थ व्यक्ती, संस्था आस्थापना यांच्या मार्फत एमएसएमइ उद्योगांना ज्ञान व अभिनव संकल्पना यांचा पुरवठा असा आहे. एमएसएमइ उद्योगांसाठी तंत्रज्ञान हस्तांतर म्हणजे नवीन हार्डवेअर म्हणजे यंत्रसामुग्रीबाबतचे ज्ञान, प्रत्यक्ष यंत्रसामुग्री, उत्पादन प्रक्रिया यांचे प्रदान होय. अर्थात, हे सर्व मूळ उद्योगाकडे असलेली आधीची यंत्रसामुग्री, ज्ञान, उत्पादन प्रक्रिया यांच्यापेक्षा अधिक प्रगत असणे आवश्यक आहे.

**तंत्रज्ञान सुधारणा व तंत्रज्ञान हस्तांतराची भूमिका- उद्दिष्टे, स्त्रोत, मार्ग, फलश्रुती**

प्रदीर्घ काळाचा विचार केला तर तंत्रज्ञान संपत्ती वाढवणे हे फार महत्वाचे असते. (लॅक्टोट व स्वान २०००). तंत्रज्ञान हस्तांतर धोरण हे आस्थापनेला नवीन स्पर्धात्मक तंत्रज्ञान मिळवणे, विकसित करणे किंवा त्याचा वापर करणे यास उद्युक्त करत असते. उच्च तंत्रज्ञान जोखीम निर्णय ते निम्न तंत्रज्ञान जोखीम, एखाद्या कंपनीकडून पूर्ण वापरात असलेले तंत्रज्ञान मिळवणे यांचा यात समावेश आहे. अंतर्गत संशोधन व विकास ही फार खर्चिक बाब असते निदान एमएसएमइ उद्योगांना तरी ती परवडणारी नसते. त्यामुळे तंत्रज्ञान दुसरीकडून आयात करण्याची पद्धत सुरू झाली. साधारणपणे पूर्ण वापरात असलेले तंत्रज्ञान विकत घेणे किंवा जगभरात वापर असलेल्या उत्पादनाचे तंत्रज्ञान दुसऱ्या आस्थापनेकडून घेणे यातून आपल्या उत्पादनांची प्रत सुधारता येते. (लॅक्टॉट व स्वान २०००). औद्योगिक प्रगत देशातील एमएसएमइ हे बाहेरील तंत्रज्ञान घेऊन कालबाह्य तंत्रज्ञान टाकून देण्यात अग्रेसर आहेत. कारण त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तंत्रज्ञान अभिनवतेशी स्पर्धा करणे जड असते. त्यांच्याकडे साधनांची कमतरता असते. त्यामुळे ते ज्ञान, तज्ञता, कौशल्य व अर्थपुरवठा यांची निर्मिती करू शकत नाहीत. यात संशोधन व विकासातही फारसे लक्ष दिले जाते असे नाही. शिवाय तंत्रज्ञानाच्या सुधारणेला धोरणाची जोड आवश्यक असते.आधुनिकताही महत्वाची असते. हे सगळे तंत्रज्ञान एमएसएमइला उपयोगी असते. (रोमीजिन २००१).

एमएसएमइ उद्योगांपुढे बाह्य तंत्रज्ञान मिळवण्याचे वेगवेगळे मार्ग असतात. त्यातील काही खालीलप्रमाणे (डेम व कोकॅग, २००८)

---

**अंतर्गत संशोधन व विकास ही फार खर्चिक बाब असते निदान एमएसएमइ उद्योगांना तरी ती परवडणारी नसते. त्यामुळे तंत्रज्ञान दुसरीकडून आयात करण्याची पद्धत सुरू झाली. साधारणपणे पूर्ण वापरात असलेले तंत्रज्ञान विकत घेणे किंवा जगभरात वापर असलेल्या उत्पादनाचे तंत्रज्ञान दुसऱ्या आस्थापनेकडून घेणे यातून आपल्या उत्पादनांची प्रत सुधारता येते.**

---

विद्यापीठातील संशोधन पुरस्कृत करणे.

कर्मचाऱ्यांच्या शिक्षणावर खर्च व त्यांनी तयार केलेल्या तंत्रज्ञानाचे मूल्यमापन.

बाह्य संशोधन व विकास केंद्राचा उपयोग करणे.

बाजारपेठेतील उपलब्ध तंत्रज्ञानाचे मूल्यमापन करण्यासाठी सल्लागारांचा वापर करणे.

तंत्रज्ञान वापराचा परवाना घेणे.

तंत्रज्ञान बैठका, तंत्रज्ञान नियतकालिके, व्यापार मेळे यांचा वापर पर्यायी तंत्रज्ञानांचा शोध घेण्यासाठी करणे.

प्रगत तंत्रज्ञान विक्रेते किंवा व्यावसायिक मार्गाने विकत घेणे.

समांतर व उर्ध्व तंत्रज्ञान हस्तांतर असे तंत्रज्ञान हस्तांतराचे दोन प्रकार आहेत. उर्ध्व हस्तांतरात नेहमी मूलभूतसंशोधनातील माहिती ही उपयोजित संशोधनात रूपांतरित केली जाते व उपयोजित संशोधनातून तंत्रज्ञान विकास केला जातो. तंत्रज्ञान विकासातून नंतर उत्पादन तयार होते. अशा प्रकारचे हस्तांतर दोन्ही मार्गांनी असते. माहिती ही यात बदलत जाते पण समांतर तंत्रज्ञान हस्तांतरात एका ठिकाणी, संस्थेत वापरले जाणारे तंत्रज्ञान काही करारानुसार दुसऱ्या संस्थेत किंवा दुसऱ्या ठिकाणी तसेच्या तसे वापरले जाते. यात पहिली पायरी ही यंत्रसामुग्री हस्तांतराची असते अनेक प्रकरणात माहिती व कौशल्ये यांचे कर्मचाऱ्यांमध्ये हस्तांतर, तंत्रज्ञान संबंधित आस्थापनेला मिळणे हे महत्वाचे असते. दुसरी पायरी म्हणजे ज्या संस्थेने तंत्रज्ञान विकत घेतले आहे त्यांना ते सक्षमपणे वापरता आले पाहिजे. त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये ही कर्मचाऱ्यांना

आत्मसात करावी लागतात. नवीन तंत्रज्ञान हाताळताना ते फार महत्वाचे असते. तंत्रज्ञानाचे स्थानीय पैलू व व्यक्तीगत पैलू यात फरक असतो. त्यामुळे तंत्रविशिष्ट कौशल्ये व ज्ञान खालच्या स्तरातील कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक असते. त्याचबरोबर तंत्र खात्यातील उच्च पदस्थ, वैज्ञानिक, अभियंते यांना ते आत्मसात करणे आवश्यक असते. यात हे तंत्रज्ञान आत्मसात करणारे कर्मचारी संबंधित संस्थेकडे असावे लागतात. एमएसएमइ उद्योगांकडे असे तंत्रज्ञान आत्मसात करणारे कर्मचारी असतात. ते बाहेरील तंत्रज्ञान सहज आत्मसात करतात. तंत्रज्ञान हस्तांतराचे मार्ग व त्याची फलश्रुती हे आस्थापनेने निवडलेल्या तंत्रज्ञानाच्या स्त्रोतावर अवलंबून असतात. तंत्रज्ञान हस्तांतर जर अव्यावसायिक आस्थापनेकडून खासगी क्षेत्राकडे होत असेल तर तंत्रज्ञान नवोद्योग म्हणजे तंत्रज्ञान स्टार्ट अपमध्ये त्याची भूमिका महत्वाची ठरते. चालू उद्योगाची वाढ, नवीन रोजगार निर्मिती यातही त्याचा वाटा असू शकतो. (पार्कर व झिल्बरमन, १९९३ व प्रॉक्टर १९९३). जे संशोधन साहित्य उपलब्ध आहे त्यात तंत्रज्ञान हस्तांतराची व्याख्या खालीप्रमाणे केलेली दिसते.

विद्यापीठांकडून खासगी उद्योगांकडे (पार्कर व झिल्बरमन १९९३ व प्रॉक्टर १९९३)

सरकारी प्रयोगशाळा व सहाय्य असलेल्या संस्थांकडून खासगी उद्योगांकडे (कोल १९९२)

खासगी उद्योगात एकमेकांमध्ये हस्तांतर (चक्रबर्ती १९९३, पलानीस्वामी व बिशप १९९३).

---

**तंत्रज्ञान हस्तांतराचे मार्ग व त्याची फलश्रुती हे आस्थापनेने निवडलेल्या तंत्रज्ञानाच्या स्त्रोतावर अवलंबून असतात. तंत्रज्ञान हस्तांतर जर अव्यावसायिक आस्थापनेकडून खासगी क्षेत्राकडे होत असेल तर तंत्रज्ञान नवोद्योग म्हणजे तंत्रज्ञान स्टार्ट अपमध्ये त्याची भूमिका महत्वाची ठरते. चालू उद्योगाची वाढ, नवीन रोजगार निर्मिती यातही त्याचा वाटा असू शकतो.**

---

जागतिक पातळीवर तंत्रज्ञान हस्तांतरात कंत्राटी पद्धतही आहे. एमएसएमइ उद्योगात ती जास्त प्रचलित दिसते (वेनान्झी-१९९६) तथापि तंत्रज्ञान हस्तांतराचा कुठला मार्ग प्रभावी आहे हे वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असते. दोन भागीदारांचा यातील सहभाग महत्वाचा असतो. हस्तांतरित तंत्रज्ञानाची परिपूर्णता ही ज्ञान व अनुभवाच्या दर्जावरही अवलंबून असते. ज्या एमएसएमइ उद्योगांकडे अंतर्गत स्त्रोत व अनुभव कमी असेल त्यांना नवीन तंत्रज्ञानासाठी हस्तांतराचे नवे मार्ग शोधून तंत्रज्ञान घ्यावे लागते. एमएसएमइ उद्योगांना तंत्रज्ञान हस्तांतराची माहिती नसते. त्याचे स्त्रोत व आपण कशात कमी आहोत हे माहिती नसते. त्यामुळे ते काहीवेळा इतर उद्योगांवर अवलंबून असतात. दोन महत्वाचे मार्ग यात आहेत ते म्हणजे बाह्य स्त्रोताकडून एमएसएमइकडे तंत्रज्ञान हस्तांतर. जे एमएसएमइ उद्योग तंत्रज्ञान हस्तांतरात गुंतलेले आहेत त्यांच्यासाठी माहिती हस्तांतर, तंत्रज्ञान हस्तांतर, कौशल्य हस्तांतर, विशेषता मदत हे मुद्दे महत्वाचे ठरतात.

एमएसएमइ उद्योगांची तंत्रज्ञान हस्तांतर कामगिरी ही संस्थात्मक घटकांवर अवलंबून असते. त्यात अंतर्गत तंत्र कर्मचारी, बाह्य ज्ञान स्त्रोतांची उपलब्धता, राजकीय, विधी व प्रशासकीय वातावरण, ज्ञान हस्तांतराचे नियोजन यांचा त्यात समावेश आहे पण प्रत्येक उद्योगात हे घटक सारखेच महत्वाचे असतील असे नाही. विविध देश व तेथील उद्योग यांच्यावर ते अवलंबून असते.

तंत्रज्ञान हस्तांतरातून काही गोष्टी अपेक्षित असतात. त्यात नवीन उत्पादनांच्या संख्येत वाढ, उत्पादन चक्राच्या कालावधीत घट, उत्पादनक्षमतेत वाढ , उत्पादन खर्चात कपात, विक्रीत वाढ अपेक्षित आहे.(डेम व काकावग्लू २००८). आतापर्यंतच्या अभ्यासात बाह्य तंत्रज्ञान अधिग्रहण व संबंधित आस्थापनेची कामगिरी यांचा संबंध दिसून आला आहे. यात काही

वेळा अंतर्गत संशोधन व विकास प्रयत्नांची जोड आवश्यक असते (तासी व वँग २००८). अगदी अलिकडे याचे सबळ पुरावे भारतीय संदर्भात मिळाले आहेत. बंगळुरूच्या अभियांत्रिकी एमएसएमइशी त्याचा संबंध आहे. तंत्रज्ञान हस्तांतरामुळे हे आस्थापनेच्या पातळीवरील अभिनव संकल्पना क्षमता व स्पर्धात्मकताही यात वाढली असे यात दिसून आले. त्यामुळे यशस्वी तंत्रज्ञान हस्तांतरासाठी व उच्च आर्थिक कामगिरीसाठी एमएसएमइ उद्योगांमध्ये तांत्रिक व आर्थिक क्षमता असणे आवश्यक आहे, किंबहुना त्या दोन बाबी असतील तर तंत्रज्ञान हस्तांतर यशस्वी होते. (बाला सुब्रम्हण्या २०१५)

या चर्चेनंतर तंत्रज्ञान सुधारणा व हस्तांतराला धोरणात्मक जोड महत्वाची आहे हे सांगणे क्रमप्राप्त आहे. एमएसएमइ तंत्रज्ञान हस्तांतरासाठी उद्दिष्टे, स्त्रोत, मार्ग व फलश्रुती हे महत्वाचे मुद्दे ठरतात.

**तंत्रज्ञान हस्तांतर व एमएसएमइचे यांचा संकल्पनात्मक आराखडा-**

तंत्रज्ञान विकास हा भारतीय एमएसएमइसाठी महत्वाचा आहे जर त्यांना स्पर्धेत टिकायचे असेल, देशी बाजारपेठेतून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उडी घ्यायची असेल तर तंत्रज्ञान हस्तांतर महत्वाचे ठरते. आधीचे तंत्रज्ञान कालबाह्य होण्याची समस्या आता गंभीर बनत आहे, त्यामुळे तंत्रज्ञान विकास व हस्तांतर हे जागतिक स्पर्धात्मकतेत टिकण्यासाठी महत्वाचे आहे. (एमएसएमइ मंत्रालय २०११- टिफॅक २०१७).

तंत्रज्ञान हस्तांतराची उद्दिष्टे- तंत्रज्ञान हस्तांतर हे एमएसएमइच्या बाबतीत अनेक प्रकारे फायद्याचे असते. भारतीय एमएसएमइमध्ये तंत्र निपुणतेचा अभाव आहे, शिवाय अंतर्गत संशोधन व विकास यातही ते मागे आहेत. खर्च करण्याची ताकद व त्यातील जोखीम यांचाही प्रश्न आहे. अंतर्गत तंत्रज्ञान विकासाची प्रक्रिया ही वेळखाऊ असते. त्यात विलंब होऊ शकतो. त्यामुळे पैसा व वेळ वाचवण्यासाठी एमएसएमइ उद्योग हे तंत्रज्ञान हस्तांतर माध्यमातून नवीन तंत्रज्ञान मिळवतात. अंतर्गत तंत्र कुशलतेतील कमतरता यात भरून निघते, व तंत्रज्ञान सुधारणा शक्य होते. काही बाबतीत एमएसएमइ उद्योग हे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून तंत्रज्ञान घेऊ शकतात.

**भारतीय एमएसएमइमध्ये तंत्र निपुणतेचा अभाव आहे, शिवाय अंतर्गत संशोधन व विकास यातही ते मागे आहेत. खर्च करण्याची ताकद व त्यातील जोखीम यांचाही प्रश्न आहे. अंतर्गत तंत्रज्ञान विकासाची प्रक्रिया ही वेळखाऊ असते. त्यात विलंब होऊ शकतो. त्यामुळे पैसा व वेळ वाचवण्यासाठी एमएसएमइ उद्योग हे तंत्रज्ञान हस्तांतर माध्यमातून नवीन तंत्रज्ञान मिळवतात.**

**तंत्रज्ञान हस्तांतराचे स्त्रोत व मार्ग**

एमएसएमइमध्ये तंत्रज्ञान सुधारणा ही तंत्रज्ञान हस्तांतरातूनच होते त्यात तंत्रज्ञान माहिती व तंत्रज्ञान सहाय्य हे तंत्रज्ञान पेढीच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास आयोग उपलब्ध करून देत असतो.

मध्यम उद्योग- विद्यापीठ किंवा अभियांत्रिकी संस्था (आयआयटी, एनआयटी, आयआयएससी) या संस्था प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान एमएसएमइला देऊ शकतात. यात संशोधन करार किंवा मूलभूत संशोधन असे दोन प्रकार आहेत. यात टिफॅक व एमएसएमइ कार्यक्रम सुविधा यांचा समावेश आहे.

सरकारच्या तंत्रज्ञान संशोधन केंद्राकडून एमएसएमइला तंत्रज्ञानाची मदत स्थानिक किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळ्वून दिली जाते. राष्ट्रीय संशोधन विकास महामंडळ हे तंत्रज्ञानाचे व्यावसायिकीकरण करते, ते सीएसआयआर मध्ये स्थापन केले आहे, ते एमएसएमइ उद्योगांना तंत्रज्ञान हस्तांतरात मदत करते.

राष्ट्रीय उत्पादनशीलता स्पर्धात्मकता कार्यक्रम- मोठा उद्योग

मग तो देशी किंवा बहुराष्ट्रीय असला तरी एमएसएमइशी उपकंत्राटाचे संबंध प्रस्थापित करू शकतो. त्यामुळे एमएसएमइ उच्च दर्जाचे सुटे भाग तयार करू शकतात. यात मोठे उद्योग तंत्र माहिती व इतर मदत करतात.

व्यावसायिक तंत्रज्ञान सल्लागार – विज्ञान व औद्योगिक संशोधन मंडळाकडे नोंदणी असलेले सल्लागार एमएसएमइला देश व परदेशातून तंत्रज्ञान मिळवून देण्यास मदत करतात.

तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी मदत केली जाते. यात उच्च शिक्षण व संशोधन संस्था तंत्रकुशलता मिळवून देतात व बाहेरचे योग्य तंत्रज्ञान निवडण्यास मदत करतात. तंत्रज्ञान प्रदर्शने, परिषदा व तंत्रज्ञान नियतकालिके व इंटरनेट या माध्यमातून स्त्रोत व मार्ग सापडतात त्यातून योग्य तंत्रज्ञान घेता येते.

तंत्रज्ञान परवाने- परवाना देणाऱ्या आस्थापनेकडून पेटंट, ट्रेडमार्क, सेवा, स्वामित्व हक्क, व्यावसायिक गुपिते , बौद्धिक संपदा कंत्राटी पद्धतीने घेता येते. त्यात ती देणाऱ्यांना पैसे द्यावे लागतात. त्यालाच स्वामित्व धन म्हणजे रॉयल्टी असे म्हणतात. त्यामुळे तंत्रज्ञान परवाना मिळवणे हा एक मार्ग यात आहे.

तंत्रज्ञान थेट विकत घेणे हा एक मार्ग आहे. यात एपीसीटीटी ही नवी दिल्लीतील युनोची संघटना एमएसएमइ उद्योगांना तंत्रज्ञान हस्तांतरात मदत करते. आशिया-पॅसिफिक भागात क्षमता विकसन कार्यक्रमही घेतले जातात. (एपीसीटीटी २०१७).

इंडिया एसएमइ टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेड ही संस्था एमएसएमइ उद्योगांना मदत करते. त्यांना जागतिक पातळीवर संधी कितपत आहे हे सांगून त्या मिळवून देते. नवीन तंत्रज्ञान व उद्योग भागीदारीतही सहाय्य करते. (आयएसटीएसएल २०१७)


तंत्रज्ञान हस्तांतराचे फायदे- एमएसएमइ उद्योग अनेक उद्देश साध्य करतात. त्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतर हे एक साधन आहे

हे फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

वाढती उत्पादनक्षमता

उत्पादन व्यापकता

विविध उत्पादन क्षमता



नवीन उत्पादन विकास

नवीन उत्पादन रचना

उत्तम दर्जाची उत्पादने

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश

**विक्री व बाजारपेठे वाट्यात वाढ**

यात सारांश रूपाने सांगायचे तर विविध उद्दिष्टांसाठी एमएसएमइ उद्योगांनी कालबाह्य तंत्रज्ञान सोडून नवे तंत्रज्ञान स्वीकारणे गरजेचे असते. त्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतर हा एक मार्ग आहे. त्यासाठी पर्यायी स्त्रोत व मार्ग शोधावे लागतात. तंत्रज्ञानाचा स्त्रोत शोधल्यानंतर त्याचा मार्ग शोधावा लागतो व त्यातून तंत्रज्ञान हस्तांतराची प्रक्रिया पक्की होते. त्यात अनेक उद्दिष्टांचा विचार करावा लागतो. ही उद्दिष्टे साध्य होतात की नाही याचाही विचार यात महत्वाचा आहे. आर्थिक कामगिरी व स्पर्धात्मकता हे निकष त्यात महत्वाचे आहे. जास्तीत जास्त एमएसएमइ उद्योगांनी तंत्रज्ञान हस्तांतराचा मार्ग वापरणे आवश्यक आहे. त्यातून भारतीय अर्थव्यवस्थेला ऊर्जितावस्था प्राप्त होईल.

**विविध उद्दिष्टांसाठी एमएसएमइ उद्योगांनी कालबाह्य तंत्रज्ञान सोडून नवे तंत्रज्ञान स्वीकारणे गरजेचे असते. त्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतर हा एक मार्ग आहे. त्यासाठी पर्यायी स्त्रोत व मार्ग शोधावे लागतात. तंत्रज्ञानाचा स्त्रोत शोधल्यानंतर त्याचा मार्ग शोधावा लागतो व त्यातून तंत्रज्ञान हस्तांतराची प्रक्रिया पक्की होते.**

■■■

*लेखक बंगलूरू येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स मधील व्यवस्थापन अभ्यास विभागात अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.*
*email: bala@iisc.ac.in*



# एमएसएमइ प्रोत्साहन योजना

**- एम.चंद्रशेखर रेड्डी**



**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायदा २००६ हा केंद्राच्याच प्रयत्नांचा भाग आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय २००७ मध्ये स्थापन करण्यात आले. यापूर्वी असलेल्या लघु उद्योग व कृषी ग्रामीण उद्योग संस्थांचे एकत्रीकरण करून या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या क्षेत्रात एकूण ४५.३ दशलक्ष उद्योग असून (२०१३ च्या आकडेवारीनुसार) ११७ दशलक्ष लोकांना यातून रोजगार मिळाला आहे.**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योगांना प्रोत्साहन देण्याची जबाबदारी ही राज्य सरकारांची आहे. या उद्योगांचे महत्व आतापर्यंत भारत सरकारनेही मान्य केले आहे. या उद्योगातून रोजगार निर्मिती होते,त्याशिवाय आर्थिक वाढ व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा विकास होतो. त्यामुळे या उद्योगांसाठी राष्ट्रीय धोरण व उत्तेजनाचा मुद्दा महत्वाचा आहे.त्यासाठी राज्यांच्या प्रयत्नांना साथ देण्याची केंद्राची नेहमीच तयारी आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायदा २००६ हा केंद्राच्याच प्रयत्नांचा भाग आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीनंतर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय २००७ मध्ये स्थापन करण्यात आले. यापूर्वी असलेल्या लघु उद्योग व कृषी ग्रामीण उद्योग संस्थांचे एकत्रीकरण करून या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या क्षेत्रात एकूण ४५.३ दशलक्ष उद्योग असून (२०१३ च्या आकडेवारीनुसार) ११७ दशलक्ष लोकांना यातून रोजगार मिळाला आहे. एकूण उत्पादन क्षेत्राच्या ४० टक्के उत्पादन या उद्योगातून होते. देशातील निर्यातीपैकी ४० टक्के या उद्योगातून होते. या उद्योगांना प्रोत्साहनासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. त्यात पतपुरवठा, तंत्रज्ञान सुधारणा , स्टँड अप अशा अनेक योजना आहेत शिवाय दर्जा सुधारणा, मुद्रा योजना, पत हमी निधी हे उपायही करण्यात आले आहेत. पत मर्यादाही वाढवण्यात आली आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाला खादी, काथ्या व ग्रामोद्योगाची वाढ करण्याची जबाबदारी दिली आहे. प्रक्रिया केलेल्या वस्तूंची गरज खादी व ग्रामोद्योग आयोग भरून काढत आहे. ग्रामीण भागात यातून १५० लाख लोकांना रोजगार मिळाला आहे. खादी व ग्रामोद्योग विभाग हा वस्तूंच्या उत्पादनाला वेगळा दर्जा प्राप्त करून देणारा आहे. मध्यम व श्रीमंत वर्गातही या उत्पादनाचे ग्राहक आहेत. काथ्या व बांबू उद्योगाचा विस्तार आता केरळ शिवाय तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, गोवा, ओडिशा, महाराष्ट्र,गुजरात या राज्यातही झाला आहे. यात सात

लाख लोकांना रोजगार मिळाला असून निर्यातीतही या उद्योगांचा मोठा वाटा आहे. काथ्याचा वापर हा पर्यावरण पूरक असून तांत्रिक अभिनवता व इतर बाबींमुळे त्याला महत्व आहे. एमएसएमइ मंत्रालयास आयएसओ ९००१-२००८ प्रमाणन मिळाले आहे. यातून या मंत्रालयाचा प्रामाणिक उद्देश दिसून येतो. आयएसओ मानकामुळे या मंत्रालयाचा दर्जा उंचावला आहे. केव्हीआयसी, कॉयर बोर्ड, एनएसआयसी, एनआयएमएसएमइ व इतर संस्थांनी हे मापदंड प्राप्त केले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी या मंत्रालयाच्या दोन योजनांचे उदघाटन केले असून त्यात नॅशनल शेडयूल्ड कास्ट शेड्युल्ड ट्राइब हब व झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट योजना १८ ऑक्टोबर २०१६ रोजी सुरू करण्यात आल्या. मंत्रालय २००७ मध्ये स्थापन झाल्यानंतर पंतप्रधानांनी त्याच्या योजनांचे उदघाटन करण्याची ही पहिलीच वेळ होती. २०१७ च्या अर्थसंकल्पात या उद्योगांना स्वतंत्र स्थान देण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यात पन्नास कोटींपेक्षा कमी उलाढाल असलेल्या यातील उद्योगांचा कंपनी कर ३० टक्क्यांवरून २५ टक्के करण्यात आला.

**मंत्रालयाची भूमिका -**

एमएसएमइ मंत्रालयाने व त्याच्याशी संलग्न संस्थांनी राज्यांना उद्योजकता, रोजगार संधी यात मदतच केली आहे. एमएसएमइ उद्योगात स्पर्धात्मकता वाढवण्याचा प्रयत्न करून आर्थिक कायापालटाचा प्रयत्न केला आहे. मंत्रालयाच्या योजनांमुळे खालील उद्दिष्टे साध्य होतात.

---

**एमएसएमइ मंत्रालयास आयएसओ ९००१-२००८ प्रमाणन मिळाले आहे. यातून या मंत्रालयाचा प्रामाणिक उद्देश दिसून येतो. आयएसओ मानकामुळे या मंत्रालयाचा दर्जा उंचावला आहे. केव्हीआयसी, कॉयर बोर्ड, एनएसआयसी, एनआयएमएसएमइ व इतर संस्थांनी हे मापदंड प्राप्त केले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी या मंत्रालयाच्या दोन योजनांचे उदघाटन केले असून त्यात नॅशनल शेडयूल्ड कास्ट शेड्युल्ड ट्राइब हब व झिरो डिफेक्ट झिरो इफेक्ट योजना १८ ऑक्टोबर २०१६ रोजी सुरू करण्यात आल्या.**

---

१. आर्थिक संस्था व बँकांकडून पतपुरवठा २. तंत्रज्ञान सुधारणेसाठी मदत ३. एकात्म पायाभूत सुविधा ४. आधुनिक चाचणी व दर्जा प्रमाणन सुविधा ५. आधुनिक व्यवस्थापन पद्धती ६. उद्योजकता विकास व कौशल्य विकास व प्रशिक्षण ७. उत्पादन विकास मदत ८. कलाकार व कार्यकर्त्यांचे कल्याण. ९. देशांतर्गत बाजारपेठेत व निर्यातीत वाव १०. वाटिका निहाय क्षमता निर्मिती व सक्षमीकरण सुविधा. एमएसएमइ उद्योगांच्या प्रगतीसाठी अनेक योजना हाती घेतल्या आहेत.

**एसएमइ विभागाच्या योजना**

१- अंतर्गत सहकार्य २. प्रशिक्षण संस्थांना सहकार्य ३. विपणन सहाय्य

एमएसएमइ विकास आयुक्तालयाच्या योजना

१. पत हमी.

२. पत निगडित भांडवली अनुदान (तंत्रज्ञान सुधारणेसाठी)

३. आयएसओ ९०००-१४००१ प्रमाणन प्रतिपूर्ती

४. सूक्ष्म व लघु उद्योग वाटिका विकास कार्यक्रम

५. सूक्ष्म वित्त कार्यक्रम

६. एमएसएमइ विपणन विकास सहाय्य

७. राष्ट्रीय पुरस्कार

८. राष्ट्रीय उत्पादकता स्पर्धात्मकता कार्यक्रम

अ) विपणन व बार कोड सहाय्य ब) उद्योग व व्यवस्थापकीय विकासासाठी इनक्युबेटर्स क) क्यूएमएस व क्यूटीटी स्पर्धात्मकता ड) उत्पादन स्पर्धात्मकता इ)डिझाइन तज्ञता फ) विपणन व तंत्रज्ञान सुधारणा सहाय्य.

**एनएसआयसी योजना**

१. पत मानांकन व कामगिरी

२. बँक पत सुविधा

३. कच्चा माल पुरवठा

४. एक खिडकी नोंदणी

५. माहिती सेवा

६. विपणन माहिती सेवा

७ बिलात सूट

८. एनएसआयसी पायाभूत सुविधा

अ) प्रदर्शन गृह हैदराबाद ब) आयटी इनक्युबेटर क) प्रदर्शन व विपण न विकास पार्क

ड) सॉफ्टवेअर तंत्रज्ञान व उद्योग पार्क इ) प्रदर्शन मैदान , नवी दिल्ली.

**एआरआय योजना**

१. पंतप्रधान रोजगार हमी योजना

२. जनश्री बिमा योजना (खादी कलाकारांसाठी )

३. बाजारपेठ विकास सहाय्य

४. विज्ञान व तंत्रज्ञान योजना

५. कॉयर उद्यम योजना

६. कॉयर विकास योजना - निर्यात बाजारपेठ प्रोत्साहन, कौशल्य सुधारणा व महिला कॉयर योजना,व्यक्तीगत अपघात विमा योजना, व्यापार व उद्योग पाठिंबा सेवा, देशांतर्गत बाजारपेठ प्रोत्साहन योजना.

७. अस्पायर (स्कीम फॉर प्रमोशन ऑफ इनोव्हेशन आंत्रप्रेन्युरशिप अँड अग्रो इंडस्ट्री)

८. रिव्हॅम्पड स्कीम फॉर फंड फॉर रिजनरेशन ऑफ ट्रॅडिशनल इंडस्ट्रीज

एमएसएमइ मंत्रालय पतआधारित अनुदान योजना राबवत आहे, त्यात पंतप्रधान रोजगार हमी योजनेचा समावेश आहे. यात तरूण उद्योजकांना नवीन उद्योग उत्पादन व सेवा क्षेत्रात सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. २०१४-१५ या वर्षात ८ मार्च २०१६ पर्यंत १,१२८८३ प्रकल्प मंजूर झाले आङेत. त्यातून ८,७१,००० रोजगारांची निर्मिती झाली. अस्पायर योजनेत ग्रामीण उद्योजकता व अभिनव कल्पना यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. २०१५ मध्ये ही योजना सुरू झाली असून त्यात तंत्रज्ञान केंद्राचे जाळे निर्माण करणे हा हेतू आहे व उद्योजकतेला पाठिंब्यासाठी इनक्युबेर, कृषी योजनेतील अभिनवतेसाठी नवसंकल्पना हे त्यातील दुसरे उद्देश आहेत. अस्पायर अंतर्गत तंत्रज्ञान उद्योग इनक्युबेटर्स, लायव्हलीहूड बिझीनेस इनक्युबेटर्स, सिडबीच्या मदतीने निधी उभारणी याचाही त्यात समावेश आहे. एमएसएमइ मंत्रालय व सिडबी यांनी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो अँड स्मॉल एंटरप्राइझेस ही योजना सुरू केली आहे. त्याचा हेतू या संस्थांना त्रयस्थ हमी मिळावी व पतपुरवठा व्हावा हा आहे. त्यातून त्यांना स्वत:चा लघु व मध्यम उद्योग स्थापन करणे शक्य आहे. उद्योग आधार निवेदन सप्टेंबर २०१५ मध्ये अधिसूचित केले.ही उद्योग आधार नोंदणी प्रक्रिया सुलभ आहे. उद्योग आधारची नोंदणी ऑनलाइन



करता येते. त्यासाठी उद्योग आधार पोर्टलचा वापर आवश्यक आहे. http://udyogaadhaar.gov.in हे संकेतस्थळ त्यासाठी पहावे. ही नोंदणी शुल्कमुक्त असून नोंदणीच्या प्रयत्नांना मर्यादा नाही. स्वघोषित तत्वावर हे निवेदन करता येते. आतापर्यंत ४.१७ लाख एमएसएमइ

उद्योगांनी ही नोंदणी केली आहे. विपणनात या उद्योगांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जगभरात सरकारी खरेदी हीच त्यांची बाजारपेठ असते. सरकारने त्यासाठी सार्वजनिक खरेदी धोरण तयार केले असून ते १ एप्रिल २०१२ पासून अंमलता आहे. या धोरणात वीस टक्के खरेदी ही सरकारी मंत्रालय, खाती व सार्वजनिक उद्योग करीत असतात. यात सर्वसमावेशकतेचे तत्व महत्वाचे असते. सरकारची वीस टक्के खरेदी ही एखादा उद्योग स्थापन झाल्यानंतर तीन वर्षानंतर त्या उद्योगाकडूनच असावी लागते. त्यातील चार टक्के खरेदी ही अनुसूचित जाती जमातींच्या मालकीच्या एमएसएमइ उद्योगाकडून करावी लागते. उत्पादन क्षेत्रात स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस प्रोग्रॅम हाती घेतला आहे. ही योजना एमएसएमइची साखळी मजबूत करण्यास उपयोगी आहे. क्यूएमएस व क्यूटीटी या दोन घटकात ३१ जानेवारी २०१६ पासून एकूण २५ कार्यक्रमांवर ४२.१५ कोटी रूपये खर्च करण्यात आले. एमएसएमइ मंत्रालयाने आतापर्यंत लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी अठरा तंत्रज्ञान केंद्रे स्थापन केली आहेत. ही केंद्रे भारतीय उद्योगांसाठी महत्वाची भूमिका पार पाडीत आहेत. हत्यारे व रंग तयार करण्याच्या उद्योगात कामगारांना प्रशिक्षण दिले जाते. तंत्रज्ञान हस्तांतरात उपयोगी पडेल असे मनुष्यबळ तयार करणे हा त्यांचा हेतू आहे. उद्योगांच्या गरजेनुसार ते प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवित आहेत. एमएसएमइ उद्योग क्षेत्रात सतत काही तरी प्रगती होत आहे. २९ मे २०१५ रोजी फ्रेमवर्क फॉर रिव्हायवल अँड रिहॅबीलीटेशन ऑफ मायक्रो, स्मॉल अँड मेडियम एंटरप्राइजेस ही अधिसूचना गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आली त्यातील हेतू हा आजारी लघु व मध्यम उद्योगांचे पुनर्वसन हा होता.

---

**स्टार्ट अप इंडिया कार्यक्रमात उद्योजकांना व त्यांच्या नवकल्पनांना उत्तेजन मिळाले. स्टार्ट अप उद्योगांना अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आले. उत्पादन क्षेत्रातील स्टार्ट अपना पूर्वानुभव व उलाढालीची अट काढू टाकण्यात आली आहे. पण उत्पादनाच्या दर्जात मात्र सूट दिलेली नाही. स्टार्ट अप प्रकल्पात त्यांचा कारखाना भारतात असावा अशी एक अट आहे.**

---

स्टँड अप इंडिया कार्यक्रम पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट २०१५ रोजी जाहीर केला. त्यात अनुसूचित जाती जमाती व महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे हा हेतू होता. त्यातून उद्योजकांना सात वर्षात परतफेडीचे १० लाख ते १००लाख रूपयांचे कर्ज ग्रीन फिल्ड एंटरप्राइजेससाठी देण्यात आले. हा लाभ अनुसूचित जाती-जमाती व महिला उद्योजकांना मिळाला. स्टार्ट अप इंडिया कार्यक्रमात उद्योजकांना व त्यांच्या नवकल्पनांना उत्तेजन मिळाले. स्टार्ट अप उद्योगांना अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आले. उत्पादन क्षेत्रातील स्टार्ट अपना पूर्वानुभव व उलाढालीची अट काढू टाकण्यात आली आहे. पण उत्पादनाच्या दर्जात मात्र सूट दिलेली नाही. स्टार्ट अप प्रकल्पात त्यांचा कारखाना भारतात असावा अशी एक अट आहे.

अनेक विकसित देशात लोकसंख्या वृद्धी होत चालली आहे. भारत त्या दृष्टीने तरूणांचा देश आहे. २०२० मध्ये तो सर्वात तरूण देश असेल. त्यामुळे तरूणांमध्ये गुंतवणूक करण्याची हीच खरी वेळ आहे. एकूण लोकसंख्येच्या ६३ टक्के लोक यात तरूण असणार आहेत. त्यांना त्यांच्या क्षमतेचे काम मिळाले पाहिजे. रोजीरोटी व वेतन हे स्वयंरोजगार किंवा रोजगारातून त्यांना मिळवता आले पाहिजे. तरूण लोक हे आपली खरी संपत्ती आहेत पण त्यांना व्यवस्थित प्रशिक्षित केले पाहिजे. त्यांच्यातील गुण हेरून त्यांना त्या क्षेत्रात पुढे नेले पाहिजे. देशाच्या उभारणीत त्यांची मोठी भूमिका असणार आहे.उद्योगात काम करण्यास त्यांना सक्षम करणे ही खरी गरज आहे.

एनआय-एमएसएमइ-एनआय एमएसएमइ ही मूळ मध्यवर्ती औद्योगिक विस्तार प्रशिक्षण संस्था आहे ती नवी दिल्ली येथे १९६० मध्ये स्थापन करण्यात आली.उद्योग व व्यापार मंत्रालयाच्या अंतर्गत ती स्थापन करण्यात आली असून त्या संस्थेला सरकारी नियंत्रणांपासून दूर ठेवण्यात आले आहे ती लघु

उद्योगांसाठी मोठे काम करीत आहे. आता ही संस्था हैदराबादला हलवण्यात आली असून तिचे नामकरण लघु उद्योग विस्तार प्रशिक्षण संस्था (एसआयइटी) असे करण्यात आले आहे. दोन दशके ही संस्था याच नावाने प्रसिद्ध होती. नंतर तिचे व्यवस्थापन सरकारी मंडळाकडे आले. जे सरकारने नेमलेले होते. त्यानंतरच्या काळात या संस्थेचे नाव एनआय- एसआयइटी असे करण्यात आले. त्याचे पूर्ण रूप नोडल ट्रेनिंग रीसर्च अँड कन्सल्टन्सी असे असून ही संस्था लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाअंतर्गत काम करते. मध्यवर्ती व समन्वय संस्था असल्याने तिला अजूनही स्वायत्तता असून ती आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभी आहे. या संस्थेचे सीएफटीसी, युनेस्को, यूएनडीपी, फोर्ड फाउंडेशन, जीटीझेड (जर्मनी), युसेद, आयएलओ (आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांच्याशी चांगले संबंध आहेत राज्य सरकार व केंद्र सरकारच्या मंत्रालयांना सल्ला देण्याचे काम ही संस्था करते. त्यात एमएसएमइ क्षेत्रात आंतर कौशल्य व तंत्रज्ञान सुधारणेला प्रोत्साहन दिले जाते.

क्षमता निर्मिती- एमएसएमइसाठी क्षमता निर्मिती योजना तयार करण्यात आल्या असून राज्य इडीआय व एसपीव्ही यांची स्थापन करण्यात आली आहे. (एमएसइसीडीपी, स्फूर्ती).

माहिती प्रसार व ज्ञान व्यवस्थापन- आयएसबीएन जर्नल एसइडीएमइ, ऑनलाइन अभ्यासक्रम, एमएसएमइ योजना वेगवेगळ्या प्रकाशनात प्रकाशित केल्या जातात. एमएसएमइ इन्फोपोर्टल, क्लस्टर न्यूज, मेड ऑनलाइन ॲप्लीकेशन. एमएसएमइ स्कीम अँड प्रोजेक्ट प्रोफाइल.

रीसर्च अँड पॉलिसी अडव्होकसी- एमएसएमइ क्षेत्रातील योजनांचा अभ्यास, एमसएमइ संशोधन विद्यावृत्ती, एमसएमइ विभागात उद्योजकतेला प्राधान्य.

इंटरनॅशनल कोऑपरेशन इन एमएसएमइ- शेतीसोडून इतर आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम. उद्योजकता विकास, एमएसएमइ मध्ये आतापर्यंत १० हजार परदेशी नागरिकांना प्रशिक्षण


नेटवर्किंग- एमएसएमइच्या विविध समित्या आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या या समित्या आहेत. सीओडब्ल्यू इ, एएलइएपी, डीआयसीसीआय या संघटनांची भूमिका यात महत्वाची आहे.

वाटिका निर्मिती- तंत्रज्ञान सुधार, सीएफसी निर्मिती- पीपीपी पद्धत. एसपीव्हींचा वापर, तंत्रज्ञानाच्या प्रत्यक्ष उपयोगाचे मूल्यमापन.

उद्योग इनक्युबेशन- यात आठ उद्योगांचा समावेश आहे. त्यातून शाश्वत रोजीरोटी मिळू शकते. यात बँकां व आर्थिक संस्थांचा समावेश केला आहे.


या संस्थेने १४०३४ कार्यक्रमात ४६२३९३ लोकांना प्रशिक्षण देण्यात आले, २०१५-१६ मध्ये भारत सरकार व राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी हे कार्यक्रम राबवले. परराष्ट्र मंत्रालयाअंतर्गत ते आयटीइसी योजना १९७६ मध्ये ही योजना सुरू केली. विकसनशील १४२ देशातील ९४५० आंतरराष्ट्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.एकूण ९०९ संशोधन व सल्ला प्रकल्प राबवण्यात आले.

**कार्यपद्धती**




■■■

*लेखक हैद्राबाद येथील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग राष्ट्रीय संस्थेचे महासंचालक आहेत.*
*email dg@nimsme.org*



भगीरथ प्रकाशनाची
आगामी प्रकाशने
भगीरथ
भारताचा भूगोल
संपादन
श्री. रंजन कोळंबे
लेखन
श्री. कपिल पवार
(महा. वित्त व लेखाधिकारी)
भगीरथ प्रकाशन
पर्यावरण व
पारिस्थितीकी
By: Ranjan Kolambe
भगीरथ प्रकाशन
पंचायतराज
संपादक
श्री. रंजन कोळंबे
लेखन
श्री. सचिन शेंडे
भगीरथ प्रकाशन
सामान्य विज्ञान
आणि तंत्रज्ञान
विश्लेषणात्मक
वस्तुनिष्ठ प्रश्नसंच
भगीरथ प्रकाशन
UPSC | MPSC
महाराष्ट्राचा
भूगोल (भारतासहित)
विश्लेषणात्मक
वस्तुनिष्ठ प्रश्नसंच
भगीरथ प्रकाशन
मराठी+इंग्रजी
प्रश्नसंच
(1984-2017)
भगीरथ प्रकाशन
MPSC ने
विचारलेले प्रश्न
10,000 +
(अंतिम उत्तरतालिकेनुसार)
भगीरथ प्रकाशन
राज्यसेवा मुख्य परीक्षांचे
पेपर २ आणि ३
मधील संपूर्ण कायदे
संपादक
श्री. रंजन कोळंबे
लेखन
श्री. सचिन शेंडे
भगीरथ प्रकाशन
Bhagirath
IAS Academy
UPSC • MPSC
ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
Ph.: 020-65233450 | 7378406920
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
Ph.: 020-64013450 | 9970298197
Web:www.bhagirathacademy.co.in
E-mail: bhagirathacademypune@gmail.com
Facebook: Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **November, 2017**
**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18
Published Date: 12th **November,** 2017
Date of Posting : 16th **November,** 2017




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.